UNIVERSAL
LIBRARY
OU_196182
UNIVERSAL
LIBRARY

Osmania University Library

Call No M 294.5927 M 95 — Accession No. M 3941

Author मुकतेश्वरकृत महाभारत / संपादक - रामजी

Title [illegible] - पियोळकर, 1951

This book should be returned on or before the date last marked below.

मुक्तेश्वरकृत महाभारत

आदिपर्व (खंड पहिला)

संपादक

अनंत काकबा प्रियोळकर



मुंबईसरकार आणि मुंबईविद्यापीठ यांच्या आश्रयाखालीं

मुंबई
मराठी संशोधनमंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाकुरद्वार, मुंबई २.

१९५१

अनुक्रमणिका

		पृष्ठें
१.	पुरस्कार	३—५
२.	प्राक्कथन	६–२०
३.	चित्रें	१—४
४.	श्रीमुक्तेश्वराचा शोध	१–३०
५.	मुद्रित मुक्तेश्वर–वाङ्मय	३१–३२
६.	पहिल्या खंडांतील कथाभाग	३५–३६
७.	आदिपर्व (अ. १–१२)	१–२४४
८.	शब्दकोश	१—८
९.	शुद्धिपत्र	९–१०

किंमत पांच रुपये.

मुद्रक—**आर. आर. बखले,** मुंबईवैभव प्रेस, सर्व्हेटस ऑफ इंडिया सोसायटीज बिल्डिंग, मुंबई नं. ४.

प्रकाशक—**अ. का. प्रियोळकर,** कार्यवाह, मराठी संशोधनसमिति, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई नं. २.

पुरस्कार

सरकारी विद्याखात्याकरितां 'नवनीत' अथवा 'मराठी कवितांचे वेंचे' कै. परशुरामपंत तात्या गोडबोले मराठी ट्रान्सलेटर यांचे-पंडित यांनीं लिहिलें. त्याची १८७३ सालची आठवी आवृत्ति लहानपणापासून मजपाशीं सांभाळून ठेवलेली आहे. त्या पुस्तकांत मुकुंदराजापासून म्हणजे इ. स. १००० पासून तों एकूणीसाव्या शतकापर्यंत अनेक कवींच्या काव्यांतील उतारे आहेत. त्यांत मुक्तेश्वराबद्दल "जन्म शके १५३१ इ.स. १६०९ व याचे प्रसिद्ध ग्रंथ भारताचीं पहिलीं चार पर्वें ओवीबद्ध," एवढीच माहिती दिली आहे; व दुष्यंतशकुंतलाख्यान, जरासंधवधप्रकरणांतील कांहीं उतारे आणि शेवटीं द्रौपदीवस्त्रहरण एवढे वेंचे दिले आहेत. यापलीकडे मुक्तेश्वराचें अध्ययन सामान्य जनांनीं केलें असेल असें मला वाटत नाहीं. निदान संशोधनपटु श्री. प्रियोळकर यांनीं कृपेनें त्यांच्या या पुस्तकाला चार पुरस्काराचे शब्द लिहावे हें आग्रहपूर्वक सांगून हातीं हें पुस्तक देईपर्यंत मीतरी मुक्तेश्वराचें अन्य कांहींच काव्य वाचलें नव्हतें. पुस्तकाच्या सुरुवातीसच मुक्तेश्वर हा एकनाथाच्या मुलीचा मुलगा, वडिलांचें नांव चिंतामणि, त्याचें स्वतःचें नांव मुद्गल आणि 'मुक्तेश्वर' या नांवाखालीं त्यांनीं काव्य लिहिलें असें स्वतःचें मत ग्रंथकर्त्यानें दिलें आहे व तें कसें बनविलें तेंहि नमूद केलें आहे.

तीनशें वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या कवीबद्दल निश्चित माहिती आपणांस असूं नये याचें नवल काय? त्यानंतर अलीकडे होऊन गेलेल्या प्रसिद्ध कवींचीं अगर ग्रंथकारांचीं तरी आपणांपाशीं कुठें सविस्तर चरित्रें उपलब्ध आहेत? आतां आपल्या विद्वानांचें लक्ष देशभाषेंतील जुन्या ग्रंथांच्या पद्धतशीर संशोधनाकडे वळलें आहे, ही एक अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. "आरंभीं एकही हस्तलिखित प्रत जेथें नव्हती तेथें या काव्याच्या आज सुमारें तीस हस्तलिखित प्रती उपलब्ध झाल्या," असें श्री. प्रियोळकर लिहितात. आणि "हस्तालिखितांच्या पुराव्यावरून जो पाठ कवीच्या हातचा किंवा त्याच्या काळचा ठरेल तोच खरा. जुना पाठ अपरिचित म्हणून किंवा आजच्या लेखनपद्धतीला धरून नाहीं म्हणून तो बदलणें अशास्त्रीय आहे," हें त्यांचें म्हणणें सयुक्तिक आहे. श्री. प्रियोळकरांनीं १९३५ साली रघुनाथपंडिताचें 'दमयंती—स्वयंवर' प्रसिद्ध केलें त्यांतील विद्वत्ताप्रचुर प्रस्तावनेंत त्यांनीं "नव्या चिकित्सापद्धतीचा अल्प इतिहास" या सदराखालीं आज मराठी भाषेचें पाठचिकित्साशास्त्र प्रयोगावस्थेंत आहे व तें निर्माण होत असतांना अनेक नवीन प्रश्न कसे उपस्थित होतात व संशोधनकार्य जसजसें अधिक होईल तसतसें तें निश्चित कसें होईल याचा उहापोह केला आहे.

महाभारताचें वाचन साहजिकपणेंच अत्यंत भक्तियुक्त भाविक अंतःकरणानें आपण करूं लागतों. त्यांतून मुक्तेश्वराची भाषा इतकी रसाळ आहे व त्याची वाणी इतकी प्रासादिक आहे कीं वाचकाचें चित्त लगेच तल्लीन होऊन जातें.

वेदशास्त्र स्मृति-पुराणें। नाना इतिहास व्याकर्णें।
गाळूनि यांचीं रसायणें। द्वैपायनें कुशळतें॥
सुरस सुंदर पवित्र श्रृष्टी। बोनें निपजवुनी पाठीं।
संस्कृतशब्दसुवर्णताटीं। श्रेष्ठश्रेष्ठां वोगरिलें॥

तेचि रसोय दुर्बळपणीं । महाराष्ट्रभाषारंभापणीं ।
वाढिली तरी भुकाळु जनीं । न सेविजे किमर्थ ॥

व्यासांनी संस्कृताच्या सोन्याच्या ताटात वाढली तींच पक्वान्नें मुक्तेश्वर आपल्याला आपल्या मराठीच्या आवडत्या केळीच्या पानांवर वाढीत आहे. त्याची गोडी वर्णन करण्यापेक्षा चाखुन पहावी. आणि

काव्यपीयूषरसाचे चषक । भरोनि ठेविले आकर्षक ।
माधुरी हर्षांभर्षकारक । रसिकजनीं चाखावी ॥

संशोधन पाठचिकित्सेच्या दृष्टीनें करून, ग्रंथ अस्सल स्वरूपांत उपलब्ध करून देणें हें तर महत्त्वाचें कार्य आहेच, परंतु विचाराचें वाहन व वेष जी भाषा, फक्त तिच्या दृष्टीनें संशोधन करून आपलें कार्य संपत नाही. याहूनहि अधिक महत्त्वाचें संशोधन म्हणजे आपल्या पूर्वजांनीं इतिहास–कथा–पुराणें इत्यादिकांचा महोदधि निर्माण करून ठेवला आहे तो मंथन करून त्यातून प्राप्त होणारीं अनेक विचाररत्नें व निघेल तें अमृत आज लोकांस देण्याची जरूरी आहे. भारतीय संस्कृतीच्या व पर्यायानें मानवी संस्कृतीच्या उत्क्रातीचा विश्वसनीय इतिहास अशा संशोधनानेंच तयार होणार आहे. हें फार प्रचंड काम आहे. एक एक उल्लेख–एक एक अद्भुत कथा–जी आज केवळ काव्यमय कल्पनेची भरारी वाटते ती एक एक धागा समजून त्याचा छडा आपण नीट लावला तर हजारों वर्षांपूर्वीपासून मानवी मनाची उत्क्राति कसकशी होत गेली–आज ज्या आपल्या भारतीयाच्या धर्म व संस्कृति या नावाखाली प्रचलित श्रद्धा, रूढी अगर मान्यता आहेत त्यांचा विकास कोणच्या पायऱ्यानी झाला–त्यांचा पत्ता लागेल. इतर संस्कृतींमध्येंहि तत्सदृश कल्पनाचा जो शोध लागला आहे त्यानें त्या सर्वांवर कसा प्रकाश पडला आहे हें सर्व आपण समजूं शकूं. या पुस्तकातील सर्पोत्पत्ति व सर्पसत्र या प्रसंगांवरून सुचलेलें एक उदाहरण देऊन मी माझा अभिप्राय स्पष्ट करतो.

पृथ्वीच्या पाठीवरील अनेक मानवजातींत सर्प, त्याची पूजा अगर हत्या यांचे उल्लेख आहेत व अनेक कथा प्रचलित आहेत.

ख्रिस्ती धर्मांतला ईवूला फशीं पाडणारा प्रख्यात सर्प, ज्याच्या पृष्ठावर विष्णु शयन करतो व डोक्यावर पृथ्वी तोलली आहे तो शेष, शंकर ज्याला भूषण म्हणून मिरवितो तो नाग, कृष्णानें मर्दन केलेला कालिया, सेंट जॉर्जनें ठार केलेला ड्रॅगन, पश्चिम आफ्रिकेमध्यें " फर्नांडो पो " या बेटांत इसापू जातीचे नीग्रो लोक अजूनही दरसाल एक मोठा उत्सव करून एका सर्पाचें कातडें, त्याला ठार करून, वर डोकें खालीं शेपटी असें एका उंच झाडावर टांगून ठेवतात तो सर्पदेव, या सर्व सर्पांच्या दंतकथांचा परस्परांशीं अगर मानवी मनाच्या उत्क्रातीशीं काहीं संबंध जोडतां येईल का ? कालसर्प म्हणून संतकवि उल्लेख करतात. सर्व सर्पकथाच्या वाङ्मयाचा अभ्यास व संशोधन केल्यास भिन्न भिन्न धार्मिक ग्रंथांत प्राचीन कालीं घडलेल्या ज्या अद्भुत गोष्टींचा उल्लेख आहे त्यांवरून आद्य मानवी समाजांतील मनुष्याच्या मनाची व बुद्धीची कसकशी उत्क्रांति होत गेली त्याचा आपणास उलगडा होईल. या प्राचीन दंतकथां-(myths) बद्दल एक तत्त्ववेत्ता लिहितो, " History is Knowledge. Religion is mainly active, and supplies strength and discipline; and

static religion such as we find it when it stands alone attaches mind to life and consequently the individual to society, by telling him tales on a par with those with which we lull little children to sleep." या गोष्टींचा आपण अर्थ लावून संस्कृतीचा सुसंगत इतिहास तयार केला पाहिजे. फ्रेझरनें "The Golden Bough–A study in magic and religion" या ग्रंथामध्यें अनेक देशांतील वृक्षपूजा सर्पपूजा इत्यादि चालींचा संग्रह व विचार या दृष्टीनें केला आहे. आणि (१) मंत्रविद्या, (२) भौतिक शास्त्रें व (३) धर्मकल्पना यांचा एकमेकांशीं काय संबंध आहे याचाही थोडासा विचार केला आहे. अगोदर शोध व संग्रह, मग भाषेच्या दृष्टीनें संशोधन, मग उत्क्रांतीच्या इतिहासाच्या दृष्टीनें संशोधन असें प्रचंड तिहेरी काम मराठी विद्वानांच्या पुढें आहे. पुणें, वाई, धुळें व मुंबई या चार ठिकाणींच अशा संशोधनाचे संघटित व उल्लेखनीय प्रयत्न चालू आहेत असें मला वाटतें. विशेषतः श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीं "वैदिक संस्कृतीचा विकास" या त्यांच्या पुणें विद्यापीठांत गुंफलेल्या व्याख्यान–मालेंत जे सुसंगत मूल्यवान विचार सांगून थोर कार्य केलें आहे तेंच पुढें अजून किती कार्य शिल्लक आहे याचें दिग्दर्शक आहे.

आपण उत्कृष्ट सुरुवात केली आहे. मला आशा आहे कीं चिकाटीनें हें त्रिविध संशोधनकार्य करणारे प्रस्तुत ग्रंथकारांसारखे अनेक विद्वान संशोधक महाराष्ट्रांत निर्माण होतील व नष्ट होत चाललेलें हुडकून, वा गंज चढलेलें दिव्य तत्त्वभांडार उजळून, जगापुढें मांडून, त्याचे डोळे दिपवितील. सृष्टीच्या अत्यंत प्राचीन कालापासून मानवी उत्क्रांति कशी आजच्या अवस्थेपर्यंत येऊन पोंचली आहे–त्या सर्व मार्गावर उजेड पाडूं शकेल एवढी वाङ्मयसामग्री भारतांत आहे. पण त्या कूटलिपीचे (Cypher) वाचक पाहिजेत. एका पिढीचें हें कार्य नाहीं–एकाच व्यक्तीचें तर नाहींच नाहीं. इतरत्र आधींच ग्रथित झालेलें ज्ञान मराठींतून उपलब्ध करायचें म्हटलें तरी किती परिश्रम जरूर आहे तें आपण जाणूं शकतों. मग सध्यां नवविचारनिर्मितीचें कार्य करणाऱ्या विद्वानांना लागणाऱ्या सामग्रीची आपण जुळवाजुळव केली, संघटित प्रयत्नाला प्रारंभ केला, तरी आपण योग्य दिशेलाच पाऊल टाकलेंसें होईल. श्री. प्रियोळकर यांनीं हा मार्ग आक्रमण करण्यास उत्साहानें सुरुवात केली आहे. त्यांना मी सुयश चिंतितों.

मुंबई,
७ नवंबर १९५१.

वा. गो. देसाई.

प्राक्कथन

मुक्तेश्वरी महाभारताचीं आदि, सभा, वन, विराट व सौप्तिक अशीं पांचच पर्वें आज उपलब्ध आहेत. यांपैकीं सौप्तिकपर्व तर अलीकडे कांहीं वर्षांपूर्वी मिळालें. यामुळें कांहीं लोकांचा असा ग्रह झाला आहे कीं, मुक्तेश्वरानें महाभारताचीं अठराही पर्वें लिहिलीं असावीं, आणि सौप्तिक पर्वाप्रमाणें बाकीचीं पर्वेंही आज ना उद्यां केव्हां ना केव्हां सांपडतील. मधलेंच सौप्तिक पर्व मिळालें त्यावरूनही इतर पर्वें त्यानें रचिली असावींत या आशेला बळ चढलें. 'का. पां. प.' या सहीनें निबंधमालेंत कांहीं वर्षांमागें याविषयीं एक पत्र प्रसिद्ध झालें होतें. त्याचा आशय असा कीं, मुंबईतील जांबुळवाडींत राहाणाऱ्या रा. जिवबा अण्णा शिरोडकर या गृहस्थांनीं बेळगांवात असताना मुक्तेश्वराचीं अठराही पर्वें वाचलीं होतीं, व तीं श्रीमंत बापूसाहेब शहापूरकर याच्या घरांत किंवा कदाचित् कुरुंदवाडकर पटवर्धन यांजकडेही असतील असें ते सांगतात.[1] गोमंतकांत हस्तलिखितांचा शोध करीत असतांना कै. व्यंकटेश शां. दळवी या गृहस्थांनीं मुक्तेश्वरी आदि व सभा पर्वांचें हस्तलिखित मला दिलें व त्यांच्या घरीं जुन्या काळीं मुक्तेश्वरी महाभारताचीं अठराही पर्वें होतीं, परंतु लोकांनीं तीं वाचावयास नेलीं व परत केलीं नाहींत, असें ते म्हणाले. चारदोन दिवसांनीं मुक्तेश्वराचीं अठराही पर्वें रा. श्रीनिवास गावणेकर या गृहस्थाकडे आहेत असें सांगणारे एक गृहस्थ भेटले. मीं तें हस्तलिखित लगेच त्याच्याकडून आणविलें. उघडून पाहतों तों आदि, सभा, वन व विराट हीं मुक्तेश्वरी पर्वें आरंभीं असून बाकीचीं पांडवप्रतापांतील श्रीधराचीं पर्वें जोडून या महाभारताची पूर्ति करण्यांत आली होती. अशाच प्रकारें विष्णुदासनाम्याचीं महाभारताचीं इतर पर्वें जोडून मुक्तेश्वरी महाभारत संगृहीत केल्याचें मौजे उदापूर (जि. पुणें, जुन्नरापासून तीन कोस अंतरावर) येथील एक उदाहरण काशीनाथ नारायण साने यांनीं नमूद करून ठेविलें आहे.[2] रा. शिरोडकर यांनीं बेळगांवांत मुक्तेश्वराचीं अठराही पर्वें वाचल्याचें जें निबंधमालेंतील पत्रांत नमूद केलें आहे तोही बहुतेक असाच प्रकार असावा, असें वाटतें.

उपलब्ध मुक्तेश्वरी पर्वांना विष्णुदासनामा किंवा श्रीधर यांनीं रचिलेलीं पर्वें जोडून ज्याप्रमाणें मुक्तेश्वरी भारताला पूर्णता आणण्याचे प्रयत्न झाले त्याचप्रमाणें मुक्तेश्वराचीं अनुपलब्ध असलेलीं पर्वें स्वतः रचून तें महाभारत पूर्ण करण्याचा चंग अनेक कवींनीं बांधलेला दिसतो. असा प्रयत्न 'जिवाशिवा' नांवाच्या एका कवीनें केला. महाप्रस्थानपर्वाच्या शेवटीं हा कवि म्हणतो—

आदिकवींचा श्रेष्ठ कवि । मुक्तेश्वर ज्ञानी अनुभवि ।
काव्यरचने श्रियावैभवि । अग्रपद कविगणांत ॥ ७२ ॥

---

१ निबंधमाला, अं. ४७ (नवंबर १८७७). पृ. ३०.

२ भारतइतिहाससंशोधकमंडळ, इतिवृत्त १८३२. पृ. ३४.

जो साक्षात व्यास सावतार । प्राकृत भारत रचिलें आपार ।
त्यांतुन प्रगट पर्वे चार । भारथसार अप्रतिमा ॥ ७३ ॥

आदिपासून विराटांत । चारि पर्वे भारत साक्षात ।
पद्यरचना नाना दृष्टांत । अर्थ सिद्धांत नवरसि ॥ ७४ ॥

यावरि उद्बोध गोपाळनाथ । उद्योगपर्वे रचिलें साद्यांत ।
श्रीधर पंडित जो व्याख्यात । अश्वमेध प्ररोत तिहि केला ॥ ७५ ॥

मुक्तेश्वरें विणिले श्रेष्ठ पट । चारि हात प्रमाण प्रगट ।
तया दसोडे जोडून सदट । विणिले येक हात गोपाळें ॥ ७६ ॥

येक हात श्रीधरें । ऐसे साह हात पूर्वि विणिले ।
यावरी शिवकृपे जिवें सुतविले । मोठे विणिविले गोबरे ॥ ७७ ॥
घोंगडें विणिलें बारा हात ।[३] ... वगैरे.

जिवाशिवाला गोपाळकवीचें उद्योगपर्वच मिळालेलें दिसतें. पांगारकरांनीं याशिवाय भीष्मपर्वापासून स्वर्गारोहणपर्वापर्यंत त्याचीं पर्वें पाहिलीं होतीं.[४] मजजवळ त्याचीं उद्योग, भीष्म व कर्ण हीं पर्वें आहेत. उपरिनिर्दिष्ट जिवाशिवाच्या महाभारतावर टिपण लिहितांना प्रो. द. वा. पोतदार म्हणतात, " मुक्तेश्वराचें अपूर्ण भारत पूर्ण करण्याची खटपट विष्णुदासनामा, मोरेश्वर, चंद्रात्मज, रुद्र, नरहरि मोरेश्वर, नवरसनारायण, पद्मनाथ, शंभुदास, इत्यादि पुष्कळ कवींनीं केली आहे. जिवाशिवाचा प्रयत्न त्यांपैकींच एक आहे. "[५]

विष्णुदासनाम्याचीं आदि, सभा, वन व विराट हीं पर्वें तंजावर व औंध येथील हस्तलिखितसंग्रहांत आहेत. शिवाय विष्णुदासनामा हा मुक्तेश्वरपूर्व दिसतो. तो शके १५१७ मध्यें हयात होता व त्यांच्यापुढें असलेल्या आदिपर्वाचा लेखनकाल श. १५३१ असें पा. मो. चांदोरकर लिहितात.[६] मुक्तेश्वराचा जन्मकाल श. १५३१ मानला जातो. यावरून विष्णुदासनाम्याचा महाभारतरचनेचा प्रयत्न मुक्तेश्वरमहाभारताच्या पूर्तीसाठीं केलेला असावा असें दिसत नाहीं.

शुभानंदकवीनें मुक्तेश्वराच्या महाभारताची पूर्ति करण्याचा संकल्प स्पष्टपणें नमूद केला

---

३ **भारतइतिहाससंशोधकमंडळ-त्रैमासिक**, वर्ष ११, अं. १. पृ० २४.
४ **महाभारताचे मराठी अवतार** (श्रीसरस्वतीमंदिर). पृ० ४१.
५ **भा. इ. सं. मं. त्रैमासिक** व. ११. पृ० २५.
६ तत्रैव व. १२. पृ० १६९.

नाहीं, पण तो तसा असावा असें मानण्यास मात्र अंतर्गत पुरावा आहे. उद्योगपर्वाच्या आरंभीं त्याच्या भाषेवर मुक्तेश्वराची छाप उघड दिसते. शिवाय,

निवृत्ति ज्ञानदेव सोपान । मुक्ताई मुकुट तुका गहन ।
एकनाथ जनार्दन । मुक्तेश्वर नमियेला ॥ ३६ ॥

असें आरंभीं मुक्तेश्वराला नमनही त्यानें केलें आहे. शिवाय अध्यायाच्या शेवटीं अनेक ठिकाणीं मुक्तेश्वराप्रमाणें तो 'विश्वंभरा'ला नमन करतो.

चंद्रात्मज नांवाच्या कवीनेंही उद्योगपर्व रचिलें आहे. त्याचाही हेतु शुभानंदाप्रमाणें मुक्तेश्वरी महाभारताची पूर्तता करण्याचा असावा. आरंभीं निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुकुंद-मुनि, एकनाथ व मुक्तेश्वर अशा मराठी कवींना त्यानें नमन केलें आहे.[७]

मुक्तेश्वराचा महाभारताचा प्रयत्न अपूर्ण राहिला म्हणून तो पूर्ण करण्याकरितां श्रीधरानें पांडवप्रताप लिहिला असणें शक्य आहे. पण मुक्तेश्वराप्रमाणें मोठ्या प्रमाणावर बाकीचीं पर्वें लिहिल्यास हा संकल्प कदाचित् सिद्धीला जाणार नाहीं म्हणून त्यानें मुक्तेश्वराच्या पर्वांचा संक्षेप करून बाकीचा भारताचा भाग थोडक्यांत महाराष्ट्रापुढें ठेविला, असें वाटूं लागतें. " मूळ व्यासग्रंथाचें जसें मुक्तेश्वरी ग्रंथ हें सार तसेंच मुक्तेश्वरी पर्वांचें पांडवप्रतापांतील ३५ अध्याय हे सार होत,"[८] असें भावे म्हणतात, तर " श्रीधराचा पांडवप्रताप हा मुक्तेश्वरी भारताचा केवळ तर्जुमा आहे, " असें पांगारकरांनीं स्पष्ट लिहिलें आहे.[९] श्रीधरानें मुक्तेश्वराच्या कल्पना, शब्द, इतकेंच काय पण चरण व किंचित फरकानें सबंध ओव्याच्या ओव्या आपल्या पांडवप्रतापांत समाविष्ट केलेल्या आढळतील. यांचें कारण श्रीधराचें कल्पनादारिद्र्य हें खास नव्हे. पांडवप्रताप लिहिण्यापूर्वीच त्यानें हरिविजय व रामविजय हे ग्रंथ लिहून उत्कृष्ट ग्रंथकार या नात्यानें आपली योग्यता सिद्ध केली होती. मुक्तेश्वराचें महाभारत त्याच्यापुढें नसतें तरीही पांडवप्रताप कमी सरस उतरला असता असें वाटत नाहीं. नवलाची गोष्ट ही कीं, पांडवप्रतापांत त्यानें मुक्तेश्वराचा किंवा त्याच्या महाभारताचा निर्देश मुळींच केलेला नाहीं. इतकेंच नव्हे तर,

ज्या मूळ भारतीं कथा । त्याच येथें लिहिल्या तत्त्वतां ।
प्राकृत कवींचे संमता । नाहीं कदा धरियेलें ॥

असेंही उलट स्पष्ट म्हटलें आहे.[१०] लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं रामविजयामध्यें तो मुक्तकंठानें मुक्तेश्वराची स्तुति करतो. पहाः—

---

७ भा. इ. सं. मं. षाण्मासिक वृत्त. शके १८३४ (आश्विन-फाल्गुन). पृ० १६८.
८ महाराष्ट्रसारस्वत, भा. २ रा, आवृत्ति ३ री, १९१८. पृ० १४३.
९ मराठी वाङ्मयाचा इतिहास—खं. २. पृ० ४७६.
१० पांडवप्रताप—अ. ६४, १८०.

जे चातुर्य राजधानीचे कळस । मुक्तेश्वर मुद्गलदास ।
ज्यांचे ग्रंथ पहातां सुरस । ब्रह्मानंद उचंबळे ॥[११]

'पांडवप्रताप' हें नांव देखील मुक्तेश्वराच्या आदिपर्वांतील, "पांडवप्रताप पुरुष तरणा । नववधू कौरवसेना" (अ. ४४, १४४) या ओवीवरून श्रीधराला सुचलें असावें, असा कै. प्रो. चिं. नी. जोशी यांचा तर्क आहे.[१२] अशा स्थितींत हा मुक्तेश्वराचा पांडवप्रतापांतील अनुल्लेख विशेष जाणवतो.

मुक्तेश्वरानें अठराही पर्वें लिहिलीं होतीं; परंतु तीं व्यासापेक्षांही सरस ठरल्यामुळें मूळ भारताला मागें टाकतील म्हणून एकनाथानें तीं गंगेस अर्पण करावयास लाविलीं. पुढें मुक्तेश्वराला वाईट वाटून एकनाथाच्या सांगण्यावरून त्यानें तीं गंगेजवळ परत मागितलीं व गंगेनें चारच पर्वें त्याला परत दिलीं, अशी आख्यायिका आहे.[१३]

प्रत्यक्ष गंगेच्या जलप्रवाहापेक्षांही लोकगंगेचा प्रवाहच ज्यास्त घातक असतो. या लोकगंगेच्या प्रवाहांत सांपडून आतांपर्यंत किती वाङ्मय नष्ट झालें असेल याची कल्पनाही करतां येणार नाहीं.

मुक्तेश्वरी वाङ्मय मुद्रित स्वरूपांत प्रथम परशुरामपंत तात्यांच्या 'नवनीता'नें जगासमोर आणलें असावें, असें वाटतें. १८५४ सालच्या नवनीताच्या पहिल्या आवृत्तींत शकुंतलाख्यान व जरासंधवध हीं काव्यें प्रसिद्ध झालीं. पुढें माधव चंद्रोबांनीं 'सर्वसंग्रहा'मध्यें मुक्तेश्वरी आदिपर्व क्रमशः प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली व १८६५ सालीं हा ग्रंथ स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाला. याच छापील प्रतीच्या आधारावर १८९० सालापासून काव्यसंग्रहांत आदिपर्व क्रमशः प्रसिद्ध होऊं लागलें व १८९३ सालीं स्वतंत्र रूपानें हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. सर्वसंग्रहाच्या छापील प्रतीशिवाय काव्यसंग्रहकारांना पांडुरंग जोशी मोघे वसईकर यांच्याकडून आदिपर्वांची एक हस्तलिखित प्रत मिळाली होती. तिच्यांतील व पुढें मिळालेल्या आणखी एकाद्या प्रतींतील पाठांतरें ग्रंथाच्या शेवटीं काव्यसंग्रहकारांनीं दिलेलीं आढळतील.

'सर्वसंग्रहां'तील मुक्तेश्वरी आदिपर्वाच्या छापील प्रती लोकगंगेच्या प्रवाहांत वाहून दुर्मिळ झाल्या म्हणून काव्यसंग्रहकारांनीं नवी आवृत्ति छापिली. तीही दुर्मिळ झाल्यावर आदिपर्व छापण्याचा फिरून प्रयत्न कोणीच केला नाहीं ! १९२४ सालच्या मुंबई युनिव्हर्सिटीच्या बी. ए. च्या अभ्यासक्रमांत मुक्तेश्वरी आदिपर्व समाविष्ट करण्यांत आलें होतें. त्यावेळीं हें पुस्तक बाजारांत विकत मिळत नाहीं म्हणून विद्यार्थ्यांची ओरड पडली होती. यांपैकींच प्रस्तुत लखकही होता. यावेळीं कै० डॉ. पां. दा. गुणे यांनीं आपल्या लेह्यामार्फत कोट्टनतरी, बहुधा

---

११ रामविजय, अ. १, ९७.

१२ श्रीधरः चरित्र आणि काव्यविवेचन, १९५०. पृं. ३३९.

१३ मुक्तेश्वरकृत वनपर्व (काव्येतिहाससंग्रह), श. १८०१. 'मुक्तेश्वर', पृ. ३.

कोल्हापूराहून असावी, एक प्रत आणून दिली. हें काव्य आम्हां दोघांनाही फारच आवडलें व भांडारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या संस्कृत महाभारताच्या धर्तीवर त्याची संशोधित आवृत्ति तयार करण्याचा आमचा दोघांचाही संकल्प ठरला. पण १९२३ सालीं दुर्दैवानें डॉ. गुणे वारले. पुढें 'विविधज्ञानविस्तारा'चें संपादकीय काम पाहात असतांना हें आदिपर्व शोधून 'विस्तारा'मध्यें क्रमशः प्रसिद्ध करण्याचा मीं विचार केला. 'विस्तारा'च्या अनेक लेखकांना व वाचकांना आदिपर्वाचीं हस्तलिखितें मिळवून देण्याची मीं विनंति केली. त्यावेळीं मजजवळ आदिपर्वाची छापील प्रत देखील नव्हती ! ती 'आनंद'कर्ते वासुदेव गोविंद आपटे यांनीं मला पुण्याहून आणून दिली. कै० नी. ब. भवाळकर यांनीं पुण्याच्या आनंदाश्रमांत आदिपर्वाची एक प्रत असल्याचें मला सांगितलें. मुद्दाम मी पुण्याला जाऊन पहातों तों ती त्रुटित प्रत–कांहीं पृष्ठेंच होतीं. पुढें चारपांच वर्षांमागें आदिपर्वाच्या दोन हस्तलिखित प्रती मला उपलब्ध झाल्या.

मुक्तेश्वरी वाङ्मयाचें संशोधन व्हावें, याबद्दल अनेकांना तळमळ लागून राहिली होती. "मुक्तेश्वराच्या काव्यांच्या जुनाट प्रती शोधून काढून मूळ शुद्ध पाठ जींत आहेत, अशी प्रत संपादिली पाहिजे, त्याव्यतिरिक्त मुक्तेश्वराचें प्रतिभावैभव आपल्या अनुभवास जसें यावें तसें येणें मुष्किल आहे," असें वि. का. राजवाडे यांनीं लिहिलें आहे.[१४] "प्रसिद्ध कवि मुक्तेश्वर याच्या भारताचें ऐतिहासिक दृष्ट्या परीक्षण अद्यापि झालेलें नाहीं. या कवीच्या भारताची संहिता आज छापील मिळते ती अनेक दृष्टींनीं सदोष आहे. याच्या काव्याच्या जुनाट प्रती मिळवून प्रमाण आवृत्ति काढणें अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्रकविमुकुटमणि म्हणून याची शाब्दिक स्तुति पुष्कळांनीं केलेली आहे, परंतु अपपाठांनीं दूषित झालेलें याच्या काव्याचें विकृत स्वरूप पाहिलें म्हणजे मुसलमानांनीं छिन्न-भिन्न केलेल्या सुंदर प्राचीन मंदिराची आठवण होते," असें प्रो. द. वा. पोतदार लिहितात.[१५] आणखीही पुष्कळांनीं अशी सदिच्छा प्रकट केली असेल.

आरंभीं एकहि हस्तलिखित प्रत जेथें नव्हती तेथें या काव्याच्या आज सुमारें तीस हस्त-लिखित प्रती उपलब्ध झाल्या. यावरून ज्यावेळीं आह्मी साधनें नाहींत म्हणून एकाद्या कारणा-करितां अडून बसतों त्यावेळीं तो पुष्कळ वेळां आपला अंगचोरपणा किंवा कामचुकारपणा असतो, असें वाटूं लागतें. 'सत्य संकल्पाचा दाता भगवान', हें विसरतां येत नाहीं.

हीं हस्तालिखितें कोठें मिळालीं त्याची स्थळवार नोंद पुढीलप्रमाणें आहेः—मुंबई २, पुणें ६, राजापूर ३, गोमंतक ३, तंजावर ४, औंध २, धुळें ३, सोलापूर १, नागपूर १, नांदेड १, मोमिनाबाद १, नासिक १ व नगर १. ब्रिटिश म्युझियममध्येंही मुक्तेश्वराच्या आदिपर्वाची एक हस्तलिखित प्रत आहे. Add. 26,508] तेथील मराठी हस्तलिखि-तांच्या कॅटलागांत तिचे जे उतारे दिले आहेत त्यांच्यावरून ती खालीं वर्णिलेल्या ख वर्गातीलच

---

१४ भा. इ. सं. मं. इतिवृत्त, शके १८३६. पृ ४५.

१५ भा. इ. सं. मं. त्रैमासिक वर्ष २३. पृ. ९४–९५.

दिसली. पाठदृष्ट्या विशेष महत्त्वाची न वाटल्यावरून तिची microfilm नक्कल आणण्याची आवश्यकता भासली नाहीं. इंडिया ऑफिसच्या हस्तलिखित संग्रहांतही (नं.३४) आदिपर्वाची एक प्रत आहे. अलिकडे अलिबाग येथें रा. न. ह. जोशी यांच्या संग्रहीं मला आणखी एक त्रुटित प्रत मिळाली. वरील एकोणतीस हस्तलिखितांपैकीं बऱ्याचशांची पूर्णपणें व कांहींच्या कांहीं अध्यायांची पाठनोंदणी केली. निर्णयसागरी प्रत vulgate कल्पून वरील हस्तलिखितांपैकीं प्रातिनिधिक व निर्दिष्टकाल अशीं अकरा निवडून त्यांच्या आधारानें पुढील बारा अध्यायांची संहिता निश्चित केली आहे व पाठांतरें दिलीं आहेत. त्यांची बोधाक्षरांसह (sigla) थोडक्यांत माहिती खालीं देत आहें.

छापील प्रती.

(१) **नि**—काव्यसंग्रहमालेंत वा. दा. ओक यांनीं संपादिलेली **निर्णयसागरप्रत** (vulgate), मुंबई १८९३. (निपा. वरील प्रतीच्या शेवटीं दिलेला पाठ).

(२) **स**—माधव चंद्रोबा यांनीं संपादिलेली **सर्वसंग्रह** प्रत, मुंबई, १८६५.

हस्तलिखितें.

(१) **आ**—**औंध** येथील कै. श्री. भवानराव पंडित प्रतिनिधि यांजकडून मिळालेली पोथी. शेवटचें पान अतिशय जीर्ण आहे. त्यावर " शके १६९२ विकृतिनामसंवत्सर++ रविवारीं लेखन संपूर्ण, " असा शेरा आहे. (औंध संग्रहांतील दुसरी प्रत **औ२**.)

(२) **ख**—मुंबईचे बुकसेलर तुकाराम पुंडलीक शेळ्ये यांजकडून मिळालेली पोथी. या प्रतीच्या शेवटीं,

" तेंचि हें आदिपर्व समस्त । काळिदास गंगाधरसुत ।
सखाराम स्वहस्तें लिखित । परोपकारार्थ पूर्ण केलें ॥
शके सोळाशें ऐकाअसि । शुक्ल सप्तमी माघमासीं ।
प्रमाथि संवत्सरासी । **खट्वांगग्रामीं** समाप्त केलें ॥ " असा मजकूर आहे.

(३) **गो**—**गो**मंतकांत कै. व्यंकटेश शां. दळवी यांच्याकडून मिळालेली पोथी. अतिशय जीर्ण. लेखनकाल नमूद नाहीं.

(४) **गो२**—**गो**मंतकांतील दुसरी प्रत. श्री. गावणेकरांकडून मिळालेली. अलीकडे पाउणशें वर्षांमागें लिहिलेली असावी. पोर्तुगाली निळसर कागद. लेखनकाल नमूद नाहीं. (याशिवाय गोव्यांत तिसरी प्रत मिळाली ती गो३).

(५) **तं**—**त**जावर येथील सरस्वतीमहाल ग्रंथसंग्रहालयांतील क्रमांक १३७२ ची हस्तलिखित पोथी. तिची तिकडून नक्कल करवून आणिली. हिच्यावर लेखनकाल किंवा लेखक यांचा निर्देश नाहीं. (या प्रतीखेरीज आणखी तिकडे आदिपर्वाच्या तीन पोथ्या आहेत. त्यांचीं बोधाक्षरें तं२ तं३ तं४. या प्रतींतील पहिला, पंधरा व सोळा या अध्यायांच्या नकला आणल्या.)

(६) **धु**—धुळें येथील श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांतील क्रमांक ९६० ची हस्तलिखित पोथी. लेखनकाल–"शके १६७६ भावनामसंवत्सरे भाद्रपदमासे शुक्लपक्षे त्रयोदशी भृगुवासरे." (याच संग्रहांतील क्रमांक ९९३ प्रत धु२ हिचा लेखनकाल १६८७ आहे. याशिवाय राजवाडे संशोधनमडळांतील प्रत धु३).

(७) **नां**—नांदेडचे श्री. वि. अं. कानोले यांजकडून मिळालेली प्रत. हिचा लेखक त्र्यंबकात्मज सुब्रह्मण्य असून तिला जोडून असलेल्या सभापर्वाचा लेखनकाल शके १६७४ हा आहे.

(८) **पु**—पुणें येथील भारत इतिहाससंशोधकमंडळ–ना. य. मिरीकर हस्तलिखित-संग्रहांतील नं. $\frac{१७६}{१३}$ हस्तलिखित पोथी. शेवटीं,

"१६८४ चित्रभाननामसंवत्सरे भाद्रपद मासे कृष्णपक्षे त्रयोदशी गुरुवासरे तद्दीने लेखन समाप्त. हस्ताक्षर कानेरनाथांकित नागो व्यंकटेश गोदातीर कटहली वस्ती मांडवगणक्षेत्र सिद्धेश्वर सान्निधौ लेखनसमाप्त ॥ ६ ॥" असा मजकूर आहे.


(भा. इ. सं. मं. च्या आणखी दोन प्रती मिळाल्या त्यांचीं बोधाक्षरें पु२ पु३).

(९) **पु४**—पुणें येथील डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट अँड रिसर्च इन्स्टिट्यूटमधील पोथी. A. N. 6862. लेखनकाल श. १६८८ व्यय नाम संवत्सर ज्येष्ठ कृष्ण द्वादशी गुरुवासर–लेखक लक्ष्मण गोपाळ ज्योतिषी व कुळकर्णी, बाहुलें व मरळी माहाल प्रांत कऱ्हाड. कागद वॉटरमार्क असलेला विलायती. (या संग्रहांतून आणखी मिळालेल्या प्रती पु५, पु६.)

(१०) **मुं**—मुंबई मराठी ग्रंथसंग्रहलयांतील बांधलेलें पुस्तक. "*Balcrishna Wafsoodewji*, Bombay 27th May (वर्ष अस्पष्ट) " असा पेन्सिलीनें लिहिलेला मजकूर आहे वॉटरमार्क असलेला परदेशी कागद. १८५० पूर्वीची ही प्रत असावी.

(११) **रा**—राजापूरच्या संस्कृतपाठशाळेंतून पंडित रघुनाथ कृष्णशास्त्री पाटणकर यांकडून मिळालेली पोथी. हिच्या शेवटीं, "शके १७०६ क्रो++वत्सरे भाद्रपद वद्य प्रतिपदा मंगळवारीं दोन प्रहरीं ग्रंथ स++आबाजीपंत यांनीं लिहिविला हस्ताक्षर राघो पांडुरंग," असा मजकूर आहे. (याशिवाय या संग्रहांतून आणखी दोन प्रती मिळाल्या. रा२, रा३.)

या ज्या आधारभूत प्रती वर दिल्या आहेत त्यांचा परस्परसंबंध काय तें पाहूं. **नि** प्रत **स** वर आधारलेली असून आधुनिक लेखनपद्धतीस अनुसरून तिच्यामध्यें फेरफार केलेले आहेत. वरील हस्तलिखितांचे त्यांच्या आपसांतील परस्परसाम्यावरून दोन वर्ग पाडतां येतील :



या वर्गांपैकीं दुसऱ्या वर्गांतील पाठ विशेष जास्त ग्राह्य आहेत, असें दिसून आलें. पहिल्या वर्गाला **खवर्ग** असें नांव देण्यांत आलेलें आहे. पु४ ही प्रत जुनी असून पहिल्या ख वर्गांत असली तरी दुसऱ्या वर्गाशीं तिचे कांहीं पाठ जुळतात. ज्यांचा प्रत्यक्ष उपयोग केलेला नाहीं अशा इतर प्रती म्हणजे तंजावरच्या तीन (तं२, तं३, तं४), राजापूरच्या दोन दुसरी (रा२, रा३), धुळ्याची दुसरी (धु२) आणि गोमंतकांतील तिसरी (गो३) या दुसऱ्या वर्गांतील, व बाकीच्या सर्व औ२ पु२ पु३ पु५ पु६ धु३ सोलापूर, नागपूर, मोमिनाबाद, नासिक आणि नगर या पहिल्या म्हणजे ख वर्गांतील आहेत.

आदिपर्वाच्या शेवटच्या खंडाच्या प्रस्तावनेंत चिकित्सासाधनें व पाठचिकित्सा यांच्यासंबंधीं यथावकाश जास्त विस्तृतपणें ऊहापोह करण्यांत येईल. प्रस्तुत प्रास्ताविक चार शब्द या खंडापुरते आहेत.

नव्या पाठचिकित्साशास्त्राची नव्यानें माहिती करून देण्याचें आज विशेष कारण राहिलें आहे असें वाटत नाहीं. पंधरा वर्षांमागें 'दमयंतीस्वयंवराच्या' आवृत्तीमध्यें मीं त्याचा उगम व विकास कसा झाला व त्याचीं तत्त्वें कोणतीं याचा सांगोपांग पण थोडक्यांत सोदाहरण परिचय करून दिलेलाच आहे.[१६] अलीकडे डॉ. सु. मं. कत्रे यांनीं तर या विषयावर इंग्रजी भाषेमध्यें स्वतंत्र चांगलें पुस्तकच लिहिलें आहे.[१७]

नव्या पाठचिकित्साशास्त्राचा आरंभ ग्रीक व लॅटिन ग्रंथांचें शुद्धीकरण करण्याच्या प्रयत्नांत झाला. याच पद्धतीवर पुढें संस्कृत ग्रंथांचें शुद्धीकरण व संपादन होऊं लागलें. परंतु ग्रीक, लॅटिन, संस्कृत यांच्या पाठचिकित्साशास्त्राचीं तत्त्वें सामान्यतः एकच असलीं तरी तीं जशाचीं तशीं मराठी ग्रंथांना लागू करतां येत नाहींत. मराठीमध्यें संशोधन करतांना निराळेच प्रश्न उपस्थित होतात. मराठीमध्यें जसजसे जास्त जास्त संशोधनात्मक प्रयत्न होत जातील तसतसें मराठीचें पाठचिकित्साशास्त्र तयार होणार आहे. आज हें शास्त्र केवळ प्रयोगावस्थेमध्यें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

अर्थाच्या दृष्टीनें सुबोध, काव्याच्या दृष्टीनें सरस व आजच्या व्याकरणाच्या कल्पनांप्रमाणें शुद्ध असा जो पाठ तो ग्राह्य ही आपली जुनी कल्पना; परंतु हस्तलिखितांच्या पुराव्यावरून जो पाठ कवीच्या हातचा किंवा त्याच्या काळचा असें ठरेल तोच खरा. जुना पाठ अपरिचित म्हणून किंवा आजच्या लेखनपद्धतीला किंवा आजच्या व्याकरणाला धरून नाहीं म्हणून तो बदलणें अशास्त्रीय आहे. हें धोरण लक्षांत ठेवलें म्हणजे आदिपर्वाचो पुढील संहिता वाचतांना वाचकांना गोंधळल्यासारखें होणार नाहीं. माधव चंद्रोबांनीं ज्यावेळीं हें काव्य 'सर्वसंग्रह' मासिकांत प्रथम प्रसिद्ध केलें त्यावेळीं मूळाबरहुकूम छापण्याची थोडीबहुत काळजी घेतली होती; परंतु वा. दा. ओक यांनीं संस्कार करून निर्णयसागर (काव्यसंग्रह) प्रत तयार केली आहे.

---

१६ रघुनाथपंडितविरचित दमयंतीस्वयंवर. १९३५.

१७ Introduction to Indian Textual Criticism, 1941.

एकादें जुनें संस्कृत काव्य छापतांना हा भाषेच्या रूपांचा प्रश्न तेवढासा जाचक होत नाहीं. कारण संस्कृत भाषेला पाणिनीनें केव्हांच स्थैर्य प्राप्त करून दिलें आहे. पण मराठीचा पाणिनि अद्याप जन्माला यावयाचा होता. मराठीचें सर्वसंमत असें व्याकरण तयार झालें नव्हतें. जो जसा उच्चार करी तसें तो लिही. कोणी तत्सम शब्द लिहीत तर कोणी तत्कालीं रूढ असलेलीं त्यांचीं विविध अपभ्रष्ट रूपें किंवा तद्भव शब्द वापरीत, किंवा एकच माणूस लहरीप्रमाणें तत्सम व त्यांचींच निरनिराळीं तद्भव रूपें योजी, असें हस्तलिखितांवरून दिसून येतें. अशा वेळीं यांपैकीं कोणतें रूप संशोधित संहितेमध्यें स्वीकारावें याचें कोडेंच पडतें. उदाहरण : 'गृहस्थ' हा शब्द जुन्या हस्तलिखितांत (पुढें अध्याय २, ओ० ३२, टी०३ पहा) ग्रहस्त, गृहस्त, ग्रहस्थ व गृहस्थ अशा नानाप्रकारें लिहिलेला आढळतो. यांपैकीं शेवटचें रूप नि रा तं यांमध्यें आहे. नि ही छापील संस्कारयुक्त प्रत आहे. तं ही नक्कल असल्यामुळें लेखकाच्या हातून नक्कल करतांना नकळत आधुनिकीकरण झालेलें आहे, अशी शंका आली. केवळ रा या जुन्या प्रतीमध्यें तत्सम रूप आढळलें. पाठांतराकरितां जरी कांहीं प्रती निवडल्या असल्या तरी पाठनिश्चिति करतांना इतर हस्तलिखितांतील पाठांतरें विचारांत घेतलीं आहेत. 'ग्रहस्त' हा शब्द आजच्या दृष्टीनें जरी अशुद्ध असला तरी गेल्या शतकाच्या मध्यापर्यंत शुद्ध मानला जात होता. ता. १२ फेब्रुवारी १८४९ रोजीं प्रसिद्ध झालेल्या 'ज्ञानप्रकाशा'च्या पहिल्या अंकांतही संपादकीय 'प्रस्तावनें'त तो वापरलेला आढळतो. १८५७ सालच्या मोल्स्वर्थच्या शब्दकोशांतही अशा स्वरूपांत तो दिलेला आहे. आणखी एक असा शब्द सांगतों:- संमंध हा शब्द आह्मीं आज भूत-पिशाच या अर्थी योजतों; परंतु जुन्या काळीं 'संबंध' या अर्थी तो सरसकट रूढ होता. अशा शब्दांचें लेखन मीं जुनेंच ठेवलें आहे. चालू शुद्ध-लेखनाप्रमाणें बदलून घेतलें नाहीं. ज्या शब्दांचीं रूपें वैकल्पिक होतीं असें वाटलें तीं दोनही प्रकारें दिलीं आहेत. उदाहरणार्थ रुत्विज-ऋत्विज, रुषि-ऋषि, पुष्टी-पृष्टी, वग्त्र-वक्त्र, युक्ष-इक्षु, रुतु-ऋतु.

आजच्या दृष्टीनें चुकीचीं पण जुन्या काळीं प्रचारांत असलेलीं जगदेश्वर (४·८६), ऋषेश्वर (७·५०) अशीं संधींचीं रूपेंही तशींच ठेविलीं आहेत. स्वतः 'मुक्तेश्वर' हें रूप आजच्या व्याकरणशुद्धतेच्या दृष्टीनें 'मुक्तीश्वर' असेंच असावयास नको काय ? अल्पप्राण व महाप्राण अशा अक्षरांची अदलाबदल जुन्या काळीं फार आढळे. त्यामुळें अस्ती (अस्थि), गुसळणें (घुसळणें), शफत (शपथ), असे शब्द मान्य करावे लागले. मागें 'न' आला असतां पुढील क्रियापदाच्या सुरुवातीच्या अक्षरांतील 'आ' स्वर 'अ' लिहिण्याचा जुन्याकाळीं प्रघात असे. त्याचा भंग केला नाहीं. उदा० न मनी (मानी १·१५०), न संगत (१·५५), न टके (८·७७), न घलीं (२·७६), न पवे (२·९), न वटे (२·८४). श बद्दल स उच्चारण्याची जुन्या काळीं विशेष प्रवृत्ति होती:-सके (शके), सिखरीं (शिखरीं),

सीण, सीघ्र, ।सिर, क्षमासील. पण याच्या उलट, सृष्टीबद्दल श्रृष्टि लिहिण्याची पद्धति दिसली. (१·४)

विशेषनामेंही संस्कृताप्रमाणें न देतां अपभ्रष्ट स्वरूपांत जुन्या काळीं उच्चारिलीं व लिहिलीं जात. उदा०—जन्मेजय, जन्मोजय (जनमेजय), वासुगि (वासुकि), पंडु (पांडु), प्रमिती (प्रमति), मेनिका (मेनका), चवन (च्यवन), अभिमन्य (अभिमन्यु), पातांजळ (पतंजलि), जयमिनि जयमुनि (जैमिनी), मोहनी (मोहिनी), पुष्य (पौष्य). तीं तशींच किंवा वैकल्पिक रीतीनें दिलीं आहेत. दोन ठिकाणीं मूळ महाभारताप्रमाणें संस्करण केलें, सृंजय (१-१७४) आणि श्वेत्य (१-१७६). तेंही करावयास नको होतें, असें छापून झाल्यावर वाटलें.

मूळ संस्कृत महाभारताप्रमाणें कांहीं विशेषनामें किंवा शब्द फिरवून घेणेंही बरोबर नाहीं; कारण आपल्यापुढें जी संस्कृत महाभारताची संहिता आहे तीच मुक्तेश्वराजवळ होती, असें म्हणतां येणार नाहीं. उदाहरणार्थ सातव्या अध्यायाच्या आरंभीं पन्नगसत्रांत सर्प पडले त्यांचीं नांवें दिलीं आहेत तीं सारीं महाभारताच्या नीलकंठी संहितेबरहुकूम आहेत असें नाहीं.

हस्तलिखितांतील प्रत्येक क्षुल्लक फरक पाठांतर म्हणून नमूद केल्यास अनवस्थाप्रसंगच ओढवेल ! नक्कलकाराच्या ज्या उघड चुका किंवा हस्तदोष दिसले त्यांच्याकडे दुर्लक्ष केलें आहे; पण कांहीं अर्थशून्य पाठही शुद्ध पाठ ठरविण्यास उपयोगीं पडतील म्हणून नमूद केले आहेत. ह्रस्व दीर्घ, किंवा 'अंग–आंग' तसेंच 'जोडूनि–जोडोनि' अशांसारखीं वैकल्पिक रूपें पाठांतरें म्हणून नमूद केलीं नाहींत. कांहीं हस्तलिखितांमध्यें अ च्या जागीं निष्कारण आ लिहिला जातो. उदा०आभय (अभय), आवगुण (अवगुण), आखंड (अखंड). अशी प्रवृत्ति पु४ मध्यें फार दिसली. याच्या उलट ख मध्यें आ बद्दल अ लिहिण्याची खोड आहे. उदा० अदरें (आदरें), अज्ञा (आज्ञा), अला (आला), अश्रम (आश्रम). य, श, च, ज, क्ष, बद्दल अनुक्रमें ये (नयेन), शे (शेरण), चे (चेरण), जे (दुर्जेय), क्षे (क्षेमा), उच्चारण्याकडे ओढा कांहीं लेखक दाखवितात. अनुस्वारांसंबंधीं तर अराजकच दिसेल. तंव, तव, तवं, तंवं अशा विविधप्रकारें एकच शब्द लिहिलेला आढळतो. विशेष प्रवृत्ति तवं लिहिण्याकडे दिसली तोच मान्य केला. असें रूप लिहिण्याकडे प्रवृत्ति जुन्या काळीं होती, असें राजवाड्यांच्या ज्ञानेश्वरीवरूनही दिसेल. लावंण्य, कंन्या, अरंण्य असे अनुस्वार क्वचित् दाखविले जातात तेही पाठांतरें म्हणून नमूद केले नाहींत.

(१) " देहबुद्धीचा हातीं " (१·५४), (२) "स्नेहाच्या बाहुवटीं " (२·५०), (३) " जोडल्या हस्तीं " (७·१०८) अशा सारख्या शब्दांच्या जोड्यांत (१) ' देहबुद्धीचां ', (२) ' स्नेहाचां ', (३) ' जोडलां ' अशीं सानुस्वाररूपें पाहिजेत असें दिसतें. सप्तमी विभक्तीमध्यें विशेष्य असलें म्हणजे आधींच्या विशेषणात्मक शब्दाच्या अंत्याक्षरावर सप्तमी विभक्तीचा अनुस्वार देण्याचो यादवकालीन पद्धति होती. ती

मुक्तेश्वरकालींही प्रचलित असावी. पुढील लेखकांनीं अनुस्वार गाळलेला दिसतो. च किंवा ज या मराठी दंततालव्य वर्णाचा उच्चार संस्कृताप्रमाणें च्य किंवा ज्य असा तालव्य केलेला एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांतील मुद्रित ग्रंथांतही आढळतो. 'देहबुद्धीचां हातीं' यांतील 'चा' वरील अनुस्वार गळला तरी 'च' च्य असा वाचल्यामुळें गैरसोय दूर झाली. या ठिकाणीं चावर अनुस्वार देऊन संस्करण करणें मला गैर वाटलें म्हणून आधुनिक रूपें स्वीकारली. तरीपण अशा स्थळांकडे मीं वाचकांचें ठिकठिकाणीं टीपांमध्यें लक्ष वेधलेलें आहे.

प्रस्थापित संहितेमध्यें स्वीकारलेले इछा, स्वछ, कछप, पुछ, आछादणें असे शब्द इच्छा, स्वच्छ, कच्छप, पुच्छ, आच्छादणें असे द्वित्वयुक्त अलिकडे लिहिले जातात, आणि तसा संस्कार करूनच नि मध्यें ते छापले आहेत; परंतु आरंभींच्या मुद्रित ग्रंथांमध्येंदेखील ते प्रस्थापित संहितेप्रमाणें प्रायः दिलेले आढळतील. उच्चैःश्रवा, हाहाःकार अशासारख्या शब्दांत जुन्या काळीं विसर्ग दण्याची प्रथा नव्हती. नि मध्यें याही बाबतींत आधुनिकीकरण केलें आहे. अशीं पाठांतरें प्रत्येक ठिकाणीं नमूद केलींच आहेत, असें नाहीं. पहिल्या अध्यायाचीं नमनाचीं पाठांतरें दिलीं आहेत, परंतु पुढील अध्यायांचीं विस्तारभयास्तव गाळलीं आहेत. अध्यायाच्या शेवटचा अध्यायनाम वगैरे सांगणारा प्रायः अशुद्ध संस्कृतांत आढळणारा मजकूरही गाळला आहे.

हीं जीं वर कांहीं उदाहरणें दिलीं त्यावरून माझें सर्वसामान्य धोरण वाचकांना कळून येईल. शास्त्र व व्यवहार यांची शक्यतोंवर सांगड घालण्याचा माझा प्रयत्न आहे. यानें एकांतिक शास्त्रवादी व एकांतिक व्यवहारवादी यांना संतोष झाला तर मला आनंदच होईल; परंतु त्यांचें समाधान झालें नाहीं तर मला नवल वाटणार नाहीं.

भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूटच्या कामाला १९१९ सालीं सुरुवात करून नमुन्यादाखल (Tentative Edition) म्हणून विराटपर्वाची प्रत शोधून १९२३ सालीं प्रसिद्ध केली. त्यावर जगांतील मोठमोठ्या विद्वानांचीं मतें मिळवून 'महाभारता'च्या आदि-पर्वाच्या कामाला सुरुवात केली. इतकें असूनही संपादक डॉ. वि. स. सुखटणकर आदिपर्वाच्या पाहिल्या खंडाच्या (१९२७) आपल्या प्रस्तावनेंत म्हणतात,

" ... that in these circumstances the editor will occasionally make mistakes—at times perhaps gross mistakes—is as certain as inevitable; for it is to be feared that there is no royal road to success in this incomparably difficult field... More than one attempt will probably have to be made before the ideal is attained. It will, therefore, be prudent not to expect too much from the *first* critical edition, nor to claim too much for it."

डॉ. सुखटणकरांसारख्या 'बलवदपि शिक्षितानां' हा 'आत्मन्यप्रत्यय' पाहिला म्हणजे सर्वतोपरी प्रतिकूल परिस्थितींत काम करणाऱ्या माझ्यासारख्याची काय मनःस्थिति असेल याची कोणालाही सहज कल्पना करतां येईल. समग्र आदिपर्वाची संहिता निश्चित झाल्यावरच मुद्रणाच्या कामाला हात घालणें योग्य झालें असतें; परंतु तसें करण्यांत अनेक धोके दिसले. पालि टेक्स्ट सोसायटीच्या पालि-इंग्लिश डिक्शनरीच्या पश्चात्कथनाच्या (Afterword) उपसंहारांत, " Better now and imperfect than perfect and perhaps never, " हा Dr. William Stede यांनीं दिलेला इशारा वाचला आणि 'गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत्' असें म्हणून तयार असलेल्या अध्यायांची 'कॉपी' सरळ छापखान्यांत जाऊन मुद्रकाच्या स्वाधीन केली! यांत कांहीं दोष राहिले असतील ते दुसऱ्या आवृत्तींत मीच किंवा माझ्या जागीं येणारा दुसरा संपादक काढून टाकील.

पाठांतरें देतांना निरनिराळ्या हस्तलिखितांचीं बोधाक्षरें वर दिलेलींच आहेत. पु पु४ किंवा गो गो२ अशा दोन हस्तलिखितांत तोच पाठ असल्यास तीं अनुक्रमें पु·४ व गो·२ अशीं दाखविलीं आहेत. (+) खूण आहे तो अधिक पाठ व (−) खूण आहे तो कमी पाठ समजावा. कसरीनें खाल्ल्यामुळें किंवा अन्य कारणानें एकादा पाठ दुर्वाच्य किंवा नष्ट झाला असल्यास तो (××) अशी खूण दाखवून निर्दिष्ट केला आहे. प्रक्षिप्त वाटलेल्या ओव्या तळटीपांत पाठांतरांबरोबर दाखविल्या आहेत. आधार देतांना 'वरचाच ग्रंथ पहा' हें " तत्रैव " (*Ibid.*) या शब्दांनीं नमूद केलें आहे व तुलना करा (*Cf.*) असें सांगण्यासाठीं 'तुळा' असें लिहिलें आहे. 'प्रसंप्रा' याचा अर्थ 'प्रस्थापित संहिते-प्रमाणें' असा समजावा.

विद्वान् तज्ज्ञ वाचकांप्रमाणें या ग्रंथाचा उपयोग सर्वसामान्य वाचकांनाही व्हावा असा हेतु आहे. त्यामुळें प्रस्थापित संहितेमध्यें स्वीकारलेल्या शंकास्पद पाठांच्या खालीं डॉ. सुख-टणकरांनीं दिल्याप्रमाणें 'लहरी रेघा' (wavy lines) दिल्या नाहींत. त्यांमुळें सामान्य वाचक गोंधळांत पडतो, असें कांहीं मित्रांचें म्हणणे पडलें. पाठांतरें देण्याची पद्धतीही सर्व-सामान्य वाचक बुचकळ्यांत पडणार नाहीं, अशीच स्वीकारलेली आहे. विस्तारभयास्तव साम्यस्थळें, संदर्भ, व्युत्पत्ति वगैरे गोष्टी निर्दिष्ट करणाऱ्या टीपा देतां आल्या नाहींत. सबंध आदिपर्व छापून झाल्यावर हा प्रयत्न हातीं घेतां येईल. शेवटीं शब्दकोश जोडला आहे त्यानें सामान्य वाचकाची गरज भागेल अशी आशा वाटते.

आणखी नवी माहिती

या ग्रंथांत जोडलेल्या 'श्री मुक्तेश्वराचा शोध' या निबंधांत हिंदुस्थानांत निरनिराळ्या भागांमध्यें सांपडणाऱ्या श्री मुक्तेश्वराच्या देवालयांची माहिती दिली आहे (पृ. २१–२४) तिच्यामध्यें आणखी थोडीशी भर घालतों. गोविंद बाबाजी जोशी नांवाच्या एका गृहस्थानें " गेल्या तीस वर्षांचे पूर्वीचे लोक व त्यांच्या समजुती अर्थात् माझे प्रवासाची हकीकत " या

नांवाचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला आहे (१८९६) त्यांत अमदाबाद येथेंही **ऋणमुक्तेश्वराचें** एक देवालय असल्याचें नमूद केलें आहे (पृ० ३२१ पहा). तसेंच उपरिनिर्दिष्ट निबंधाच्या २२ व्या पृष्टावर मुक्तेश्वरानें अध्यायी ११ मध्यें,

प्रत्यक्ष कासीविश्वेश्वर । स्वल्पाकृति मान्य थोर ।
विशाळ तिळभांडेश्वर । कोणें प्रथम वंदिजे ॥ १०९ ॥

असा ज्या तिळभांडेश्वराचा निर्देश केला आहे तो उज्जयिनीचा असावा, असें मीं मत प्रदर्शित केलें आहे. पण आतां पुढें आलेल्या माहितीवरून तें बदलावें लागेल. कारण उज्जयिनीचा तिळभांडेश्वर माझ्या विनंतीवरून समक्ष पाहून त्याचें वर्णन प्रो. बा. ना. मुंडी आपल्या ५–८–५१ च्या पत्रांत देतात तें असें:–" याचें येथील नांव " तिलकेश्वर " असें सगळे म्हणतात. हें फार मोठें मंदिर आहे. पण **लिंग फारच लहान आहे.** पण तें replaced असावें, असें नंदीवरून वाटतें. उंच ओट्यावर (सुमारें तीन हात उंच) मोठा नंदी आहे तर लिंग एक दीड हातच उंच व अर्धा हात घेराची खोली आहे." मुक्तेश्वरवर्णित हा तिळभांडेश्वर नासिकचा असावा. नासिक गॅझेटियरमध्यें त्याचें वर्णन पुढीलप्रमाणें सांपडतें—

" About fifty yards south–west of Gondeshvar's and Krishneshvar's and about 500 feet west of the river-bank, stands the temple of Tilbhandeshvar... The *ling* is a plain stone pillar two feet high and five feet round. It is the largest *ling* in Násik. It owes its name to a story that every year it grows the length of a grain of sesamum or *til*."[१८]

या वर्णनावरून मुक्तेश्वरानें पाहिलेला तिळभांडेश्वर नासिकचा असावा, असें वाटूं लागतें. या कवीनें ज्या श्रीमुक्तेश्वराचें मुद्रानाम धारण केलें तो हा नासिकचाच मुक्तेश्वर नसेल ना ? उपरिनिर्दिष्ट निबंधाच्या ७ व्या पृष्टावर तेरवाड येथें " कवि मुक्तेश्वराची समाधि " असल्याचें नमूद आहे. पण तेथें ' समाधी 'च्या जागीं " दहनभूमी " असा शब्द योजणें बरोबर होईल. कारण मुक्तश्वरानें संन्यास घेतलेला नमूद नाहीं. सध्यां दहनभूमीवर वृंदावनही नाहीं. गेल्या महिन्यांत तेरवाडला गेलों असतां श्री दत्तात्रेयाच्या देवळापुढें ज्या ठिकाणीं ' वृंदावन ' होतें ती जागा मला कवीचे सध्यांचें वंशज रा. मुक्तेश्वर तेरवाडकर यांनीं दाखविली व तेथें लवकरच नवें वृंदावन बांधणार असल्याचें सांगितलें.

---

१८ **Gazetteer, Vol XVI, Nasik, 1883. p. 509.**

आभार

संशोधनसमितीचे अध्यक्ष महामहोपाध्याय डॉ. पां. वा. काणे व इतर सभासद यांनी माझ्यावर विश्वास टाकला व अनेक अडचणींच्या प्रसंगी योग्य सल्ला, धीर व उत्साह दिला. पाठनिश्चिति करतांना धोरण कोणतें ठेवावें, यासंबंधीं प्रो. ह. दा. वेलणकरांशीं झालेल्या चर्चेचा पुष्कळ उपयोग झाला. तसेंच अनेक संस्थांनीं व मित्रांनीं हस्तलिखितें देऊन व इतर प्रकारें हा ग्रंथ पुढें आणण्यास मदत केली. या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची संधि मला शेवटच्या खंडाच्या वेळीं मिळणारच आहे. परंतु केवळ याच खंडाच्या प्रकाशनाच्या खर्चाकरितां म्हणून मुंबईविद्यापीठानें ७५० रुपयांची देणगी दिली, याबद्दल मी मुंबईविद्यापीठाचा अत्यंत आभारी आहें. पुढील खंडांसही त्यांच्याकडून असाच आश्रय मिळेल अशी मी आशा बाळगितों.

मुंबईसरकार व मुंबईविद्यापीठ यांच्याप्रमाणेंच मराठी भाषिकांचीं जीं इतर सरकारें व विद्यापीठें आहेत त्यांच्याकडूनही मराठी संशोधनमंडळाला मदत मिळणें योग्य आहे. मराठी संशोधनमंडळाचें कार्यालय जरी मुंबईशहरांत असलें, तरीपण तें करीत असलेलें कार्य साऱ्या मराठी भाषिकांकरितां आहे. बृहन्महाराष्ट्रांतील इतर संस्थांनीं व व्यक्तींनींही या कार्याला आपल्या शक्त्यनुसार हातभार लावणें त्यांचें कर्तव्यच ठरतें. हें आपलें कर्तव्य सर्वांनीं जाणलें तर मुक्तेश्वराचीं उपलब्ध पांचही पर्वें शुद्ध स्वरूपांत आम्हीं प्रसिद्ध करूंच; इतकेंच नव्हे तर म. म. पोतदार यांनीं मागें[१९] सुचविल्याप्रमाणें इतर मराठी कवींचीं निवडक पर्वें त्यांना जोडून **चक्री महाभारत** महाराष्ट्राला सादर करणें आम्हांला शक्य होईल. याशिवाय कितीतरी अप्रकाशित काव्यांचें प्रसिद्धीकरण व पैशाच्या अभावीं अडून राहिलेले इतर बहुविध संकल्प आम्हांला तडीला नेतां येतील.

आपले पंतप्रधान व शिक्षणमंत्री श्रीयुत बाळासाहेब खेर यांनीं आपल्या बहुविध कार्यांतून वेळ काढून पुरस्कार लिहून दिला हे आमच्यावर त्यांचे मोठेच उपकार होत.

या पुस्तकाला जोडलेला "मुक्तेश्वराचा शोध" हा निबंध श्री. पु. मं. लाड (I.C.S.) यांच्या अध्यक्षतेखालीं ता. १९ नोव्हेंबर १९५० रोजीं मराठी संशोधनमंडळाच्या मासिक सभेंत वाचला गेला होता. श्रीयुत लाड संशोधनमंडळाच्या कार्यांत अत्यंत आपुलकीनें लक्ष घालतात, हें नमूद करण्यास मला आनंद वाटतो.

---


१९ भा. इ. सं. मं. (त्रैमासिक), वर्ष ११, पृ. २५.

आमच्या संशोधनमंडळाच्या कल्पनेचे मूळ 'योजक' श्री. चिं. द्वा. देशमुख यांच्या व न्या. मू. ग. स. राजाध्यक्ष यांच्या कृपेमुळें, मराठी संशोधनमंडळाच्या प्रकाशनाला मदत म्हणून के. न्या. मू. गोविंद दीनानाथ माडगांवकर ट्रस्टमधून मंडळाला दहा हजार रुपये दोन वर्षांपूर्वीच मिळाले. याच्या व्याजाचा विनियोग माडगांवकरांच्या स्मारकार्थ प्रकाशनाच्या कामीं करावयाचा आहे. इतरांनीही अशा देणग्या देऊन या स्मारक-पद्धतीचें अनुकरण करावें.


या ग्रंथांतील रेखाचित्रें चित्रकार दलाल यांच्या हातचीं आहेत. कांचीच्या मुक्तेश्वराच्या देवळाचा फोटो आर्क्यालॉजिकल डिपार्टमेंट सदर्न सर्कल यांनीं पाठविला. तसेंच उज्जयनीच्या देवालयाचे फोटो प्रो. बा. ना. मुंडी यांनीं, नासिकचा श्री. बा. वा. दातार यांनीं व तेरवाडचे श्री. मुक्तेश्वर तेरवाडकर यांनीं मिळवून दिले. याबद्दल मी त्या सर्वांचा फार ऋणी आहें. मुंबई वैभव प्रेसच्या कामगारांनीं केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचेही आभार मानणें उचित आहे.

मुक्तेश्वराच्या प्रतिभेची ज्यांच्याबद्दल इतकी वाखाणणी करतात तीं मुख्य आख्यानें पुढील भागांत यावयाचींच आहेत. हे भागही लवकरच आम्हीं वाचकांच्या हातांत देऊं शकूं अशी मला उमेद आहे.

९ नोवेंबर १९५१ अ. का. प्रियोळकर




श्री मुक्तेश्वराचें देवालय
कांची, मद्रास.
(श्री मुक्तेश्वराचा शोध,
पृ. २३-२८ पहा.)




कवि मुक्तेश्वराच्या पूर्वजांतील खालील देवालयांतील श्रीदत्तात्रेयाच्या पादुका.



कवि मुक्तेश्वराच्या वृंदावनाजवळील श्रीदत्तात्रेयाचें देऊळ, तेरवाड. (श्री मुक्तेश्वराचा शोध, प. ६–७ पहा.)



श्री मुक्तीश्वराचें देवालय
उज्जयिनी.
(श्री मुक्तेश्वराचा शोध,
पृ. २२ पहा.)



वरील देवालयांतील
श्री मुक्तीश्वराची मूर्ति



श्री मुक्तेश्वर, नासिक.
(श्री मुक्तेश्वराचा शोध,
पृ. २३ व प्राक्कथन,
पृ. १८ पहा.)

श्रीमुक्तेश्वराचा शोध

जो सकळ चातुर्याची खाणी । मुक्तेश्वर कवि प्रसिद्ध जनीं ।
भारतो टीका केली त्याणीं । ऐकतां श्रवणीं सुख वाटे ॥

—महीपति–भक्तलीलामृत.

श्रीमुक्तेश्वर कविवर यातें कोण न शुभेच्छु वंदील ? ।
बंदी लक्ष जयाचे यश ज्याचें भव्य जेंवि मंदील ॥

—मोरोपंत–सन्मणिमाला.

जुन्या मराठी वाङ्मयांत कवि या दृष्टीनें मुक्तेश्वराचें स्थान पहिलें आहे, याबद्दल रसिक व चिकित्सक विद्वानमांध्यें एकवाक्यता असलेली दिसते. ' महाराष्ट्र–सारस्वत ' कार विनायक लक्ष्मण भावे लिहितात,

" त्याला (मुक्तेश्वराला) मराठींतला सर्वांत श्रेष्ठ दर्जाचा कवि असें म्हणणारे लोक " पुष्कळ आहेत. कांहीं इसम—विशेषतः कथेंत आणि जेवणावळींत पंतांच्या आर्येला " लाचावलेले, व एकेका आर्येचे दहा दहा अर्थ करून दाखवण्यांत सर्व रसिकता आहे " असें समजणारे कांहीं इसम—मुक्तेश्वराला सिंहासनाचा मान स्वतः होऊन देत " नाहींत हें खरें आहे. पण तो मान कोणी त्याला दिला असतां ते मुक्तेश्वराच्या विरुद्ध " फारसे बोलत नाहींत. याचें एक आणि मुख्य कारण असें आहे कीं, त्यांनीं मुक्तेश्वराचें " काव्य वाचलेलें नसतें; व त्याची चटक त्यांच्या जिभेला व कानाला लागलेली नसते. " बाकी ज्यानें एकदां मुक्तेश्वरी आदिपर्वांतील आख्यानांचा स्वाद चाखला आहे, तो " त्यांतील रसानें वेडा होऊन पुन्हां पुन्हां तेथेंच भ्रमत राहतो. वाहत्या पाण्याच्या धब - " धब्याचा धोत पाहून कोणाचे डोळे विटले आहेत ? गोड आम्रफळें खातां खातां त्यांची " कोणाच्या जिभेला शिसारी आली आहे ? गंधर्वांच्या गाण्यानें आणि कोकिळेच्या स्वरानें " कोणाच्या कानठळ्या बसल्या आहेत ? आणि कपाळ उठलें आहे ? तसेंच मुक्तेश्वराचें " गोड काव्य वाचीत असतां कोणाला त्याचा कंटाळा वाटला आहे ? शरद् ऋतूच्या " स्वच्छ चांदण्यांत चांदण्यानें न बोलावतां लोक जसे आपण होऊन तिकडे जातात " किंवा ढळढळित उन्हांत दुपारच्या वेळीं झाडांच्या गर्द व शीतळ छायेंत " आमंत्रणाची अपेक्षा न करतां स्वतः होऊन लोक जाऊन बसतात, किंवा जाई- " मोगऱ्यानें विनवण्या केल्याशिवाय त्यांचा वास लोक एकसारखा घेतात, त्याप्रमाणें " ज्याला सहृदयता आहे तो रसिक कोणीही न विनवतां, न सांगतां, आग्रह न करतां, " आपण होऊन मुक्तेश्वराचीं गोड आख्यानें पुन्हां पुन्हां वाचीत सुटतो. आणि पोथी " गुंडाळून ठेवल्यावरहि त्यांतील ओंव्या एकसारख्या आपल्याशींच गुणगुणत राहतो

" असा हा मुक्तेश्वर कवि लोकोत्तर आहे. आणि पुष्कळ लोकोत्तर गोष्टींप्रमाणें या " लोकोत्तर कवीसंबंधींही खात्रीलायक अशी माहिती फारच थोडी आहे. "[१]

भावे हे साधे प्राकृत गृहस्थ झाले. पण संस्कृत महाभारताचा सखोल अभ्यास करून भारताचार्य अशी पदवी लाभलेले चिंतामण विनायक वैद्यही म्हणतात, " मुक्तेश्वराचें " महाभारत हा ग्रंथ महाराष्ट्रभाषेच्या जुन्या वाङ्मयांतील एक उच्चतम पदवीचा आहे. "[२]

इतकेंच नव्हे तर याही पुढें जाऊन ते म्हणतात कीं, हा ग्रंथ मूळ भारताशीं स्पर्धा करणारा किंवा त्याच्यावर ताणही करण्याच्या योग्यतेचा आहे. मुक्तेश्वराच्या वनपर्वासंबंधीं लिहितांना वैद्यांनीं हें विधान केलेलें आहे. वनपर्व हें मुक्तेश्वराच्या आदिपर्वापेक्षां कमी प्रतीचें आहे. मुक्तेश्वराचें आदिपर्व त्यांनीं पाहिल्याचें दिसत नाहीं. तें वाचलें असतां त्यांना किती आनंद झाला असता याची कल्पनाच केलेली बरी. अशी एक आख्यायिका आहेः–"मुक्तेश्वरानें " अठरा पर्वें भारत तयार करून तें आपला मातामह एकनाथ यास दाखविलें. तें मूळ " ग्रंथापेक्षां अधिक रसाळ उतरलें आहे असे पाहून व्यासमुनीकृत ग्रंथाचा याचे योगानें " अव्हेर न व्हावा म्हणून एकनाथानें सदर्हू ग्रंथ गंगेस (गोदावरीस) अर्पण करावयास " त्यास सांगितलें. तदनुरूप मुक्तेश्वरानें ग्रंथ गंगेंत टाकला. परंतु बहुत दिवस श्रम " करून तो फुकट दवडिल्याबद्दल वाईट वाटून तो शोक करूं लागला. तेव्हां ' गंगेजवळ " प्रसाद माग ' असें एकनाथाने सांगितल्यावरून मुक्तेश्वरानें तसें केले. तेव्हां गंगेनें " पाहिलीं चार पर्वें मात्र परत दिलीं ! "[३]

अशा दंतकथांवर माझा विश्वास नाहीं; परंतु चिंतामणराव वैद्यांसारख्यांचे प्रशंसोद्गार वाचून एखाद्याचा त्यांवर भरंवसा बसण्याचा संभव आहे.

मराठी व संस्कृत अशा दोघां विद्वानांचीं हीं मतें झालीं. आतां आंग्लभाषेचा अखंड व्यासंग केलेल्या पंडितांचे प्रतिनिधि म्हणून फर्ग्युसन कॉलेजचे इंग्रजी वाङ्मयाचे प्रोफेसर वा. ब. पटवर्धन यांचें मुक्तेश्वरासंबंधींचें मत विचारांत घेतां येण्यासारखें आहे. ते आपल्या विल्सन फिलोलॉजिकल लेक्चर्समध्ये काय म्हणतात पहा—

" The first poet who no doubt caught the poetic fire from " the torch set aflame by the Bhakti School, but who laid " it freely at the service of the literary art, and " *composed for the sake of pure joy of literary achievement*, " was Mukteshwar, a Marathi poet of the very best

---

१ **महाराष्ट्र-सारस्वत** (आ० १ ली), शके १८४६. पृ० २८२–३.

२ **निबंध आणि भाषणें**, १९१५. पृ० १४३.

३ **काव्येतिहाससंग्रह**, शके १८०१. "मुक्तेश्वर" पृ० ३.

"order historically. Poetry was in his blood. For he was
"the grandson of Ekanath, being the son of the latter's
"daughter.

\+ + + +

"The Mahabharata of Mukteshwar is indeed a mine of
"poetic beauties. In adapting the Sanskrit epic in
"Marathi, Mukteshwar was a predecessor of a great
"literary artist of a later age, Moropant. It is both
"interesting and instructive to compare and contrast the
"works of the two poets. Mukteshwar's Mahabharata
"appears to be far more romantic than that of Moropant.
"Mukteshwar is free and often independent in his
"imagery and poetic setting. He abbreviates or expands
"the original Sanskrit story, and the flow of his poetry is
"unfettered. The natural ease with which Mukteshwar's
"images and poetic conceits follow one another, the glow
"and flash of his fancy and imagination, the delicate
"sensitiveness of his ear to the music of words and the
"scrupulousness and nicety of his judgment in the
"selection of right words in the right place, are
"characteristics that have no parallel in the range of
"Marathi Literature. Mukteshwar's descriptions are
"drawn from his own vivid imagination, and often have
"a tinge of local colour. He was the first to press into
"the service of his poetic Muse materials from the social,
"political and religious life around him. This local
"colouring may be a flaw from the point of view of true
"art, but it establishes the originality and independence
"of the poet. The one feature of Mukteshwar's poetic
"work that places him decidedly above his distinguished
"successor, is his absolute freedom from literary
"bondage. Laws of art whether established by tradi-
"tion, or self-imposed, are not suffered by him to get
"stronger than his genius. He does not let them
"arrogate to themselves the power to rule him. He is

" always supreme and governs them, rather than governed
" by them. Literary ornaments and rhetorical flourishes
" that find appropriate place in Mukteshwar's work are
" thus servants to his poetry and always add to its
" beauty, never once tarnish it. The excellences of
" Mukteshwar's Mahabharata are so varied, so frequent
" and so eminent, that no amount of quotation will be
" adequate."[४]

मुक्तेश्वरासंबंधीं असेच प्रशंसोद्गार आणखीही पुष्कळच देतां येतील. रसिकवर्य कृष्णशास्त्री चिपळुणकरांसंबंधीं विष्णुशास्त्री निबंधमालेंत लिहितात, " महाराष्ट्रकवींत 'कवि' " ही संज्ञा एका मुक्तेश्वराला मात्र बरोबर रीतीनें लागेल असें ते नेहमीं म्हणत असत. "[५] हरि नारायण आपटे ठाणें येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वार्षिकोत्सवाच्या अध्यक्षपदावरून मुक्तेश्वराविषयीं म्हणतात, " त्याच्या भाषेंत कृत्रिमता बिलकूल नाहीं. त्याच्या उपमा " अगदीं सहज. निसर्गमनोहर अशा युवतीच्या दर्शनानें जो आनंद होतो तो आनंद " मुक्तेश्वराच्या काव्यापासून होतो. तसा शुद्धानंद पंडितांच्या किंवा पंतांच्या काव्यापासून " होत नाहीं. "[६] अशे प्रशंसात्मक उतारे आणखी किती म्हणून द्यावे ?

मुक्तेश्वर हा जरी असा अद्वितीय कवि म्हटला तरी त्याच्या संबंधीं वैयक्तिक माहिती असावी तितकी उपलब्ध नाहीं. असें असण्याचें एक मुख्य कारण हें कीं, ज्याच्या भोंवतीं भाविकतेचें वलय असतें, असा तो संतकवि नाहीं. संतकवींचा शिष्यप्रशिष्यांमुळें संप्रदाय निर्माण होतो आणि चमत्कारपूर्ण कां होईना खरीखोटी माहिती त्याच्यासंबंधीं जमा होते व ती मागें राहूंहि शकते. मुक्तेश्वर, रघुनाथपंडित, सामराज, मोरोपंत हे संतकवि नसून कलाकवि आहेत. त्यामुळें अगदीं अलिकडचा मोरोपंत सोडला तर जुन्या कलाकवींची आपणांस विशेष माहिती मिळत नाहीं. तरी पण समाधानाची गोष्ट ही कीं, मुक्तेश्वरानें स्वतःसंबधीं थोडीशी माहिती आपल्या ग्रंथांमध्यें कोठेंकोठें नमूद करून ठेवलेली आहे. पण त्याचें वाङ्मय शुद्ध स्वरूपांत आपल्यापुढें नसल्यामुळें अपपाठांनीं त्या माहितीला क्वचित् विकृत स्वरूप प्राप्त झालें आहे व त्यापासून भलतेच शोध पुढें आले आहेत. एकाद्या जुन्या ग्रंथकाराच्या ग्रंथांचीं हस्तलिखितें गोळा करून शुद्ध स्वरूपांत तो प्रकाशित केल्यास त्यापासून ग्रंथकाराच्या चरित्रावर किंवा अन्य ऐतिहासिक प्रश्नांवर नवा प्रकाश पडण्याचा संभव असतो. डॉ. रा. गो. भांडारकर यांनीं मुंबई प्रांतांतील संस्कृत हस्तलिखितांसंबंधीं १८८२-८३ चें जें निवेदन केलें आहे त्यांत ते म्हणतात,

---

४ **The Fergusson College Magazine**, Vol. IX, No. 4 (1917). pp. 134-137.

५ **निबंधमाला**, अं० ५९. पृ० १९ टीप पहा.

६ **मराठी वाङ्मयाचा अभ्यास**, १९२७. पृ० १२.

"The object in making collections of manuscripts is, "I apprehend, not only to procure copies of rare works "but also to secure materials for critical editions of such "as though not rare are of great importance, or for the "determination of the correct text of any particular "passage in them whenever a weighty issue hangs on it."

मुक्तेश्वराच्या वाङ्मयाच्या संशोधनाला आपल्या मराठी संशोधनमंडळामार्फत नुकतीच कोठें सुरुवात झाली आहे. हें काम ज्यावेळीं पुरें होईल, त्यावेळींच निश्चित कांहींतरी विशेष सांगतां येईल. तरीपण आतांपर्यंत झालेल्या अभ्यासानें काय विचार मनांत आले ते नमूद करून ठेवीत आहें. जास्त संशोधनानंतर त्यांत दुरुस्ती करीन किंवा भर घालीन, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

मुक्तेश्वराच्या स्वतःच्या लिखाणांत त्याच्या संबंधीं काय माहिती सांपडते व त्यांतील निश्चित कोणती व शंकास्पद कोणती याचाही विचार करूं;

मातृजनक जनार्दनी । एकनाथ नामियेला ॥

—आदिपर्व, अ० १, ७७.

यावरून मुक्तेश्वर हा एकनाथाच्या मुलीचा मुलगा होता, हें दिसून येतें. यासंबंधीं वाद नाहीं.

(१) सुचिरसहजवासें गौतमीच्या तटाकीं ।
अतुट भजनपंथें पंथ टाकीत टांकी ।
द्विजवर कविनामा मुद्गलू अत्रिगोत्रीं ।
विमळ वचनमुक्तें लेववी संतश्रोत्रीं ॥ ४७० ॥

—रामायण (युद्धकांड).

(२) गोदावरीतटनिवासी । अत्रिगोत्री पवित्र ऋषि ।
चिंतामणी गुणैकरासी —। पासाव जन्म जयाचा ॥
तो **मुद्गल चिंतामणिसुत । लीलाविश्वंभर जगविख्यात ।**
व्यासभारतींचा अर्थ । महाराष्ट्र बोलिला ॥

—सभापर्व, (उपसंहार).

(३) प्रसिद्ध महाराष्ट्रदेशीं । गोदावरीतटनिवासी ।
अत्रिगोत्र पवित्रवंशीं । जन्म जाहला जयातें ॥ ६ ॥
तो चिंतामणिभूदेवकुमर । श्रीदत्तांघ्रिपद्मभ्रमर ।
श्रोतयां विनवी मुक्तेश्वर । क्षमा कीजे समस्तीं ॥ ७ ॥

करवीरलक्ष्मी विष्णुभाजा । भैरव सुवर्णपुरींचा राजा ।
उभय कुळदैवतीं माझा । मस्तक पायीं स्पर्शिला ॥ ८ ॥
—आदिपर्व, (उपसंहार).

(४) लीलाविश्वंभर गुरुचरणीं । पुष्पांजली वचनसुमनीं ।
मुक्तेश्वरें अर्पूनी मनीं । कृतकृत्यता मानिली ॥ २ ॥
—वनपर्व, (उपसंहार).

(५) शक्रविधीच्या मस्तकीं । ज्याची पादुका मिरवे निकी ।
तो विश्वंभर गुरु पिनाकी । विष्णू आपण विश्वात्मा ॥ २१ ॥
तेणें प्रेरिला कवि किंकर । तदाज्ञेनें वदे मुक्तेश्वर ।
परिसोत पुढारें करुणाकर । संत माहेर आमुचें ॥ २२ ॥
—विराटपर्व, (उपसंहार).

हे जे पाठ वर दिले आहेत ते सर्वसंग्रह व काव्यसंग्रह या छापील प्रतींप्रमाणें आहेत. यांवरून ज्या गोष्टी सिद्ध होतात त्या या:—

(१) मुक्तेश्वराचें वास्तव्यस्थान गोदावरीतटीं म्हणजे पैठणास होतें. रामायणांत त्यानें निर्दिष्ट केलेली गौतमी म्हणजे गोदावरी होय, असें रामायणाचे संपादकद्वय ज. बा. ओक व वा. दा. ओक यांचें मत आहे.[७]

परंतु वि. ल. भावे यांच्या मतें गौतमी ही काशीची नदी असावी.[८]

यावरून फार तर, रामायण रचतांना या कवीचें वास्तव्यस्थान काशीला होतें असें म्हणतां येईल.

(२) त्याचें गोत्र अत्रि होतें, त्याच्या वडिलांचें नांव चिंतामणि होतें, त्याचा कुळ-देव सोनारीचा भैरव व कोल्हापूरची महालक्ष्मी, इतक्या गोष्टी स्पष्ट आहेत. परंतु ' **द्विजवर कविनामा मुद्गलू अत्रिगोत्री** ' व ' **तो मुद्गल चिंतामणिसुत । लीलाविश्वंभर विख्यात** ' या चरणांनीं पुष्कळ संशोधकांना फारच घोटाळ्यांत टाकलेलें आहे ! मुद्गल हें मुक्तेश्वराचें आडनांव असून विश्वंभर हें त्याच्या वडिलांचें म्हणजे चिंतामणीचें दुसरें नांव होय, अशी पुष्कळांनीं आपली चुकीची समजूत करून घेतलेली आहे अशी माझी कल्पना आहे. लीला हें मुक्तेश्वराच्या आईचें नांव असेंही ते म्हणतात.

विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं कांहीं वर्षांमागें ग्रंथमालेंत मुक्तेश्वरावर एक लेख लिहिला होता. कुरुंदवाडापासून एका मैलावर पंचगंगेच्या तीरीं तेरवाड म्हणून एक गांव आहे.

---

७ **रामायण** (काव्यसंग्रह), १८९१. पृ० १०७.

८ **महाराष्ट्र-सारस्वत**, भाग १ ला. पृ० २८४.

तेथें कवि मुक्तेश्वराची समाधि असून त्याचे वंशजही तेथें राहातात. त्यांच्याकडे सांपडलेल्या २२ जुलै १७२७ व ३ मे १७५९ च्या दोन सनदा कोल्हापूरच्या शंभु छत्रपतीनें दिलेल्या त्या लेखांत प्रसिद्ध करण्यांत आल्या आहेत. त्यांत " थोरले मुक्तेश्वर गोसावी हे श्री एकनाथ-" स्वामींची कन्या गंगाबाईचे पुत्र यांचें वृंदावन मौजे तेरवाड, प्राा रायबाग येथें आहे. तेथील " पूजा, उत्साह, ब्राह्मणसंतर्पणादिकांची अनुकुलता होयसारखें " करण्यास तेरवाड गांव इनाम करून दिला असल्याचा मजकूर आहे. महीपति व केशव या एकनाथाच्या जुन्या चरित्रकारांनीं एकनाथाला गोदू व गंगा अशा दोन कन्या होत्या, असें लिहिलें आहेः—

गिरजाबाई सुक्षेत्र जाण । प्रथम प्रसवली कन्यारत्न ।
गोदुबाई नामाभिधान । तिजकारणें ठेविलें ॥ ३६ ॥
तिचे पाठीवर पुत्र जाहला । हरी नाम ठेविलें तयाला ।
थोर होतांचि व्रतबंध केला । पढों लागला ब्रह्मशाळे ॥ ३७ ॥
तयाचे पाठीवर कन्या पाहीं । तिचें नाम गंगाबाई ।
दिधली असे कवणे ठाईं । वृत्तांत तोही अवधारा ॥ ३८ ॥
येक चिंतोपंत नांवें निर्धारीं । गृहस्थ होता प्रतिष्ठानक्षेत्रीं ।
गोदुबाई ज्येष्ठ कुमरी । तयाचे घरीं दिधली ॥ ३९ ॥
आणिक कर्नाटक देशांत । जुना सोयरा नांदे गृहस्थ ।
गंगाबाई त्याच्या पुत्रातें । देवोनी त्वरित लग्न केलें ॥ ४० ॥
गंगाबाईस पुत्र जाण । पुंडाजी त्याचें नामाभिधान ।
तोही करीत विष्णुभजन । निजप्रीतीनें आपुल्या ॥ ४१ ॥

—**महीपति** (भक्तलीलामृत, अ० २३).

श्रीनाथ कृपेसी सत्पात्र । गिरिजाबाई सुक्षेत्र ।
प्रसवली ते एक पुत्र । कन्या विचित्र पैं दोघी ॥ ११ ॥
पुत्राभिधान ठेविलें हरि । गोदुबाई जेष्ठ कुमारी ।
चित्तोत्पत्ति प्रतिष्ठानपुरीं । त्याचे घरीं ते अर्पिली ॥ १२ ॥
कनिष्ठ गंगाबाई । कर्नाटकाप्रती दिधली विवाहीं ।
पुंड निजप्राप्ति पाहीं । हरिभक्ति तेही विशेष करी ॥ १३ ॥

—**केशव** (एकनाथचरित्र, अ० २८).

महीपति व केशव यांच्या हकिकतींतील विलक्षण साम्यावरून एक दुसऱ्याचा अनुवाद स्पष्ट दिसतो. भक्तलीलामृत हा महीपतीचा ग्रंथ शके १६९६ सालीं समाप्त झाला, व केशवकृत एकनाथस्वामीच्या चरित्राच्या शेवटीं समाप्तिशक शके १७१४ असा दिला आहे.

त्यावरून कोणी कोणाची उसनवारी केली तें स्पष्ट दिसून येईल. तेव्हां पहिल्या महीपतीच्याच ग्रंथाचा विचार करूः—

महीपतीनें आपल्या ग्रंथांत मुक्तेश्वर हा गोदावरीचा मुलगा असें मुळींच म्हटलेलें नाहीं, ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. कर्नाटकांत दिलेल्या गंगाबाईच्या पुंढाजीचा उल्लेख केला पण मुक्तेश्वराचा उल्लेख केलेला नाहीं. त्यावरून त्यास तो एकनाथाचा नातू म्हणून माहीत नसावा. मुक्तेश्वरानें आपल्या पित्याचें नांव चिंतामणि असें दिलें आहे, व महीपतीनें

येक चिंतोपंत नांवें निर्धारीं । गृहस्थ होता प्रतिष्ठानक्षेत्रीं ।
गोदुबाई ज्येष्ठकुमरी । तयाचे घरीं दिधली ॥

असें लिहिलें आहे. त्यावरून मुक्तेश्वर हा या गोदावरीचा मुलगा अशी समजूत दृढ झालेली दिसते.

मुक्तेश्वर हा गोदेचा मुलगा ही जी जुनी कल्पना तिला या सनदेंतील उल्लेखानें धक्का मिळालेला आहे; परंतु या दोनही कल्पनांचा राजवाड्यांनीं मेळ घातला असून त्यांत लीला या नांवाचाही समावेश करून त्रिवेणीसंगम साधला आहे. राजवाडे लिहितातः—

" मुक्तेश्वराचें गोत्र अत्रि व सूत्र आश्वलायन होतें. त्याचें उपनाम मुद्गल होतें असें तो " मुद्गल चिंतामणिसुत ' ह्या सभापर्वाच्या उपसंहारांतील तिसऱ्या ओवीच्या प्रथम चरणा- " वरून दिसतें. त्याच्या आईचें माहेरचें नांव गोदावरी, सासरचें नांव गंगाबाई, आणि " एकनाथानें प्रेमानें ठेवलेलें व मुक्तेश्वरानें बोबडेपणीं उचललेलें लाडकें नांव लीला होतें. " मुक्तेश्वराच्या आईच्या ह्या तीन नांवांमुळें आजपर्यंत पुष्कळ लोक घोटाळ्यांत पडत. " उपरिमुद्रित लेखांत हिचें नांव गंगा आहे. मुक्तेश्वर आपल्या काव्यांत हिला लीला " म्हणून संबोखितो. आणि एकनाथाच्या चरित्रांत व इतर ठिकाणीं गोदा या नांवानें " हिचा उल्लेख होतो. हीं तिन्ही नांवें खरीं असून संशयाला मात्र कारण झालीं होतीं. " मुक्तेश्वराच्या बापाचें पाळण्यांतील नांव चिंतामणि व जनांतील टोपण विश्वंभर होतें. " ह्या टोपण नांवाचा मुक्तेश्वर वारंवार उल्लेख करतो. परंतु आईचें नांव अगोदर व बापाचें " नांव पाठीमागून असा क्रम मुक्तेश्वराच्या सर्व काव्यांत आढळतो. मुक्तेश्वराचा गुरु त्याचा " बाप विश्वंभर होता, दुसरा कोणी नव्हता. "

राजवाड्यांची ही कविकल्पना दिसते. मुक्तेश्वर आईला लीला संबोखितो किंवा बापाला विश्वंभर म्हणतो, असें म्हणावयाला त्याच्या काव्यांत तरी आधार आहे असें मला वाटत नाहीं.

पांगारकरांनीं कविवर्य मुक्तेश्वर या आपल्या निबंधांत राजवाड्यांचाच अनुवाद केलेला दिसतो. ते लिहितात, " नाथांनीं आपल्या कन्येला भगवंताची लीला आठवून ' लीला ' " हें नांव ज्या परमार्थभावनेनें ठेवलें त्याच भावनेनें लीलेच्या पतीला ते ' विश्वंभर '

" म्हणू लागले. ' लीला कोणाची ? विश्वंभराची '. याप्रमाणें चिंतामणिशास्त्री यांचें नांव " विश्वंभर पडलें ! मुक्तेश्वरांनीं आपल्या ग्रंथांत ' लीलाविश्वंभर ' पदानें आपल्या गुरूचा " उल्लेख जागोजाग केला आहे. यांत आई आणि बाप या दोघांच्याहि नांवाचा आयता " उच्चार होतो. लीलाविश्वंभर हे गुरु व दत्त हें उपास्य. गुरु व उपास्य यांची अभिन्नता " हें गुरुपरंपरेचें वर्म ध्यानीं आणतां लीलाविश्वंभरपदानें गुरूचा व दत्ताचा उल्लेख मुक्ते- " श्वरानें केला आहे, हें युक्तच आहे. "[९]

तिसरे विख्यात महाराष्ट्रवाङ्मयसंशोधक वि. ल. भावे यांना लीलाविश्वंभर हे मुक्तेश्वराचा गुरु हें मान्य आहे.[१०] त्यावरील तळटीपेंत ते लिहितातः—

" कोणी म्हणतात कीं मुक्तेश्वराच्या आईचें नाथांनीं ठेवलेलें लाडकें नांव लीलाबाई व " तिच्या नवऱ्याचें नांव विश्वंभर. " याला भावे आधार देतात—

एकनाथकन्या नाम लीलाबाई । प्रीति तिचे ठायीं बहु असे ॥
वर्षें जालीं सात लग्नाची योजना । लोक करिती जाणा ठाई ठाई ॥
विश्वंभर नामें विप्र येक आला । कोणी नाहीं त्याला मागेंपुढें ॥
..... मोठे मोठे आले न देवोनि तयांसी । देवोनिया यासीं लग्न केलें ॥
घरींच ठेविलें भजन कीर्तन । अनुग्रह जाण दिला तया ॥

—**भीमस्वामी** (भक्तलीलामृत).

या भीमस्वामींच्या उताऱ्यावरून लीलाविश्वंभर हीं मुक्तेश्वराचीं मातापितरें होतीं, ही कल्पना अलीकडची नसून जुनीच दिसते.

भीमस्वामी हे रामदासस्वामीच्या शिष्यपरंपरेपैकीं असून शिरगांवमठाचे अधिपति होते. भक्तलीलामृत हा अभंगात्मक ग्रंथ त्यांनीं शके १७१९ म्हणजे इ. स. १७९७ मध्यें लिहिला. त्याला विशेष ऐतिहासिक महत्त्व देतां येईल, असें वाटत नाहीं. अशीच दुसरी एक हरिदासी कथा निबंधचंद्रिकेमध्यें मुक्तेश्वरावर जो निबंध आहे,[११] त्यांत पाहावयास सांपडते. हा निबंधलेखक लिहितो,

" एकनाथमहाराज यांची ज्येष्ठ कन्या गोदुबाई चिंतोपंतास दिली होती. गोदुबाईचें सासरचें " नांव लीलाबाई असें होतें. असें म्हणतात कीं, मुक्तेश्वराचे वडील चिंतोपंत उर्फ विश्वंभरबुवा म्हांना

---

९ **कविवर्य मुक्तेश्वर**, १९२२. पृ० १४.

१० **महाराष्ट्र-सारस्वत** (भाग १ ला). पृ० २८४.

११ काव्येतिहाससंग्रहांतील मुक्तेश्वरी वनपर्वाच्या (शके १८०१) उपसंहारावरून ही दंतकथा घेतलेली दिसते.

" वेड्यांचा फार नाद असे. यामुळें लीलाबाईस संसारसुख कसलें तें मिळेनासें झालें. ही गोष्ट
" लीलाबाईनें नाथांस कळविली. नाथांनीं लीलाबाईस सांगितलें कीं, ' आपल्या पतीकडून मला
" भोजनास बोलाव, मग ओघाओघानें गोष्ट काढतां येईल. ' लीलाबाईच्या आग्रहावरून
" विश्वंभरबुवांनीं नाथांस भोजनास बोलाविलें. भोजनसमयीं बोलतां बोलतां ' स्त्रीस तरणोपाय
" कोणता ' असा नाथांनीं जामातास प्रश्न केला. विश्वंभरबुवांनीं ' पति ' असें उत्तर
" दिलें. त्यावर नाथांनीं जामातास सांगितलें कीं, ' पती जर स्त्रीचा समाचार न घेईल
" तर त्या अनाथ अबलेनें काय करावें ! आपण पाहिजे तसे रात्रीं बाहेर जातां, आपल्या
" पत्नीची वाट काय ? आतां आपणांस इतकेंच सांगणें आहे कीं, आपण आपल्या
" मर्जीस येईल तसें करा, पण रात्रीं बाहेर जाण्यापूर्वी भोजनोत्तर श्रीभगवद्गीतेचा
" एक अध्याय रोज आपले पत्नीस वाचून दाखवून त्याचा तिला अर्थ सांगत जा,
" म्हणजे झालें. ' विश्वंभरबुवांनीं गोष्ट तर कबूल केली. त्याप्रमाणें त्या दिवशीं रात्रीं
" पहिला अध्याय बुवांनीं लीलाबाईस वाचून दाखविला, मग स्वारी बाहेर गेली. दुसऱ्या
" दिवशीं दुसऱ्या अध्यायास आरंभ झाला. बुवांची स्वारी पहिले दहा श्लोक आटपून
" अकराव्यावर येऊन थडकली. पुढें:—

अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ।
गतासूनगतासूंश्च नानुशोचंति पंडिताः ॥

" या श्लोकाचा विचार करतां करतां रात्र निघून गेली; बुवा बाहेर गेले नाहींत. असो.
" याप्रमाणें होतां होतां विश्वंभरबुवांचा नाद सुटून लीलाबाईस यथाकाळीं पुत्र झाला.
" त्याचें नांव मुक्तेश्वर ठेविलें. (शके १५३१; सन १६०९)"[१२]

आतांपर्यंतच्या हकिकतीवरून मुक्तेश्वराच्या आईचें नांव लीला व बापाचें नांव विश्वंभर या कल्पनेनें आपल्या लोकांना कसें भारलें होतें व या कल्पनेचा उगम व विकास कसा झाला हें कळून येईल.

तो मुद्गल चिंतामणिसुत । लीलाविश्वंभर जगविख्यात ।

हा सभापर्वाच्या उपसंहारांतील निर्देश ' लीला–विश्वंभर ' हीं मुक्तेश्वराचीं मातापितरें या कल्पनेच्या मुळाशीं आहेत, हें वर दाखविलेंच आहे; परंतु ही कल्पना खोटी असल्याची शंका प्रथम बाळकृष्ण अनंत भिडे यांनीं पुढें मांडिली. ते म्हणतात,
" वरील ओवींतून ' लीला–विश्वंभर ' ही मुक्तेश्वराचीं मातापितरें होत, हा अर्थ काढणें
" केवळ हास्यास्पद होय. अर्थ करतांना वाक्यरचनेला जर कांहीं महत्त्व द्यावयाचें असेल,
" तर वरील अर्थ निघणें संभवतें तरी कसें, हेंच मोठें कोडें आहे. ' चिंतामणिसुत '

---

१२ **निबंधचंद्रिका**, अंक ४०, १८८६. पृ० २.

" म्हणजे मुक्तेश्वर म्हणावयाचें तर मग ' लीलाविश्वंभर जगविख्यात ' याचा संबंध
" चिंतामणीशीं लागणें संभाव्य तरी आहे काय ? या ओवींत ' चिंतामणि ' व ' लीला-
" विश्वंभर ' यांचें ऐक्य सिद्ध होणें बाजूसच राहून, उलट त्यांचें भिन्नत्वच गळीं उतरतें;
" कारण, जर या ओवीचा कांहीं अर्थ झालाच, तर ' चिंतामणिसुत हाच लीलाविश्वंभर,
" जगविख्यात ' असा होईल. यांत ' चिंतामणि ' व ' लीलाविश्वंभर ' एकच होत, ही गोष्ट
" शोधूं पहाणें निरर्थक दिसतें. "[१३]

माझीं स्वतःचीं मतें या विषयावर स्वतंत्रपणें निश्चित झाल्यावर मीं अलिकडेच भिडे यांचा वरील निबंध लक्षपूर्वक वाचला व त्यांचा व माझा निष्कर्ष कांहीं बाबतींत जुळतो, हें पाहून मला समाधान वाटलें. मुक्तेश्वरावर निरनिराळ्या विद्वानांनीं जे आतांपर्यंत निबंध लिहिले आहेत, त्यांत चिकित्सक दृष्टि सर्वांत जास्त मला भिडे यांच्यामध्यें दिसली. तरीपण युक्तिवादाबरोबर निराळा स्वतंत्र पुरावा त्यांना पुढें करतां आला नाहीं. शिवाय

तो मुद्गल चिंतामणिसुत । लीलाविश्वंभर जगविख्यात ।

या चरणाचा अर्थ त्यांचे विरोधक लावतात त्याखेरीज अन्य रीतीनें त्यांनीं समाधानकारक लावून दाखविला नाहीं. त्यामुळें आमचें तेंच खरें असें म्हणण्यास विरुद्ध पक्षास फावलें ! रा. आजगांवकर महाराष्ट्र-कविचरित्रांत लिहितात, " या ओवींत जगविख्यात ' लीलाविश्वंभर '
" जो चिंतामणि मुद्गल त्याचा मुलगा (मुक्तेश्वर) यानें भारत लिहिलें, " असें
" मुक्तेश्वरांनीं सांगितलें आहे...एकंदरींत ' लीलाविश्वंभर ' शब्दासंबंधानें रा. पांगारकर,
" राजवाडे, गोडबोले व नवनीतकार यांचाच तर्क सत्यास धरून आहे, व रा. भिडे यांनीं
" या बाबतींत आपल्या निबंधाचीं जीं दहा बारा पृष्ठें अडविलीं आहेत त्यांत फारसा
" अर्थ नाहीं, असें माझ्या अल्पबुद्धीस वाटतें. "[१४]

वास्तविक ज्या ओवीनें या सगळ्या लोकांना गोंधळांत टाकलेलें आहे तिच्यांतील पाठच मुळीं चुकीचा होता.

सभापर्वाच्या उपसंहारांतील ही ओवी,

तो मुद्गल चिंतामणिसुत । **लीलाविश्वंभर जगविख्यात** ।
व्यास भारतींचा अर्थ । महाराष्ट्र बोलिला ॥

अशी नसून

तो मुद्गल चिंतामणिसुत । **लीलाविश्वंभरानुग्रहीत** ।
व्यास भारतींचा अर्थ । महाराष्ट्र बोलिला ॥

अशी आहे ![१५]

---

१३ **मुक्तेश्वर** (आ० २ री). १९२६. पृ० १४

१४ **महाराष्ट्र-कविचरित्र** (भा० १ ला), १९०७. पृ० ३

१५ तुळा—इति श्री सभापर्व भारत । **लीलाविश्वंभर अनुग्रहीत** ।
मुक्तेश्वराचा वचनार्थ । सार्थक श्रोतीं करावा ॥—**सभापर्व (मुक्तेश्वर)** अ० २.

हा दुसरा पाठ, आदिपर्वाच्या पाठदृष्ट्या ज्या अत्यंत विश्वसनीय अशा पोथ्या मला दिसल्या त्यांना जोडून असलेल्या सभापर्वाच्या पोथ्यांत असलेला मला आढळला.

(१) रा. वासुदेव दत्तात्रयशास्त्री निगुडकर यांना संस्थान बावडा येथें सांपडलेली व राजापूरच्या संस्कृत पाठशालेंतून मजकडे पं. र. कृ. पाटणकर यांनीं पाठविलेली प्रत, (२) गोमांतकांतील कै. व्यंकटेश शां. दळवी यांकडून मिळालेली प्रत, (३+४) तंजावर येथील सरस्वतीमहालांत असलेल्या नं. १३७३ व १३७९ च्या दोन प्रती, (५) कोल्हापूरचे प्रो. पंगु यांना सांपडलेली प्रत, या प्रतींमध्यें ' लीलाविश्वंभरानुग्रहित ' असाच पाठ आहे. यावरून लीलाविश्वंभर हें चिंतामणीचें दुसरें नांव या कल्पनेचा आधारच नष्ट होतो, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. लीलाविश्वंभर हा जर मुक्तेश्वराचा बाप नाहीं तर मग अन्य कोण याचाही येथें विचार करणें प्राप्त आहे.

लीलाविश्वंभर हा मुक्तेश्वराचा बाप नसला तरी त्याचा गुरु असलेली अन्य कोणीतरी मानवी व्यक्ति असावी, असा भिड्यांचाही समज दिसतो. ते लिहितात,

" लीलाविश्वंभर हा माझा गुरु असें मुक्तेश्वर ह्मणत असतां ' लीला ' व ' विश्वंभर '
" अशीं दोन पदें कल्पून ' लीला ' ही मुक्तेश्वराची आई किंवा गुरुपत्नी कल्पिण्याचें
" कोणीही भारदस्त प्रयोजन किंवा प्रमाण पुढें आणिलेलें नाहीं. ' लीलाविग्रही ' ' लीला-
" वतारी ' इत्यादि परमेश्वरास लावलेल्या नांवांतील ' लीला ' व मुक्तेश्वरांनीं **ईश-**
" **स्वरूप मानिलेल्या आपल्या गुरूस** लाविलेल्या ' लीलाविश्वंभर ' या नांवातील
" ' लीला ' या दोहोंत आह्मांला तरी कांहींएक वास्तविक भेद करितां येईल असें
" वाटत नाहीं. "

प्रि. दा. के. ओक यांचेंही मत लीलाविश्वंभर ही मुक्तेश्वराचा गुरु असलेली कोणीतरी व्यक्ति होती असें दिसतें.[१६]

लीला व विश्वंभर हीं जरी मुक्तेश्वराचीं मातापितरें नसलीं तरी त्याचीं अनुक्रमें गुरुपत्नी व गुरु यांचीं नांवें होतीं, असें काव्यसंग्रहसंपादक जनार्दन बाळाजी मोडक यांचीही समजूत होती, असें त्यांच्या मोरोपंताच्या सन्मणिमालेवरील तळटीपांवरून दिसतें. मला राजवाडे, पांगारकर, आजगांवकर प्रभृतीचें म्हणणें जसें मान्य नाहीं, त्याप्रमाणें भिडे, ओक किंवा मोडक

इति श्री अरण्यपर्व भारत । **लीलाविश्वंभरानुग्रहीत** ।
मुक्तेश्वराचा वचनार्थ । पवित्रप्राय परिसोत ॥ —**वनपर्व** (मुक्तेश्वर) अ० १.

१६ **विराटपर्व** (काव्यसंग्रह) आ. २ री, १९३९. उपोद्घात पृ० ५.

यांचेंहि नाहीं. मुक्तेश्वर जेव्हां 'विश्वंभर' किंवा 'लीलाविश्वंभर' म्हणून नमन किंवा निर्देश करा, त्यावेळीं त्याच्यापुढें कोणतीही मानवी व्यक्ति होती असें वाटत नाहीं. स्वतः मुक्तेश्वरच या विश्वंभरासंबंधीं किंवा लीलाविश्वंभरासंबंधीं काय म्हणतो तें पाहूं:—

विश्वंभराच्या किंवा लीलाविश्वंभराच्या परब्रह्मस्वरूपांची मुक्तेश्वर दोन प्रकारें कल्पना करतो. पहिलें पंचायतनस्वरूप व दुसरें त्रिमूर्ति-स्वरूप.

पहिलें पंचायतनस्वरूप म्हणजे काय हें

आदित्यं गणनाथं च देवीं रुद्रं च केशवम् ।
पंचदैवतमित्युक्तं सर्वकार्येषु पूजयेत् ॥

या श्लोकावरून कळून येईल.

अ) मुक्तेश्वर आदिपर्वाच्या आरंभींच म्हणतो—



ॐ नमो लीलाविश्वंभरा स्वामी ।
तुझिये स्वरूपपरब्रह्मीं ।
पंचायतन पंचनामीं ।
कल्पिजेती अवयव ॥ १ ॥
तेथें **शिव** तो निज मस्तक ।
विष्णुसूर्य द्वय हस्तक ।
सव्य चरण **विनायक** ।
वाम तो **शक्ति** साजिरा ॥ २ ॥

आ) सभापर्वाच्या मंगलाचरणांत तो लिहितो,

ज्याची कृपादृष्टी **भगवती** ।
अनुग्रह तोचि **गणाधिपति** ।
बोधप्रकाश **गभस्ती** ।
हृदयाकाशीं झळकत ॥ ८ ॥

जीवीं **शिवत्व** प्रकाशिलें ।
विष्णुमयचि विश्व केलें ।
एवं पंचायतन भलें । म्यां देखिलें गुरुरूपीं ॥ ९ ॥

इ) वनपर्वाच्या आरंभी तो नमन करतो,—

ॐ नमो विश्वंभरा देवा । अभेदभावें तुझी सेवा ।
तूंचि विश्वासशी जीवा । प्रतीति बाणे निर्धारें ॥ १ ॥

हरिहरसूर्यगणेशशक्ति । तूंचि एक बहुधा व्यक्ति ।
जेथें धावे मनोवृत्ति । तेथें तूं एकु ॥ २ ॥

हें पंचायतनस्वरूप झालें; परंतु दुसरें त्रिमूर्तिस्वरूप हाच मुक्तेश्वराचा खरा **लीला-विश्वंभर** होय.

(अ) या संबंधीं तो आदिपर्वांत काय म्हणतो पहाः—

कां नाभिपादांत कमळासनु ।
मध्यकंठांत रमारमणु ।
स्कंधावरुता त्रिलोचनु ।
अंगत्रयीं जो येकु ॥ ५ ॥



(आ) सभापर्वांत आरंभीं हेंच त्यानें निराळ्या भाषेंत सांगितलें आहे—

जयातें बोलती परमात्मा ।
विष्णु शंकर अथवा ब्रह्मा ।
जो असेल तयाची प्रतिमा ।
व्यक्ताव्यक्त नमियेली ॥ १ ॥

लीलाविश्वंभर ईश्वरू ।
दत्तात्रेय जगद्गुरु ।
ज्याचेनि नामें भवसागरु ।
मागां तरले असंख्य ॥ ६ ॥

लीलाविश्वंभर म्हणजेच दत्तात्रेय हें त्यानें वारंवार ठिकठिकाणीं सांगितलें आहेः— आदिपर्वांत तो लिहितो,

विशेष लीलाविश्वंभरु । दत्तात्रेय जगद्गुरु ।
त्याचेनि प्रसादें मुक्तेश्वरू । निरोपी तें परिसावें ॥ १२२ ॥
—अ० २६.

चिन्मूर्ति लीलाविश्वंभरू । दत्तात्रेय जगद्गुरू ।
त्याचेनि नामें मुक्तेश्वरू । कथा बोले भारती ॥ ३८ ॥
—अ० ३३.

लीलाविश्वंभर स्वामिया । दत्तात्रेया जगदात्मिया ।
मनोभावें वंदोनियां । मुक्तेश्वर अनुवादे ॥ १०१ ॥
—अ० ४६.

एकनाथचरित्राच्या आरंभीं मुक्तेश्वर लिहितो—

ॐ नमो जी विश्वंभरू । तो देव दत्तात्रय जगद्गुरू ।

मुक्तेश्वर विश्वंभराला म्हणजे श्रीदत्तात्रेयाला गुरु म्हणतो यांचें कारण तो दत्तोपासक होता. श्री दत्तात्रेयाला मुक्तेश्वराचा मातामह एकनाथ यानें " परमगुरु " म्हटलें आहे. तो भागवतांत २३ व्या अध्यायाच्या शेवटीं लिहितो,

माझे निज गुरूचाही गुरु । **श्रीदत्त परमगुरु ।**
तो भिक्षुगीतार्थे साचारू । योग्यां योगेश्वरू तुष्टला ॥[१७]

एकनाथाचा गुरु जनार्दन श्रीदत्तात्रयाला गुरु मानी हें प्रसिद्ध आहे. शिवाय देवालाच गुरु म्हणण्याचा प्रघात एकनाथाचा होताच. पांडुरंगाला व गजाननालाही त्यानें सद्गुरु म्हटलें आहेः—

श्री पांडुरंग सद्गुरु हे स्वामी । तया पदपद्मीं नमन माझें ॥ १ ॥
श्रीगुरुसारखा वंद्य नाहीं त्रिभुवनीं । तो कैवल्याचा धनी विटेवरी ॥ १ ॥
गजाननमूर्ति सद्गुरु समर्थ । देई मज स्वार्थ निज पदीं ॥ २ ॥ वगैरे.

ह्या गोष्टी लक्षांत घेतल्या असतां श्रीदत्तात्रेयाला मुक्तेश्वरानें गुरु म्हणावें हें स्वाभाविक आहे. फार कशाला ? हनुमंताख्यान या आपल्या काव्याचे शेवटीं मुक्तेश्वरच लिहितो—

मुक्तेश्वराचा श्रीगुरू । दत्तात्रय परब्रह्मअवतारु ।
स्मरतां झाला भवसागरू । गोष्पदप्राय सद्भक्ता ॥ ६२ ॥[१८]

मुक्तेश्वराचा पारमार्थिक गुरु म्हणून कोणी मानवी व्यक्ति होती असें मला वाटत नाहीं नाहीं म्हटल्यास एकनाथाला मात्र त्यानें वनपर्वाच्या आरंभीं गुरु म्हणून वंदन केलें आहेः—

मुक्तेश्वरें एकनाथु । यातें साष्टांग प्रणिपातु ।
गुरुस्वरूप म्हणोनि हेतु । ग्रंथारंभीं वंदावा ॥

वरील पाठ काव्यसंग्रहाचा आहे. जुन्या हस्तलिखितांत अन्य पाठ सांपडतो तो असाः—

मुक्तीश्वर एकनाथ । त्यातें साष्टांग प्रणिपात ।
गुरुस्वामी म्हणोनि हेत । साष्टांग वंदावें ॥

मुक्तेश्वराच्या पूर्वी विश्वंभर किंवा विशेषतः लीलाविश्वंभर ही संज्ञा श्रीदत्तात्रेयाला लावतां येत असे, असें जर निश्चितपणें दाखवितां आलें, तर ' लीला ' ही मुक्तेश्वराची आई

---

१७ एकनाथाचा आणखी अभंग पहा—

दत्त गुरु दत्त गुरु दत्तात्रय गुरु ॥धृ०॥ शंखचक्रगदाधरा । दिगंबरा जडाधरा ॥ १ ॥
आदिनाथ दीनानाथ ब्रह्मरूप दत्त गुरु ॥ २ ॥

१८ **मुक्तेश्वरकृत स्फुट काव्यें**–१९०६. पृ० १७९.

किंवा गुरुपत्नी होती, आणि 'विश्वंभर' हें त्याच्या बापाचें किंवा मानवी गुरूचें नांव होतें ही लोकांच्या डोक्यांतील भ्रामक कल्पना कायमची नष्ट करतां येईल, अशी आशा आहे.

दासोपंत नांवाचा जो प्रसिद्ध साधु होऊन गेला तो एकनाथाचा समकालीन होता एकनाथपंचकापैकीं एक असें त्याला मानतात. त्याचा जन्म श० १४७३ व अंत १५३७ सालीं झाला; यावरून त्याचा काळ कळून येईल. यानें फारच मोठी ग्रंथरचना केलेली आहे. ती बहुतेक अप्रकाशित आहे. हाही दत्तोपासकच होता. आंबेजोगाई किंवा मोमिनाबाद येथें तो रहात असे. याची **गीतार्णव** नांवाची भगवद्गीतेवरील जी टीका आहे तिचे आरंभींचे कांहीं अध्याय मुद्रित झाले आहेत. या गीतार्णवाच्या आरंभीं तो श्रीदत्तात्रेयाला विश्वंभर या नांवानें संबोधित असलेला दिसतो. उदाहरणार्थ त्याच्या दुसऱ्या अध्यायाच्या आरंभीं पुढील ओवी आढळतेः—

जय जयाजी विश्वनाथा । **विश्वंभरा** अद्वैता ।
आदिगुरो, अवधूता । पुण्यकीर्ति ॥ १ ॥

लीलाविश्वंभर असा स्पष्ट उल्लेख दत्तात्रेयाला अनुलक्षून त्यानें केलेला पहावयाचा असेल तर **श्री दासोपंतांचीं पदें**[१९] हा ग्रंथ पहावा. त्यांत विश्वंभर व लीलाविश्वंभर या दोनही नांवानीं त्यानें श्रीदत्ताचा ठिकठिकाणीं उल्लेख केलेला आहे. लीलाविश्वंभर या नांवाचे निर्देश पहाः—

(पद २९२)

पुराणपुरुषेश्वरा गुरुमूर्ती दातारा । **लीलाविश्वंभरा दत्तात्रेया** ॥ १ ॥ ध्रु. ॥
तुझें चरणस्मरण मायादहन भवभय संकीर्तन बखताहे ॥ छ ॥
आखिळविश्वधरा धर्मज्ञा ईश्वरा शिव शिव दिगंबरा योगमूर्ती ॥ २ ॥

(पद १३९४)

नमूनि सर्वेश्वरा गुरुमूर्ती उदारा **लीलाविश्वंभरा दत्तात्रेया** ।

(पद १३८९)

भक्तजनसुरतरु, ज्ञानविज्ञानसागरू, पावला श्रीसिद्धराजू आत्मा ईश्वरू,
परमात्मा ईश्वरू, **दत्तु आदिगुरु** ॥ १ ॥ ध्रु० ॥
अरे अरे मंत्रसारा अरे **लीलाविश्वंभरा** ।
मायावंता मायामुक्ता त्राही दिगंबरा ॥ २ ॥

---

१९ **श्री दासोपंतांचीं पदें**, संपादक—का. वा. लेले, वाई.

(पद १५९१)

योगीजनवल्लभा **लीलाविश्वंभरा श्रीदत्ता** सद्गुरो कृष्णवर्ण सुरेश्वरा,
विज्ञानसागरा भक्तकरुणाकरा **लीलाविश्वंभरा**, नमन तुतें.
देवदेवेश्वरा सुरपती ईश्वरा **लीलाविश्वंभरा**, नमन तुतें.
परब्रह्मसाकारा अनुसूयेकुमारा **लीलाविश्वंभरा**, नमन तुतें.
परात्परतरा सद्विद्याजळधरा **लीलाविश्वंभरा**, नमन तुतें.
मायातमसंहारा स्वानंदसागरा **लीलाविश्वंभरा**, नमन तुतें.
अलक्ष्य अगोचरा गुरुमूर्तिदातारा **लीलाविश्वंभरा**, नमन तुतें.
अद्वयगुणविस्तारा योगानंदकरा **लीलाविश्वंभरा**, नमन तुतें.
बापा दिगंबरा, मी नेणें दुसरा **लीलाविश्वंभरा**, नमन तुतें.

आणखीही अशीं अनेक स्थळें दाखवितां येतील.

यावरून दासोपंताची आई 'लीला' व बाप 'विश्वंभर' होता व दासोपंत हा मुक्तेश्वराचा सहोदर किंवा गुरुबंधु होता, असें कोणाला ह्मणतां येईल असें वाटत नाहीं.

ब्र. टेंभे स्वामी उर्फ वासुदेवानंदसरस्वती स्वामी यांनी श्रीदत्तात्रेयाच्या सहाव्या अवतारांत त्याचें नांव **लीलाविश्वंभर** होतें, असें म्हटलें आहे.[२०]

अन्नपानादिदानेन लीलाविश्वंभरोऽभवत् ।
लीलया विश्वरूपाणि मुनिभ्यः स व्यदर्शयत् ॥ ७ ॥
तानि रूपाणि दृष्ट्वा ते सर्वेऽपि गतसाध्वसाः ।
साश्चर्यास्तुष्टुवुर्देवं लीलाविश्वंभराभिधम् ॥ ८ ॥
लीलाविश्वंभरः सोऽपि वेदाध्ययनतत्परः ।
शिष्यानध्यापयामास कदाचिद्ध्यानतत्परः ॥ ९ ॥

लीलाविश्वंभरासंबंधीं आणखीही लिहिण्यासारखें आहे; पण त्यापूर्वी मुक्तेश्वराचें व्यक्तिनाम काय होतें, त्याचा थोडा विचार करूं.

द्विजवर कविनामा मुद्गलू अत्रिगोत्री । असा रामायणामध्यें व
तो मुद्गल चिंतामणिसुत । लीलाविश्वंभरानुग्रहीत ।

असा सभापर्वामध्यें मुक्तेश्वरानें स्वतःचा नामोल्लेख केलेला आहे. पुष्कळांची समजूत त्यानें मुद्गल हें आपलें आडनांव किंवा कुलनाम सांगितलें आहे. या पुष्कळांत राजवाडे,[२१] पांगारकर[२२], आजगांवकर,[२३] वगैरेंचा समावेश होतो मुद्गल हें त्याचें व्यक्तिनाम मानणारे भावे व भिडे हे

२० **श्रीदत्तात्रेय–षोडशावतार–जयंतीकल्पम्**, शके १८४०. पृ० ५४.

२१ ग्रंथमालेंतील निबंध पहा.

२२ **कविवर्य मुक्तेश्वर** (चरित्र आणि काव्यविवेचन), १९२२. पृ० १४.

२३ **महाराष्ट्रकविचरित्र** (भा० १). पृ० ४६.

आहेत. मी या दुसऱ्या मताचा आहें. नांवें व आडनांवें यांचा मीं जो थोडाफार अभ्यास केला आहे त्यावरून माझें हें मत झालें आहे. आज कुलनामनिर्देशांचा विशेष प्रघात आहे व तोही युनिव्हर्सिटी स्थापन झाल्यानंतरचा आहे. जुन्या काळीं व्यक्तिनामेंच मुख्यतः वापरांत होतीं. कुलनामांचा त्या काळीं फारसा प्रचार नसे. आजच्या कल्पना तीनशें वर्षांमागच्या समाजावर लादणें बरोबर नाहीं. मुक्तेश्वरानें प्रथम रामायण लिहिलें हें मत बहुतेक सर्वांस मान्य आहे. युद्धकांडाच्या शेवटीं त्यानें जी आत्मपर माहिती नमूद केली आहे, तेथें लीलाविश्वंभर किंवा मुक्तेश्वर याचा निर्देश नाहीं. रामायणाच्या आरंभीं,

'मुक्तेशस्य विराजते सुरुचिरा वाणी गुणग्राहिणी' असा ज्यांत आत्मपर उल्लेख आहे ते तीन संस्कृत श्लोक व शेवटास असलेला

विश्वंभरश्रीगुरूच्या प्रसादें । आनंदवाचा वदलों विनोदें ।
भक्तीन मुक्तेश्वर सार बोले । आकर्णितां सज्जनचित्त डोले ॥

हा मराठी श्लोक मागाहून जोडला गेला असावा अशी शंका येते. भावे लिहितात, " हें काव्य प्रथम युद्धकांडापर्यंतच लिहून पुरें केलें असावें. पुढें यानें किंवा दुसरे कोणी " आणखी उत्तर कांडाची भर घालून हें संपूर्ण रामायण केलें. "[२४]

मुक्तेश्वर हें नांव धारण करण्यापूर्वी हा कवि स्वतःस 'चिंतामणिसुत मुद्गल' म्हणत होता. या नांवाखालीं एक कविता श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांतील चार बाडांमध्यें मला आढळली. (६८८, १३२, २५०, २९५). ती अशीः—

श्रीरंगीं रंगलें मानस मागुती मुरडेना, बाइये ।
स्वरूपीं ही वृत्ति निमाली मागुती निवडेना ॥ धृ० ॥
चिदानंदपदीं प्रवेशली बुद्धि काढवेना ।
आवडुनि जीवीं जडली ते वासना सोडवेना ॥ १ ॥
निश्चयेंसि देख सेविलें तें सुख सोडवेना ।
गुरुकृपावित्त न जोडतां चित्त दृढवेना ॥ २ ॥
वेदश्रुति जेयें पारुषली ते मी काय बोलों ।
हेतुमान गति खुंटली ते पथिं केंवि चालों ॥ ३ ॥
सहस्रमुखिं माप करितां अमुप लेख जालें ।
चिंतामणिसुत मुद्गलीं तें सुख ठेलें ॥ ४ ॥

मुक्तेश्वराच्या आरंभींच्या कवितांपैकीं ही एक असावी, असें स्पष्ट दिसतें.

तंजावरच्या सरस्वतीमहालांत अशीच आणखी एक कविता मला अलीकडे सांपडली. तिचें नांव 'हनुमंताची आरती.' ती अशीः—

---

२४ महाराष्ट्र-सारस्वत (भा. १). पृ० २९२.

येकाच उड्डाणें लंघीला सेतु । किंकरा बनकरा पुरविला अंतु ।
मारीला जंबुमाळी अक्षया सुतु । मारीला पळविला वीर इंद्रजीतु ॥ १ ॥
जयदेव जयदेव जय श्रीहनुमंता । पवनपुत्र वीरा बळिया हनुमंता ॥ धृ० ॥
वैराग्याचा वन्ही लाऊनि देखा । ममता जाळीयेली विषयाची लंका ।
रजोगुणरावणु इंद्रियदशमुखा । दग्ध करूनी सुखी केलें तीहीं लोकां ॥ २ ॥
नामस्मरणें येका सोडविलें सकळां । तो राम चोरुनि नेला पाताळा ।
स्वामीचें संकट निरसिलें हेळा । तया भक्ता जीवें प्राणें ओवाळा ॥ ३ ॥
काळ काम रुळे जया अंकणा । नामस्मरणें तोडी आजन्ममरणा ।
मुद्गल चिंतामणि अनुसरे जाणा । काया-वाचा-मनसा वायोनंदना ॥ ४ ॥

अशा आणखीही कविता सांपडणें शक्य आहे.

ही आरती मुक्तेश्वराची याला आणखी अंतर्गत सबळ पुरावा असा कीं यांतील **'काळ काम रुळे जया अंकणा'** ही भाषा मुक्तेश्वराच्या रामायणामध्येंही आढळते:—
'रुळे अंकणा क्रूर तो काळ साचें ।' —युद्धकांड, श्लोक ४७५.

मुक्तेश्वर हें आपल्या आराध्यदेवतेचें नांव महाभारत रचतांना त्यानें धारण केलेलें दिसतें. स्वतः हा कवि आपल्या आदिपर्वाच्या आरंभीं लिहितो,

हो कां डोळसु पायाळ निका । परी गुरुआज्ञेचें अंजन देखा ।
प्रसन्नतेची भाग्यरेखा । नसतां निधान कैं जोडे ॥ ४० ॥

म्हणवुनी देवतारूपें वहिला । येक श्रीगुरु म्यां स्तविला ।
अभेदभक्तिचेनि भुलला । आज्ञापितु निजमुखें ॥ ४१ ॥

त्या कारुण्यवसंतवातें । मनाचे निर्फळलते ।
स्फूर्तीचे पल्लव पातले तेथें । कवित्वफळीं फळभारू ॥ ४२ ॥

म्हणे रे बाळकें घेतला थाया । तो साच करोनि दाखवी माया ।
तेवीं त्वां आदरिलें तें वायां । केवीं आह्मीं धाडणें ॥ ४३ ॥

मुक्तेश्वर जो मी अवधूत । माझेनि नामें मुद्रांकित ।
कथा विस्तारीं भारत । महाराष्ट्रपदबंधीं ॥ ४४ ॥

मूळ भारतीं व्यास सांगे । गणेश आपण लिहितां वेगें ।
येथें मी कर्ता लिहिता आंगें । संतप्रार्थना त्वां कीजे ॥ ४५ ॥

अशाप्रकारें आपलें नांव धारण करून मराठी भाषेंत भारत सांगण्यासंबंधीं अवधूत असा जो मुक्तेश्वर त्यानें आज्ञा केल्यावरून आपण हा ग्रंथ लिहित असल्याचें हा कवि सांगत आहे. भिडे यांनीं हा मुद्दा सुचविला होता, परंतु त्याच्याकडे कोणी लक्षच दिलेलें दिसत नाही. आदिपर्वाच्या पहिल्या अध्यायाची शेवटची ओवी शुद्ध स्वरूपांत पुढें ठेविली म्हणजे यासंबंधीं

शंका दूर होईल. सध्यां छापील सर्वसंग्रह किंवा काव्यसंग्रह प्रतींतील ही शेवटची ओवी आमच्या पुढें आहे ती अशी—

इति श्री भारत आदिपर्वणि । पुढें परिसावें विचक्षणीं ।
वदेल मुक्तेश्वराची वाणी । लीलाविश्वंभरप्रसादें ॥ १९९ ॥

आदिपर्वाचीं एकोणतीस जुनीं हस्तलिखितें अभ्यासून मीं या ओवीची जी शुद्ध संहिता निश्चित केली आहे ती अशीः—

इति श्री भारत आदिपर्वणि । पुढां परिसावें विचक्षणीं ।
कवतुके वदेल कवीची वाणी । मुक्तेश्वरप्रसादें ॥ १९३ ॥

मूळ पाठ मागाहून कोणीतरी बदललेला स्पष्ट दिसतो. आराध्यदेवतेचें 'मुद्रानाम' (pen-name) घेतल्यावर देव व उपासक यांमधील समाननामामुळें होणारा गोंधळ चुकविण्याकरितां कवीनें मुक्तेश्वर या नांवानें देवास उद्देशून लिहिण्याचें टाळलें आहे. तरीपण अनेक ठिकाणीं तें नमूद आहे. पहा (मी प्रथम शुद्ध पाठ देऊन मागाहून कंसांत छापील किंवा अन्य प्रतींत आढळणारे पाठ देत आहें):—

इति श्रीभारत आदिपर्वणि । कवि मुक्तेश्वर शूलपाणी ।
त्याचेनि प्रसादें हे वाणी । सुखी करो श्रोतियां ॥

—आदि० अध्याय ४.

(येथें 'कवि मुक्तेश्वर' ऐवजीं 'अविमुक्तेश्वर' असाही कांहीं हस्तलिखितांत पाठ आहे. या काव्याचें कर्तृत्व आपणाकडे नसून आराध्यदेवतेकडे आहे असेंही कवीला सुचवावयाचें असेल. शूळपाणि हें नांव माणसास कसें देतां येईल ? श्रीशंकर किंवा श्रीदत्तात्रेय येथें अभिप्रेत आहे.)

इति श्रीआस्तिकसहसौपर्णे । भारत आदरें ऐकोत शाहाणे ।
मुक्तेश्वरप्रसादें ह्मणे । कविकिंकर आवडी ॥

—आदि० अध्याय ५.

(काव्यसंग्रहप्रतींत,

इति श्रीकद्रुविनतासौपर्णे । भारत आदरें ऐकतां शाहाणे ।
विश्वंभरप्रसादें म्हणे । मुक्तेश्वर आवडी ॥ १३१ ॥

असा बदलेला पाठ आढळतो.)

इति आदिपर्वकथा भारती । **मुक्तेश्वर अवधूतमूर्ती** ॥
तत्प्रसादें श्रोतयांप्रती । कविकिंकर अनुवादे ॥

—आदि० अ० १३.

(हा पाठ छापील काव्यसंग्रहप्रतींतही आहे. यावरून वरच्या ५ व्या अध्यायांतील ओवीप्रमाणेंच येथेंही हा कवि स्वतःला कविकिंकर म्हणवितो व आपल्या आराध्यदेवतेला मुक्तेश्वर ' म्हणतो, हें स्पष्ट दिसून येईल.)

तर मग हा मुक्तेश्वर कोण हें चवदाव्या अध्यायाच्या शेवटीं पहा—

आदिकवीचा आदिगुरु । विश्वेश लीलाविश्वंभरु ।
भक्तिशक्तीनें मुक्तेश्वरु । वाक्यपुष्पीं अर्चिजे ॥ १६० ॥
तोचि कविकिंकर श्रोतयां । विनवी हस्त जोडोनियां ।
कथा सुपथीं चालावया । सांगाति या मज होणें ॥ १६१ ॥

(हा पाठ काव्यसंग्रहप्रतींतही असाच आहे. यांत लीलाविश्वंभर व मुक्तेश्वर एकच होत व कवि स्वतःला अद्यापि कविकिंकरच म्हणवितो, असें दिसून येईल.)

विसाव्या अध्यायाच्या शेवटीं पहाः—

लीलाविश्वंभरप्रसादें । मुक्तेश्वरअवधूतगुणानुवादें[२५] ।
भारतनलिनीचीं अरविंदें । महदाख्यान सुपक्ती ॥

एकविसाव्या अध्यायाच्या शेवटीं आणखी पहाः—

परेश लीलाविश्वंभर । मुक्तीशवाणी[२६] मुक्तेश्वर ।
वदला[२७] तेथें प्रेमादर । सज्जनीं केला पाहिजे ॥

(काव्यसंग्रहप्रतींत वरील ' मुक्तीशवाणी ' बद्दल मुक्तपाणी असा पाठ आहे. येथें कवीनें स्वतःला मुक्तेश्वर म्हणविलें असून आपल्या नांवापासून आपल्या आराध्यदेवतेचें नांव वेगळें दाखविण्याकरितां तिचा मुक्तीश असा निर्देश केला आहे. आपण जें काय बोलतों ते आपले स्वतःचे शब्द नसून आपणास ' बोलविता धनि वेगळाचि ' म्हणजे आपला देव किंवा गुरु आहे असें आपल्या जुन्या कवींचें नेहमीं म्हणणें असतें.

कवि मुक्तेश्वरही असेंच म्हणतो. परेश लीलाविश्वंभर मुक्तीश त्याचीच वाणी आपण बोललों, तिचें सज्जनांनीं प्रेमानें स्वागत करावें, अशी त्याची श्रोत्यांना प्रार्थना आहे. 'मुक्तपाणि मुक्तेश्वर ' असा पाठ स्वीकारला तरीही लीलाविश्वंभर व मुक्तेश्वर यांची अभेदताच व्यक्त होते.)

मुक्तेश्वर हें कोणीतरी दैवत आहे, हें आपण पाहिलें कवि मुक्तेश्वर दत्ताला शिवस्वरूपच मानतो. ही गोष्ट अवधूतमूर्ति, पिनाकपाणी, शूलपाणी अशासारख्या त्याला दिलेल्या विशेषणांवरून कळून येईल.

अशाप्रकारच्या मुक्तेश्वराचें देवालय कोठें आहे कीं काय याचा शोध केला पाहिजे. पैठण नागपूर हैद्राबादकडे मुक्तेश्वराचीं देवालये असल्याचें कळतें. प्रो. वि. भि. कोलते यांनीं

---

२५ पाठांतर—**मुक्तोशअवधूत**°—धु.

२६ **मुक्तपाणी** धु रा.

२७ **वदेल** रा, **वदली** गो.

" स्थान-पोथी " नांवाचा एक महानुभावीय ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्याच्या चवदाव्या पृष्ठावर " पौळीबाहीर अग्ने **मुक्तेश्वराची** देउळी पूर्वाभिमुख " असा निर्देश आहे व तो पैठणच्या देवळाचा आहे.[२८] नागपूरलाही मुक्तेश्वराचें देऊळ आहे त्याला ऋणमुक्तेश्वर म्हणतात आणि हैद्राबाद संस्थानांत हिंगोळीजवळ मुक्तेश्वराचें देऊळ आहे, असें प्रो. कोलते कळवितात. डॉ. यशवंत खुशाल देशपांडे यांनीं श्रीऋद्धिपूरवर्णन या पुस्तकांत " **परिशिष्ट अ** " मध्यें स्थानपोथीमधील ऋद्धिपूरवर्णन दिलें आहे. त्यांत " पटिसाळे मुक्तेश्वराची देउळी " असा उल्लेख आहे.[२९] त्यावरून ऋद्धिपूरमध्येंही मुक्तेश्वराचें देऊळ होतें, असें उघड दिसतें.

उज्जयिनी येथें ' मुक्तीश्वर ', ' ऋणमुक्तेश्वर ' आणि ' अविमुक्तेश्वर ' या देवतांचीं देवालयें आहेत, असें ' उज्जयिनी-मार्गदर्शिका ' या पुस्तकावरून दिसतें.

(१) **मुक्तीश्वर**—हें देवालय खत्रीवाड्यांत श्री माळ्याच्या गल्लींत असून " पूर्वी राथंतर कल्पांत मुक्तिनामा ब्राह्मण या शिवलिंगाच्या दर्शनानें मुक्त झाला, म्हणून त्याला मुक्तीश्वर म्हणतात ", असें या पुस्तकांत नमूद आहे.[३०]

(२) **ऋणमुक्तेश्वर**—ऋणमोचनतीर्थावर आहे.[३१]

(३) **अविमुक्तेश्वर**—(सिंहपुरींत कुटुंबेश्वराजवळ पूर्वेस) " काशीक्षेत्रांत जसें विश्वेश्वर तसें हें शिवलिंग दर्शनमात्रेंकरून मुक्ति देणारें आहे, म्हणून त्याला अविमुक्तेश्वर म्हणतात. "[३२]

' कवि मुक्तेश्वरा'बद्दल अविमुक्तेश्वर असा पाठभेद ख रा रा२ या हस्तलिखितांमध्यें आढळतो.[३३] मुक्तेश्वरानें उज्जयिनी पाहिली होती, असें ' तिळभांडेश्वर ' या देवतेच्या निर्देशावरून म्हणतां येतें.

तिळभांडेश्वर " मकोड्या आंब्याच्या पश्चिमेस " असल्याचें ' उज्जयिनीमार्गदर्शिकेंत ' नमूद आहे.[३४] 'तिळभांडेश्वराचा' उल्लेख आदिपर्वांत मुक्तेश्वर कसा करतो तें पहाः—

प्रत्यक्ष कासीविश्वेश्वर । स्वल्पाकृति मान्य थोर ।
विशाळ तिळभांडेश्वर । कोणे प्रथम वंदिजे ॥ १०९ ॥ अध्याय ११.

---

२८ **स्थानपोथी**, १९५०. पृ० १४.

२९ **ऋद्धिपूरवर्णन**. पृ० ११३.

३० **श्री क्षेत्र अवंतिका अर्थात् उज्जयिनी-मार्गदर्शिका**, प्र. के. ब. डोंगरे, ग्वाल्हेर, १९३१. पृ० १०५.

३१ तत्रैव, पृ० १२१.

३२ तत्रैव, पृ० ११७.

३३ **आदिपर्व**, अध्याय ४ , ओवी १८८. पृ० ९६.

३४ **श्री क्षेत्र अवंतिका**. पृ० १७१.

उत्तरेकडे आणखीही मुक्तेश्वर प्रसिद्ध आहेत. मिरत जिल्ह्यांत गडमुक्तेश्वर नांवाचें गांव असून तेथें गणमुक्तेश्वर नामक महादेवाचें मुख्य देवालय आहे. याशिवाय मुक्तेश्वरनाथ आणि मुक्तिनाथ या नांवाच्या दोन शंकरांचीं तेथे मंदिरें आहेत. ओरिसाची जुनी राजधानी भुवनेश्वर येथेंही मुक्तेश्वराचें ६–७ व्या शतकांतील अत्यंत सुंदर देवालय आहे. हिमालयाच्या पहाडांत गंडक नदीच्या डाव्या तीरावर मुक्तिनाथ नांवाचें देवस्थान व तीर्थ आहे. पण कवि मुक्तेश्वराचा यांच्याशीं कांहीं संबंध नाहीं.

नाशीक येथेंही मुक्तेश्वराचें देऊळ आहे, असें गॅझेटियर पाहिला असतां कळतें:—

"Between the Delhi and Nāv gates, about seventy "yards south-east of Murdeshvar's is the open altar-like "shrine or *chabutra* of Mukteshvar with a *ling*. It is entirely "in the bed of the river, and during the rains is surrounded "with water."[३५]

द्रविडदेशांतही मुक्तेश्वर किंवा मुक्तीश्वर अशा देवता सर्वसामान्य असून मुक्तेश्वराचीं देवळें पुष्कळच आहेत.

(१) मद्रासजवळच्या चिंग्लिपुट जिल्ह्यांतील कांजीवरम् या तालुक्यांतील कांजीवरम् किंवा कांचीपूर म्हणजे सुप्रसिद्ध कांचीक्षेत्र येथील देवालय होय. हें मुक्तेश्वराचे देऊळ पल्लवराजा दुसरा नंदिवर्मा याच्या राणीनें बांधलें.[३६] या देवळाच्या भिंतीवर तीन शिलालेख आहेत.[३७] हे छापून प्रसिद्ध झाले आहेत, पण त्यांची लिपि तामीळ असल्यामुळें मला ते वाचतां आले नाहींत. या देवळांत मुक्तेश्वर म्हणजे शिवलिंग आहे असें मद्रासयुनिव्हर्सिटीचे सुप्रसिद्ध सेवानिवृत्त प्रोफेसर श्री. के. ए. नीळकंठ शास्त्री कळवितात.

(२) दुसरें मुक्तेश्वराचें देऊळ मद्रास इलाख्यांतील गोदावरी जिल्ह्यांतील अमलपुर तालुक्यांत आहे. पैठणहून निघणारी गोदावरी नदी येथेंच सागराला येऊन मिळते. पैठणापासून हा भाग सुमारें चारशें मैल दूर आहे. या देवळांत एक स्थलपुराण म्हणून ग्रंथ आहे. त्यावरून मुक्तेश्वर असें या देवाला नांव कसें मिळालें तें कळतें:—

"The wife of a sage, says the story, was seduced by "a celestial being and cursed in consequence by her husband. "She purified herself by a bath in the Godavari and took to "a life of contemplation. Rama when returning from Lanka

---

३५ **Bombay Gazetteer**, Vol XVI, Nasik, 1883. p. 511.

३६ **History of the Pallawas of Kanchi**, R. Gopalan. 1928. p. 131.

३७ **South Indian Inscriptions**, R. B. H. K. Shastri, 1923, (No. 827-29, pp 285-287).

" took compassion on her forlorn state and persuaded Siva to " give her *Mukti* or beatitude."[३८]

ही कथा इंद्रानें भ्रष्ट केलेली गौतमपत्नी अहल्या हिला अनुलक्षून आहे हें सांगण्याचें कारण नाहीं. याशिवाय आणखी जीं महत्त्वाचीं मुक्तेश्वराचीं देवळें आहेत त्यांचीं स्थळें तेवढीं सांगतोः—

(३) उत्तर अर्काट जिल्हा.[३९] (४) गुंतुर जिल्ह्यांत चिंतापल्ली येथें.[४०] (५) बेलारी जिल्ह्यांत नीलगुंड तालुक्यांत.[४१] (६) त्रिचनापल्ली जिल्ह्यांत.[४२]

या देवळांत शिलालेख असल्यामुळें यांचा उल्लेख मिळाला. पण ज्यांत शिलालेख नाहींत अशीं कांहीं देवळें अनिर्दिष्ट असतील मुक्तेश्वराचा द्रविडदेशाशीं संबंध व्यक्त करणारा अंतर्गत पुरावा, त्याच्या ग्रंथांतच बराच सांपडतो. आदिपर्वाच्या आरंभीं पहिलें विश्वंभराला (म्हणजे श्रीमुक्तेश्वराला) नमन केल्याबरोबर दुसरें नमन त्यानें चिदंबरेश्वर या द्रविडदेशांतीलच देवाला केलें आहे. पहाः—

कैवल्यकनकसभापति । तांडवशंकर उदारकीर्ति ।
चिदंबरेश्वर चिन्मूर्ति । कामाटवीदाहक ॥ १० ॥
जो दशभुज पंचानन । व्याघ्रचर्मांबरपरिधान ।
कर्पूरगौर गजाजिन । शोभला घन चांदिणें ॥ ११ ॥

(चिदंबरम् हें तालुक्याचें गांव मद्रास इलाख्यांत साउथ अर्काट जिल्ह्यांत मद्रासपासून १५४ मैल अंतरावर आहे. येथील मुख्य देवालय चिदंबरस्वामीचें म्हणजे शंकरभवानीचें असून त्याला सभानातिकेनकोवील (म्हणजे कनकसभा) असें नांव आहे. **कैवल्यकनकसभापति** असा जो उल्लेख मुक्तेश्वरानें केलेला आहे, तो याच मंदिराला उद्देशून होय. या देवालयाची बांधणी जुन्या शिल्पपद्धतीची असून हिरण्यवर्मा यानें सदर देऊळ बांधल्याचें सांगतात.)

तिसरें नमन तो हंपीच्या विरूपाक्षाला करतो. हाही भाग द्रविडदेशांतील हें सांगण्याचें कारण नाहीं. पहा—

प्रभा शरच्चंद्रकोटी । हळाहळें नीळता कंठीं ।
कुरंग मिरवे करसंपुटीं । विशाळभाळीं कुटिलेंदु ॥ १२ ॥

---

३८ **Madras District Gazetteers**, Godavari, Vol. I, 1907. p. 202.

३९ **A Topographical List of the Inscriptions of the Madras Presidency**, Vol.I, V. Rangacharya, p. 35.

४० *Ibid*, Vol. II, p. 806.

४१ *Ibid*, Vol. I, p 300. ४२ *Ibid*, Vol. III, pp. 1515, 1565.

तया **पंपातीरविरूपाक्षा** । गौरीवल्लरीकल्पवृक्षा ।
ज्ञानदीक्षागुरु जो दक्षा । शिक्षाकर्त्या दंडवत ॥ १३ ॥

(विजयानगरास लागून तुंगभद्रा नदीच्या काठीं हें विरूपाक्षक्षेत्र आहे. त्याला हंपी-विरूपाक्ष असेही म्हणतात. येथें अनेक देवालयें असून मुख्य मंदिरांत विरूपाक्षेश्वराचें स्वयंभू लिंग आहे. या विरूपाक्षक्षेत्राची मर्यादा मोठी असून तींत रामायणकालीन वालिसुग्रीवाची किष्किंधा नगरी, पंपासरोवर, व ऋष्यमूक पर्वत इत्यादि स्थानें आहेत. येथें जवळच विद्यानगरच्या राजानें पंढरीची विठ्ठलमूर्ति आणून स्थापिली; परंतु एकनाथाचे आजे भानुदास यानें ती पुनः पंढरीस नेली असें प्रसिद्ध आहे.)

चौथ्यांदा नमन करतांना त्याला श्रीशैलमल्लिकार्जुन या द्रविडदेशांतील देवतेची आठवण होते. पहाः—

जयाचा ध्यानोदयाचा वारा । झगटे मनोरूप तरुवरा ।
अविद्याकुसुमीं जीवभ्रमरा । नित्य मुक्तता स्वभावें ॥ १४ ॥
ज्याचें नामचि दिव्य रसु । जिहे लागे निमिष्य लेशु ।
तैं संसाररोगाचा नाशु । अनायासें भाविकां ॥ १५ ॥
ऐसिया सायुज्यसुखवर्धना । **प्रणम्य श्रीशैलमल्लिकार्जुना** ।
अशेषकर्मबीजभर्जना— । लागीं शरण रिघालों ॥ १६ ॥

(मद्रास इलाख्यांत कर्नूळ जिल्हा, नंदीकोटूर तालुका येथील एक देवस्थान. याची लांबी ६६० फूट व रुंदी ५१० फूट आहे. मध्यें श्रीमल्लिकार्जुनाची मूर्ति आहे.)

पांचवें नमन पुनः त्यानें द्रविडदेशांतील कांचीचा वरदराज यालाच केलें आहे. पहाः—

आतां अंतरद्वारकाधामीं । जो कां अवाप्तसकळकामी ।
विमळवैराग्यबद्रिकाश्रमीं । नारायण नररूपें ॥ १७ ॥
कायाकंची-वरदराज । शामसुंदर चतुर्भुज ।
शंखचक्रगदांबुज । अभयपाणी नेटका ॥ १८ ॥

यांचें वर्णन करण्याकरितां आणखी चार ओव्या कवीनें खर्चिल्या आहेत, पण त्या मी येथें उद्धृत करीत नाहीं.

(कांची, कांचीपुरम् किंवा सद्याचें कांजीवरम् हें मद्रास इलाख्यांतील चिंग्लिपुट जिल्ह्यांतील तालुक्याचें गांव आहे. कांचीचे विष्णुकांची व शिवकांची असे दोन भाग आहेत. विष्णुकांचींतील मुख्य देवता वरदराज म्हणजे नक्रापासून गजेंद्राची सोडवणूक करणारा विष्णु आहे. त्याचाच उल्लेख या ठिकाणीं मुक्तेश्वरानें केलेला आहे. शिवकांचींतील मुख्य देवता एकांबरेश्वर किंवा एकांबरनाथ म्हणजे महादेव आहे.)

अशाप्रकारें पांच द्रविडदेशांतील देवतांना नमनें केल्यावर आतां तरी एकाद्या महाराष्ट्रांतील देवाची या कवीला आठवण व्हावी? छे! सहाव्या नमनाच्या वेळीं तो म्हणतो,

अवलोकितां पदप्रयाग । सकळ दुरितदोषा भंग ।
आठवितां मानसभृंग । दीपला होय पतंगु ॥ २३ ॥
ऐसिया **स्वामी रंगधामा** । कावेरीतटविहंगमा ।
चढोवढीं तुझा प्रेमा । हृदयीं वसो माझिये ॥ २४ ॥

(श्रीरंगम् हें प्रसिद्ध क्षेत्र मद्रासइलाख्यांत त्रिचनापल्लीच्या उत्तरेस सुमारें तीन मैलांवर कावेरी नदीच्या बेटांत वसलेलें आहे. श्रीरंगमूला वैष्णवी देवतांचीं अनेक गोपुरें आहेत. त्यांत मुख्य स्वामी रंगधामाचें गोपुर सुमारें २०० फूट उंचीचें आहे.)

इतकें झाल्यावर श्रीगणपति व श्री शारदा यांना मामुली वंदन होतें. पुढें कवि म्हणतो,

ह्मणवुनी देवतारूपें वहिला । येक श्रीगुरु म्यां स्तविला ।
अभेदभक्तिचेनि भुलला । आज्ञापितु निजमुखें ॥ ४१ ॥

ही गुरूची आज्ञा काय तर आपल्या नांवानें मुद्रांकित होऊन म्हणजे मुक्तेश्वर हें नांव धारण करून "महाराष्ट्रपदबंधीं भारतकथा विस्तारीं" ही होय. हिचा निर्देश मागें आलाच आहे.

एकनाथाचा पणजा जो भानुदास त्यानें पंढरपुराहून विजयानगराला श्री पांडुरंगाची मूर्ति आणिली हें प्रसिद्ध आहे. एकनाथ हा परम विठ्ठलभक्त हें त्याच्या अभंगांवरून स्पष्ट होतें. पण त्याचें किंवा पैठणच्या किंवा महाराष्ट्रांतल्या दुसऱ्या एकाद्या देवाचें स्मरण मुक्तेश्वरानें ग्रंथारंभीं केलेलें नाहीं. पण आरंभीं नसलें तरी श्री पांडुरंगाचें स्मरण त्याला मुळींच झालें नाहीं, असें मात्र नाहीं. आदिपर्वाच्या बत्तिसाव्या अध्यायाच्या शेवटीं तो लिहितोः—

इति श्रीभारते आदिपर्वणि । कथाभीमा भवनाशिनी ।
सद्गुरुपांडुरंगचरणीं । स्पर्शो आली प्रवाहें ॥ १०४ ॥
नेमूनि मुक्तेश्वराचें वक्त्र । तेंचि पांडुरंगक्षेत्र ।
सभाग्य भाग्याचे पवित्र । श्रवणें सुस्नात जे होती ॥ १०५ ॥

स्वतःच्या कुळदेवतांचें स्मरण तर ग्रंथाच्या अगदीं शेवटास उपसंहार लिहितांना त्याला झालें आहे. पहाः—

करवीरलक्ष्मी विष्णुभाजा । **भैरव** सुवर्णपुरींचा राजा ।
उभय कुळदैवतीं माझा । मस्तक पायीं स्पर्शिला ॥ ८ ॥

यावरून कर्नाटकांत त्याचें वास्तव्य असावें, ही जी समजूत ती दृढ होते.

अयोध्या, मधुरा, माया, काशी, **कांची**, अवंतिका ।
पुरी द्वारावती, चैव सप्तैता मोक्षदायिकाः ॥

हा भारतांतील क्षेत्रांची नामावलि देणारा श्लोक प्रसिद्धच आहे. उत्तरेकडे काशीसारख्या ठिकाणीं जशीं महाराष्ट्रीय कुटुंबें जाऊन राहात, त्याप्रमाणें दक्षिणेकडे 'कांची' सारख्या तीर्थयात्रेचे ठिकाणीं जाणें अस्वाभाविक नाहीं. कांचीला रामदासस्वामींचा मठ होता व भगवंत नांवाचा मठाधिपतिही त्या ठिकाणीं होता, असें कै. स. खं. आळतेकर लिहितात.[४३] तेव्हां कांचीच्या मुक्तेश्वराच्या आसपास जर या कुटुंबाचें किंवा स्वतः कवीचें वास्तव्य झालें असेल, तर या देवतेची भक्ति जडून त्याचा तो उपासक होणें संभवनीय आहे. आदिपर्वाच्या आरंभीं विष्णु-कांचीच्या वरदराजाला त्यानें नमन केलेलें मीं दाखविलेंच आहे. मुक्तेश्वरांचें देवालय शिवकांचींत आहे. आदिपर्वाच्या २६ व्या अध्यायांत त्यानें **शिवकांचीचा** निर्देश केला आहे. पंडूच्या अश्वमेधाच्या वेळचें वर्णन करतांना तो लिहितोः—

कराड आणि कर्णाटक । चोळमंडळादि अनेक ।
देश मल्याळ पंचभर्तारिक । पांडुरायें जिंकिलें ॥ २६ ॥
श्रीरंगपट्टण **शिव-कांची** । समुद्रवासी गडवासी यांचीं ।
स्थळें जिंकूनि दुर्जनांचा । अपार वस्तु आणिल्या ॥ २६ ॥

या वर्णनाला मूळ संस्कृत महाभारतांत आधार असलेला मला आढळला नाहीं. द्रविड-देशांतील तामीळ भाषेचा ठसा मुक्तेश्वराच्या मराठी वाङ्मयावर उमटलेला आहे कीं काय, हें सांगणें शक्य नाहीं. त्याला स्थानिक भाषा अवगत होती, असें गृहीत धरलें तरी मराठी वाचकांकरितां म्हणून लिहिलेल्या ग्रंथांत द्राविडी शब्दांची पेरणी करून आपला ग्रंथ तो मुद्दाम दुर्बोध करील, हें शक्य नाहीं. कांहीं विशिष्ट द्राविडी लकबा त्याच्या वाङ्मयांत आढळत असल्यास द्राविडी भाषा जाणणाराच तें ओळखूं शकेल. मात्र द्रविड देशांसंबंधीचे मूळ भारतांत नसलेले कांहीं उल्लेख त्याच्या वाङ्मयांत आढळतात. पहा—

कटीं कटारे तडक हातीं । उघड आंगीं सत्वर गती ।
तें कर्णाटकयुद्ध म्हणती । रणपंडित निर्धारें ॥ ५५ ॥
आपादमस्तकावरी ओढण । आड करूनि परतें मारण ।
तैलंगयुद्ध तें जाण । आंध्रदेशस्थ बोलती ॥ ५६ ॥

—अ० ३१.

मागील युगाच्या अवसरीं । स्वेच्छाचारें वर्तती नारी ।
धेनुवृषभाचिये परी । संततिदानीं भलताही ॥ १२१ ॥

---

४३ श्रीसमर्थचरित्र, १९३३. पृ० २००.

तो आचार अद्यापवरी । उत्तरदक्षिणेमाझारीं ।
वर्तत असे लोकाचारीं । कुरुपांचाळदेशीं मल्याळीं ॥ १२२ ॥

—अ० २७.

आधींच शंखध्वनीचा उल्हास । त्यावरी पातला फाल्गुनमास ।
कीं व्यभिचारिया मल्याळ प्रांत । दैवयोगें लाधला ॥ ६८ ॥

—अ० ३५.

हाच विचार सभापर्वामध्येंही नमूद आहेः—

हा आचार अद्यापवरी । केरळमल्याळासिंधुपारीं ।
दक्षिणदेशीं सर्व नारी । स्वेच्छाचारें वर्तती ॥ १०४ ॥

—अ० ८.

अतिपरिचयादवज्ञेचें हें लक्षण नाहीं ना ? असे जे ब्रेवाईट द्राविडांसंबंधीं पूर्वग्रह ते तेथील लोकांशीं त्याच्या निकट परिचयाशिवाय निर्माण झालेले दिसत नाहींत. मद्रास प्रांतांतील गोदावरीजिल्ह्यांतील मुक्तेश्वराचे देऊळ पैठणहून आलेल्या गोदावरी नदींनें सुस्नात अशा भागांत जरी असलें तरी तो प्रदेश महाराष्ट्रीयांचें लक्ष वेधण्याइतका आकर्षक व प्रसिद्धही नाहीं. कांचीच्या मुक्तेश्वराचा व कवि मुक्तेश्वराचा जो मीं संभाव्य संबंध दाखविला तो निश्चित करण्यास आणखीही पुष्कळ पुरावा पुढें आला पाहिजे. पैठणच्या मुक्तेश्वराचें देऊळ मी स्वतः तिकडे जाऊन पाहूं इच्छितों. तें आजही तेथें असेल कीं काय हें सांगतां येत नाहीं. याविषयीं चौकशी चालविली आहे. प्रो. कोलते ता. १७–११–५० च्या पत्रांत लिहितात कीं, स्थानपोथींतील मुक्तेश्वराचें देऊळ हल्लीं पैठणला असेल कीं नाहीं सांगवत नाहीं; कारण तो भाग उध्वस्त झालेला आहे. मुंबईसरकारच्या दप्तरखान्याचे प्रमुख डॉ. पु. म. जोशी हे स्वतः पैठणला जाऊन आले व असें देवालय तिकडे नसल्याचें त्यांनीं सांगितलें. कवि मुद्गलानें कोठल्या मुक्तेश्वराच्या प्रेरणेवरून 'मुक्तेश्वर' असें मुद्रानाम धारण करून 'महाभारत' लिहिलें याचा निश्चय होत नाहीं.[४४]

---

४४ हा निबंध लिहून झाल्यानंतर बऱ्याच दिवसांनी नाशिकचे प्रो. पा. जि. सबनीस यांनीं पांगारकर स्मारकग्रंथांत (१९४९) मुक्तेश्वरावर एक निबंध लिहिलेला माझ्या वाचनांत आला. भरपूर साधनांच्या अभावीही त्यांनी काढलेले कांही निष्कर्ष कौतुकास्पद आहेत. मुक्तेश्वराच्या नांवावर एक विश्वंभराची आरती आहे. ती आरती काव्यसंग्रहांत (मुक्तेश्वरकृत स्फुट काव्ये, पृ० २९४) प्रथम छापिली गेली. पण तिच्या पांचव्या क्रमांकांतील पहिला चरण अपुरा आहे. पहा—

.....पीतीर । जयासंनिध अवतार ।
प्रगटोनी धर्मासी तू पापी तारियले थोर ॥ ५ ॥

हा पहिला चरण प्रो. सबनीस यांनीं आपल्या निबंधांत, 'उद्दालका तापीतीर ।' असा

मुक्तेश्वराच्या वैयक्तिक माहितीपेक्षांही त्याच्या अज्ञात काव्यांचा शोध होणें जास्त आवश्यक व महत्त्वाचें आहे. मुक्तेश्वर हें नवें मुद्रानाम धारण करण्यापूर्वी 'चिंतामणिसुत मुद्गल' या नांवानें त्यानें लिहिलेली कविता किंवा नंतर 'मुक्तेश्वर' या नांवाखालीं लिहिलेली कविता या दोहोंचाही तपास केला पाहिजे. यापैकीं मला उपलब्ध झालेलें पहिल्या वर्गीतील एक पद व एक आरती वर दिलेलीच आहे. दुसऱ्या वर्गीतील अप्रकाशित कविता यथावकाश प्रसिद्ध होईल. 'चिंतामणिसुत' एवढ्याच नांवाखालींहि कांहीं कविता आढळतात त्या मुक्तेश्वराच्या मानतां येणार नाहींत. त्याचप्रमाणें केवळ 'मुद्गल' या नांवाखालीं असलेली कविताही मुक्तेश्वराची म्हणतां येणार नाहीं. रामायणा रचणाऱ्या मुद्गलाशिवाय कृष्णदास मुद्गल, अनंतसुत मुद्गल, दादोसुत मुद्गल असे अनेक जुने मुद्गल कवि मराठींत होऊन गेले आहेत.

कांहीं पदांखालीं मुक्तेश्वर असें मुद्रानाम नमूद नाहीं. पण लीलाविश्वंभराचा निर्देश असल्यावरून तीं मुक्तेश्वराचीं अशीं मानलीं जात आहेत. तीं खरींच त्याचीं आहेत कीं काय, याचाही विचार झाला पाहिजे. विश्वंभर किंवा लीलाविश्वंभर अशा मुद्रानांवाखालींही कांहीं पदें आढळतात. तीं मुक्तेश्वरांच्या वडिलांचीं असल्याचा आमच्या एक संशोधक मित्रांचा समज झाल्याचें त्यांच्या पत्रावरून दिसलें. तो कसा भ्रामक आहे हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल,

मुक्तेश्वराचें उपलब्ध वाङ्मय कोणतें याची खालीं यादी देतों म्हणजे त्याच्या अनुपलब्ध किंवा अज्ञात कवितेचा शोध लावण्यास मदत होईल. प्रत्येक ग्रंथाची अजमासें पद्यसंख्याही कंसांत निर्दिष्ट करीत आहें.

१ **रामायण**–(श्लोकबद्ध–सात कांडें–१७२५); २ **महाभारत**–आदि (७१२३), सभा (२७००), वन (२७६५), विराट (९९१), सौप्तिक (५००), भगवद्गीता (७०९); ३ **हरिश्चंद्राख्यान** (६०८); ४ **शुकरंभासंवाद** (४४६); ५ **हनुमंताख्यान** (६२); **गजेंद्रमोक्ष** (३६); ६ **शतमुखरावणवधाख्यान** (११३); ७ **विश्वामित्रभोजन** (४६); ८ **दुर्योधनशल्यपरिस्फोट** (७१); ९ **अर्जुनकामपूर्ति** (५६); १० **मूर्खांचीं लक्षणें** (११३); ११ **एकनाथ-**

दिला आहे. मीं पृच्छा केली असतां हा पाठ त्यांना एका जुन्या आरत्यांच्या संग्रहांत आपणास सांपडल्याचें त्यांनीं कृपापूर्वक कळविलें. या आरतीचा कवि म्हणून मुक्तेश्वराचें तींत नांव नाहीं. विश्वंभराला ती उद्देशून आहे म्हणून ती मुक्तेश्वराच्या नांवावर घातली आहे एवढेंच. तरीपण "उद्दालका तापीतीर" म्हणजे काय याचा शोध करण्यासारखा आहे. तापीतीरावर मुक्तेश्वराचें म्हणजे लीलाविश्वंभराचें देवालय आहे कीं काय याचा तपास झाला पाहिजे.

चरित्र (९४); १२ **कुडीआत्म्याचें भांडण** (अप्रकाशित); १३ **पदें**–मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्यें व विराटपर्वाची नवी काव्यसंग्रहआवृत्ती पहा; १४ **आरत्या**–गणपति, हनुमंत, बहिरोबा, महालक्ष्मी, तुळशी (२), ज्ञानदेव (२), एकनाथ (२), विश्वंभर; १५ **भूपाळी** गोपाळ.

मुक्तेश्वरानें भागवत लिहिलें आहे असें कविचरित्रकारांनीं[४५] व अलीकडील नवनीताच्या संपादकांनीं नमूद केलें आहे.[४६] त्याचीं कालियामर्दन व अहिमहिआख्यान हीं काव्यें उपलब्ध असल्याचें भावे लिहितात.[४७] वत्सलाहरणही त्यानें रचिलें आहे, असें गोडबोले सांगतात.[४८] ही माहिती खरी आहे कीं काय याचा तपास झाला पाहिजे.

१३. १ **गा** औं पु ; २ **पौराणिक** नि ख रा गो·२ तं ; ३ **अमरपति** गो.

जेणें[1] वालखिल्ल[2] कोपें । दुसरा इंद्र पैं[3] साक्षपें ।
करीत होते तें[4] त्वां[5] कृपें[6] । निरोपिलें पाहिजे ॥ १४ ॥
सौति ह्मणे हो जी ऐका । कश्यप सृष्टीचिया जनका ।
संततीकामनेस्तव देखा[1] । याग करितां पुत्रेष्टी[2] ॥ १५ ॥
शक्त्यनुसार[1] सामग्रीसीं । साह्य जाले देवऋषी ।
शक्रें पर्वतातुल्य[2] रासी । समिधांचिया आणिल्या ॥ १६ ॥
देखोनि अंगुष्ठप्राय[1] ऋषी । साठी[2] सहस्र वैखानसीं ।
वितिमात्र[3] येकीं सायासीं । पालाशसमिधा तोडिल्या[4] ॥ १७ ॥
खांदीं वाउनि[1] समस्तीं । शनैः शनैः आणितां पंथीं ।
गोष्पदप्राय[2] आपांपति[3] । तैसा पुढें[4] भासला ॥ १८ ॥
पाय[1] निसरोनि अवचितें । आवघे पडले[2] त्या आंतौतें ।
चुबकळ्या[3] खातां[4] येकमेकांतें । काकुळती[5] झोंबती ॥ १९ ॥
हें देखोनि तये काळीं । इंद्र हांसे[1] पिटूनि[2] टाळी ।
ह्मणे[3] पाहा[4] हो [5] गोष्पदजळीं । ब्राह्मण कैसे बुडाले ॥ २० ॥

---

१४. १ **जिहीं** औं ; २ **वालखिल्य** नि मुं , **वालखिलें** नां पु तं , **वालखिलीं** औं ; ३ (–) औं पु ; ४–५ **तेव्हां** गो·२ ; ५ **तां** धु , **तुवां** औं पु ; ५–६ **कौतुकें** ख.

१५. १ **जो कां** औं ; २ **पुत्रेंसीं** पु.

१६. १ **भक्तिसार** औं , **भक्तिनेसार** पु ; २ **पर्वततुल्य** नि.

१७. १ **अंगुष्ठप्रमाण** मुं ; २ **साठी** नि मुं ; ३ **वितस्तिमात्र** नि , **विथीमात्र** गो , **विधिमात्र** गो२ ; ४ **तोडिली** नि रा औं पु.

१८. १ **वाहूनि** नि नां ; २ **गोष्पदजळ** रा गो·२ , **गोस्पदयेक** धु , **गोष्पद** नां तं ; ३ **अपांपती** नि ख मुं (स प्रसंप्रा) ; ४ **तयां** औं.

१९. १ **पाये** पु·४ धु ; २ **पडिले** नि खवर्ग ; ३ **बुचकळ्या** नि ख औं पु ; ४ **खात** नि ख पु·४ मुं ; ५ **कवळुनियां** नि.

२०. १–२ **हांसोनि पिटि** ख मुं औं पु ; ३ (–) खवर्ग ; ३–५ **पहा चोज** नि.

ऐसे जीव जे देखती[१] । तयांसि हांसावयाचे अर्थीं[२] ।
ब्रह्में[३] निर्मिलें[४] निश्चिती[५] । विनोदार्थ जगातें ॥ २१ ॥
परी[१] धांवोनि[२] आपुल्या[३] हातें[४] । कडे[५] न[६] काढीच[७] तयांतें[८] ।
ते वेळीं[९] ते[१०] महाविष्णूतें । बोभाइलें[११] आकांतीं ॥ २२ ॥
तये संकटीं जगदीश्वरु[१] । संसारक्लेशाब्धीचें[२] तारूं ।
त्वरें पावोनि कमळावरू[३] । तारक जाला तयांतें ॥ २३ ॥
इंद्रें हांसोनि[१] उपहासिलें । तेणें मानसीं संतापलें[२] ।
मग तेथेंचि बैसोनि[३] करिते जाले । तपश्चर्या अत्युग्र[४] ॥ २४ ॥
इंद्रासि हारी आणी युद्धीं । बळें आगळा ऐश्वर्यनिधि ।
ऐसा निर्मूं[१] इंद्रपदीं । दुसरा इंद्र अविलंबें ॥ २५ ॥
देखोनि ऋषींचें[१] निर्वाण । इंद्र धाकें कंपायमान ।
कश्यपासी जाऊनि शरण । रक्षीं रक्षीं ह्मणतसे ॥ २६ ॥
कुमर[१] घालूनियां पाठीं । कश्यप आला तपियां[२] निकटीं ।
ह्मणे मजवरी ठेवूनि[३] दृष्टी । कोप सांडा सात्विक हो ॥ २७ ॥

---

२१. १ देखीजती औं ; २ आर्तीं ख पु·४ नां औं गो·२ ; ३ ब्रह्मयानें नि ख पु४ , ब्रह्मेने धु नां , ब्रह्मेन गो·२ , ब्राह्मण पु ; ४ नेमिलें पु तं ; ५ निश्चितीं गो·२.

२२. १ येरी ख ; १–४ ऐसें बोले कारुण्यातें धु तं ; ३–४ आपुलां हातीं गो·२ ; ५ कोणी नि ; ५–८ कडे काढिना तया ऋषितें ख , परि धांवोनि न काढी तयांतें धु तं ; ९ काळीं औं पु ; १० (–) नि मुं औं पु गो·२ ; ११ बोभाविलें नि.

२३. १ जगदेश्वरू ख पु·४ मुं नां गो२ ; २ जो संसार° नि मुं ; ३ कमलाकरु तं.

२४. १ पाहोनि औं पु ; २ आसंतोषले पु४ ; ३ (–) नि खवर्ग ; ४ अति उग्र धु तं.

२५. १ निर्मूनि ख औं पु गो२.

२६. १ इंद्राचेवरी मुं.

२७. १ कुमार नि धु ; २ तयां नि ख मुं नां पु, तपस्वियां धु तं , ऋषि औं ; ३ देऊनि नां रा.

योग्य जाणोनि इंद्रपदीं । त्यातें[1] स्थापूनि गेला विधि ।
तुह्मीं धरोनि विषादबुद्धी । विपरीत करूं पाहतसां ॥ २८ ॥
तरी तुमचा काम[1] पावे[2] सिद्धी । इंद्र न चळे इंद्रपदीं ।
ऐसी मी येक[3] सांगेन बुद्धी । ते तुह्मीं[4] कृपेनें अनुष्ठा ॥ २९ ॥
न करूनि[1] त्रिदशांचा इंद्र । तपें[2] निर्मावा[3] पतगेंद्र[4] ।
वीर्यशौर्यबळसमुद्र[5] । इंद्राहूनि[6] आगळा ॥ ३० ॥
ऐसें कश्यप भगवान ऋषि । प्रार्थोनि मागुनी[1] घेतां[2] त्यांसी ।
वालखिल्य सुखसंतोषीं । वर वोपिते जाहले ॥ ३१ ॥
ह्मणती सहज तूं पुत्रकामार्थी । आमुच्या तपाचें फळ घे हातीं[1] ।
जो[2] मनोरथ[3] तुझ्या[4] चित्तीं । तोचि पावो सिद्धीतें ॥ ३२ ॥
तेणें वरें गरुडनिधान । विनतागर्भशुक्तिके[1] रत्न ।
निपजलें[2] पुढां जालें कथन । तें[3] तुह्मीं मागां[4] परिसिलें ॥ ३३ ॥
असो[1] तो गरुड महाबळी । स्वर्गीं प्रवेशे[2] तये[3] काळीं[4] ।
पक्षवाताचिये धूळीं । मंदाकिनी डहुळत[5] ॥ ३४ ॥

---

२८. १ **त्यांतें** नि , **यातें** ख पु४ मुं नां रा.

२९ १ **कोप** औं पु ; २ **पावो** पु·४ नां औं ; ३ (–) ख नां औं धु पु ; ४ (–) नि नां औं.

३०. १ (+) **त्याग** नि , **करिं** औं पु ; २–३ **नमांवा तेथें** पु४ , **निर्मावा तपें** नि , **निर्मावा पैं** औं ; ४ **तपेंद्र** ख , **नगेंद्र** मुं , **पक्षेंद्र** औं पु ; ५ **वीर्यबळें जैसा समुद्र** मुं , **वीर्यें शौर्यें बळें प्रसिद्ध** औं पु ; ६ **इंद्रापरीस** औं.

३१. १–२ **मांगे निघतां** पु४ , **मागों निघतां** तं , **मागोनि घे** पु , **मागुनी** गो·२.

३२. १ **हस्तीं** नि ; २–३ **जे कामना** औं ; ४ **तुमच्या** ख पु , **तुमचा (चां)** पु४ , **तुह्मां** गो·२ , **तुझा (झां)** रा धु औं.

३३. १ **विनतागर्भशुक्तिका** नि ख पु४ गो·२ ; २ **निफजलें** ओ पु ; ३ **मागां** नि मुं ; ४ **तें** नि , (–) मुं , **सांग** नां.

३४. १ **ऐसा** धु गो·२ ; २ **प्रवेशला** धु तं , **प्रवेशोनि** पु ; २–३ **प्रवेशलिये** पु४ ; ४ **वेळीं** पु ; ५ **डहुळीत** नि.

तें जाणवलें[१] समस्त[२] सुरां । आला ह्मणोनि[३] हातियेरा[४] ।
हातवसोनि[५] येरयेरां[६] । धीरशब्द[७] वोपिती ॥ ३५ ॥
तवं सहस्र दिनकरांचा मेळ । कीं[१] उदेला[२] प्रळयानळ[३] ।
पक्ष भोंवडितां[४] भूगोळ । चक्रीं पडे[५] गरगरां ॥ ३६ ॥
नखें देखोनि सणाणी[१] । सुरांचे शस्त्रीं पाझरे पाणी ।
येक[२] वज्रा आणिया[३] दोन्ही । तैसी[४] चंचू[५] समसमीत ॥ ३७ ॥
देखोनि सुरांचिया थाटी । करिते[१] जाले[२] शस्त्रवृष्टि ।
गर्जनेच्या[३] अतिबोभाटीं । गगन घुमों लागलें ॥ ३८ ॥
तडक भिंडिमाळागुंडे[१] । चक्रें नाराच[२] लोहखांडें[३] ।
भाले त्रिशूळ इडपाडें[४] । घे घे ह्मणौनि टाकिती ॥ ३९ ॥
हें देखोनि प्रळयरुद्र । क्रोधें[१] खवळला विहगेंद्र[२] ।
ह्मणे देव हो तुमचा इंद्र । जरी पातला विबुधेंसी[३] ॥ ४० ॥
अथवा साठी[१] सहस्र गणीं । युद्धा[२] आलिया[३] पिनाकपाणी[४] ।
नातरी[५] वैकुंठ सांडूनि । मधुसूदन पातलिया[६] ॥ ४१ ॥

---

३५. १ जाणवेल पु४ ; १–२ समस्त जाणवलें नि खवर्ग (औं प्रसंप्रा); ३–४ ह्मणती महावीरां औं पु ; ५ हातीं वसवोनि नि ख , हातीं वसोनि पु , हातवसवुनी नां तं , हातवसुनी धु रा ; ६ हातियेरा औं पु ; ७ °शब्दें नि पु४ औं गो·२ तं.

३६. १ (–) औं पु ; २ (+) देखोनि औं पु ; ३ प्रळयकाळ मुं ; ४ भवंडितां नि ख मुं पु४ गो·२ ; ५ भ्रमे औं.

३७. १ नयनीं औं ; २ एका नि खवर्ग ; ३ अणिया नि मुं (स प्रसंप्रा); ४ तैसे नि औं पु गो·२ ; ५ चुंचु मुं नां औं.

३८. १–२ करित्या जाल्या धु ; ३ गर्जोनि औं पु·

३९. १ भिंडमाळा° औं गो·२ धु , भिंडिमाळ° रा ; २ नाराचें पु·४ नां ; ३ लोहखंडें नि रा तं , लोखंडें नां गो·२ ; ४ इडेंपाडें नि पु·४ औं मुं गो २.

४०. १ कोपें नि खवर्ग ; २ पक्षींद्र औं पु ; ३ विबुधांशीं नि.

४१. १ साठ नि ; २ युध्या पु·४ धु नां ; ३ आला नि , आलियां ख पु४ नां , आलेया गो·२ ; ४ शूळपाणी ख ; ५ जरी नां ; ६ पातला नि नां गो२ , पातलियां धु तं.

तऱ्हीं [१] कश्यपाचा कुमर । मागां न सरे खगेश्वर ।
ऐसा जाणोनि निर्धार । हांव सांडा[२] जुझाची[३] ॥ ४२ ॥
हरिहर तोषवुनी युद्धीं । आपुलें काज नेईन[१] सिद्धी ।
गर्वा चढेल[२] जो[३] दुर्बुद्धी । तो पावेल[४] क्लेशातें ॥ ४३ ॥
ऐसें [१] गर्जोनि[२] येकसरीं । झेंप घातली[३] निर्जरभारीं[४] ।
जैसा युगांतीं[५] त्रिपुरारी । क्षोभे विश्व नाशावया[६] ॥ ४४ ॥
पक्ष[१] पिटोनियां धरणी । मृत्तिका भरली सुरलोचनीं[२] ।
रजें आछादिला तरणी । कोण्हा कोण्ही न देखे ॥ ४५ ॥
पांसुनिबिडाचिये[१] रातीं । येरयेरांवरी[२] आदळती ।
शस्त्रें सांडूनियां[३] हातीं[४] । अनिमिष[५] दृष्टी[६] झांकिती[७] ॥ ४६ ॥
ते[१] अवस्वरीं[२] सहस्रनयन[३] । आज्ञापूनि[४] पाठवी[५] पवन ।
मेघ पाडूनि रजःकण । शांत[६] सीघ्र[७] करावया[८] ॥ ४७ ॥

---

४२. १ **तरी** नि ख मुं ओं रा गो·२ ; २ **सांडी** ख मुं ; ३ **युद्धाची** नि ख मुं ओं , **युध्याची** पु·४ नां.

४३. १ **नेइजे** धु ; २ **चढला** नि ओं पु गो·२ , **पासोनि** पु४ ; ३ **तो** पु४ गो रा ; ४ **पाववीन** ओं. (पु ३/२).

४४. १–२ **ऐसी गर्जना** ओं पु ; ३ **घाली** नां ओं ; ४ **निजनिर्धारीं** धु तं ; ५ **प्रळयांतीं** धु तं ; ६ **जाळावया** गो२.

४५. १ **पक्षें** ओं पु ; २ **सुरांच्या नयनीं** ओं धु , **सुरा नयनीं** तं. पु४ मध्यें ही ओवी नाहीं.

४६. १ **पक्ष निबिडाचिया** नि , **पक्ष निबि°** ख मुं ना , **पाक्षि निबि°** पु४ , **पांशनिबि°** रा गो·२ , **पासनिबि°** धु , **पडली निबिडता** ओं पु ; २ **येरयेरां वीर** धु तं ; ३ **सोडुनि** पु४ गो२ , **सांडुनि** ओं ; ४ **उभय हातीं** ओं ; ५–७ **झांकिती नेत्र अनिमिष्यें** मुं , **लोचनांतें झांकिलें** ओं ; ६ **नेत्र** नि ; ६–७ **झांकिती** ख पु४ , **झांकिती लोचन** नां , **झांकिती दृष्टीतें** गो·२.

४७. १ (–) मुं ; २ **अवसरीं** नि पु४ रा नां , **अवेश्वरीं** गो·२ ; ३ **सहस्रलोचन** पु , °**नयेनें** पु४ ; ४ **आज्ञां पुसोनि** पु४ ; ५ **पातले** पु४ ; ६ **शांति** ओं ख पु गो२ ; ७–८ **लागीं पावावया** ओं , **करावे पैं सीघ्र** मुं.

आज्ञेनें[1] मुसळप्राय[2] सैरा । मेघीं[3] मोकळिल्या जळधारा[4] ।
विद्युत्प्राय[5] अतिभेदरा । पक्षेंद्रातें[6] दाविती ॥ ४८ ॥
मेघीं भंगिलियां[1] धुळोरा[2] । देखते जाले येरयेरां ।
परजूनियां[3] हातियेरां । पुढतीं मारूं लागले ॥ ४९ ॥
दशघ्नी शतघ्नी सहस्रघ्नी । शस्त्रास्त्रांच्या प्रहरणीं ।
तीक्ष्ण[1] धारांच्या[2] खणाणीं[3] । वन्ही वर्षों लागला ॥ ५० ॥
येक ह्मणती जितचि[1] धरा । येक ह्मणती शतखंड करा ।
येक ह्मणती जाला पुरा । वज्रधारें[2] गिरी जैसा ॥ ५१ ॥
येक ह्मणती लघुलाघवें । वरुणपासीं[1] चरणग्रीवे ।
गोंवुनी पांजिरां[2] रक्षावें । कौतुकार्थ पाखिरूं[3] ॥ ५२ ॥
परिसोनि देवांची वल्गना । गरुड मिसळला[1] रणकंदना[2] ।
पक्षवातावर्तीं[3] जाणा । असंख्यात गोविले ॥ ५३ ॥
येक ऊर्ध्व उडविले गगनीं । येक टाकिले समुद्रजीवनीं ।
येक व्योमींहुनी[1] धरणीं । पडती उठती पुनःपुन्हा[2] ॥ ५४ ॥

---

४८. १ (–) औं, **आज्ञेन** गो२; २ **मुसळ अमोघ** औं; ३ **मेघें** ख, **मेघेन** गो; ४ **धारा** धु तं; ५ **विद्युत्पातें** नि मुं नां, **विद्युत्पात** औं पु, **विद्युत्प्रायें** ख; ६ **पक्षींद्रातें** नि नां गो. ३ व ४ चरण धु व तं मध्यें नाहींत.

४९. १ **भंगिला** नि रा औं पु; २ **धुरोळा** नि रा मुं; ३ **परतोनियां** नि पु. धु मध्यें १ व ३ आणि तं मध्यें १ चरण गहाळ.

५०. १ **तीक्ष्णतीक्ष्ण** नि, **तिक्षण** धु तं नां; २ **बाणांचा (चां)** तं धु; ३ **खणाखणीं** तं.

५१. १ **धरा** औं पु; २ **वज्रघातें** औं पु तं धु सोडून इतर, **वज्रधारा** औं, **वज्रधारीं** पु.

५२. १ °**पाशीं** नि मुं औं पु तं; २ **पिंजरीं** नि, **पीजिरा** ख गो, **पांजरां** औं मुं, **पांजरा** पु४ रा धु, **पांजिरा** गो२ पु; ३ **पखारूं** नि मुं.

५३. १ **उसळला** पु४, **मिनला** गो; २ **युध्यकंदना** नां गो; ३ °**पातावर्ती** पु४.

५४. १ **व्योमाहुनी** धु तं; २ **पुनः पुनः** नि, **पुनः पुनाः** रा गो२.

लागतां[1] नखांचा चपेट । शस्त्रास्त्रें[2] होती पीठ[3] ।
चंचु हाणतां[4] रागीट । चूर्ण होती मस्तकें ॥ ५५ ॥
निर्जरांचीं दिव्य शरीरें । चंडघाईं[1] शतजर्जरें ।
प्रबळ[2] रुधिराचेनि पूरें । देवगंगा माजली[3] ॥ ५६ ॥
हस्त पाद अंगोलिका । खंडिती[1] जैशा पादपशाखा ।
केश श्मश्रु लुंचुनि[2] देखा । क्षपणिक तैसे[3] भासती[4] ॥ ५७ ॥
गरुडमाराचिये[1] नेटीं[2] । कोण्हा[3] धैर्य न धरवे[4] पोटीं ।
अमरगणीं देउनी[5] पाठी[6] । पळते जाले सत्वर[7] ॥ ५८ ॥
साध्यादिक[1] सगंधर्व[2] । पूर्वे[3] उजू[4] पळाले सर्व ।
धाकें रुद्र[5] आणि[6] वसव । दक्षणादिशा लंघिती ॥ ५९ ॥
आदित्य पळाले पश्चिमे[1] । अश्विनौदेव[2] धांवती सौम्ये[3] ।
ह्मणती प्रळयविहंगमें[4] । देवसृष्टि आटिली ॥ ६० ॥
अश्वक्रंदन रेणुक्रथन । तपन उलूक निमेषण ।
पुरुजेनादि देवगण । येकें येक पळाले ॥ ६१ ॥

---

५५. १ **लागती** पु४ ; २ **शस्त्रें अस्त्रें** नि ख पु४ मुं नां रा ; ३ **पीष्ट** धु तं , **कुट** रा ; ४ **हाणितां** नि ख पु४ मुं गो·२ तं.

५६. १ °**घाये** नि , °**घातें** गो२ , **चंडनखीं** औं ; २ **प्रळय** ख मुं औं गो२ पु ; ३ **मातली** तं , **लोटिली** ख.

५७. १ **खंडित** नि , **खंडती** पु·४ तं ; २ **लुंचतां** नि , **लुंचने** ख पु४ रा , **लुंपने** तं , **लोचन** गो·२ ; ३ **जैसे** औं पु गो ; ४ **दिसती** मुं. धु मध्यें ही ओवी नाहीं.

५८. १ °**मारावया** धु तं ; २ **हटीं** धु तं ; ३ **कोणा** नि मुं गो·२ पु ; ४ **धरे** औं नां , **नुपजे** धु ; ५ **देखोनि** नि ; ६ **पाठीं** नि ; ७ **सत्वरा** नि.

५९. १ **सिद्ध साध्या**° नि , **साध्यादि** औं ; २ **गंधर्व** नि , **गणगंधर्व** औं , **सहगंधर्व** धु ; ३ **(–)** धु तं , **पूर्व** रा ; ४ **उज** स ; ५–६ **रुद्रादि** औं.

६०. १ **पश्चमे** ख धु तं ; २ **अश्विनी**° नि , **अश्विनो**° मुं ख गो ; ३ **क्रमें** मुं ; ४ **प्रळयीं विहं**° गो·२.

ऐसें देखोनि[1] अद्भुत । क्रोधें[2] खवळला यम[3] कृतांत[4] ।
दंड पडताळूनि त्वरित । गरुडाउजू[5] धांविनला[6] ॥ ६२ ॥
जेणें काळदंडें[1] भीम । जगाचे[2] प्राण दंडी यम ।
तेणें ताडितां विहंगम[3] । चोज कैसें वर्तलें ॥ ६३ ॥
दंड झेलूनि[1] जयपाणी[2] । नवनीतप्राय गिळिला वदनीं ।
ह्मणे[3] रे[4] विष्णुकिंकरा स्वमीं । यमबाधा असेना ॥ ६४ ॥
आतां पाहें[1] जगहिंसका । निर्दयानिष्ठुरजीवकंटका[2] ।
तुझिया छेदूनि मस्तका । अमर करीन विश्वातें ॥ ६५ ॥
म्हणोनि[1] धांविनला रागें । यम सवितयाआड रिघे[2] ।
सूर्यसारथियातें सांगे । निर्वाणवेळा[3] सांभाळीं ॥ ६६ ॥
अरुण ह्मणे अगा अनुजा । माझिया स्वामीचिया आत्मजा ।
कृपेनें[1] रक्षीं पवित्रद्विजा । ऐकोनि[2] गरुडें[3] सोडिला[4] ॥ ६७ ॥
पुढें त्रिगुणत्रिशूळधारी[1] । हरें ताडिला[2] लक्षूनि[3] दुरी ।
विवेक साधकें[4] सुविचारीं । सावधानें[5] चुकविला[6] ॥ ६८ ॥

---

६१. १ **ऐकोनि** गो२ ; २ **कोपें** नि खवर्ग (**यम** ख) ; ३ (–) नि खवर्ग (पु·४ प्रसंप्रा) ; ४ **कृदांत** नां तं , **कृदांत** धु ; ५ °**उजूं** स तं ; ५–६ **धांविनला गरुडावरी** औं , **धांविनला गरुडाप्रती** पु.

६३. १ °**दंड** ख नां तं , **काळेंदंड** धु ; २ **विश्वाचे** धु तं ; ३ **विहंगोत्तम** मुं.

६४. १ **भेदुनी** मुं ; २ **विजयपाणी** नि ; ३–४ **ह्मणौनि** औं ; ४ (–) पु.

६५. १ **ऐकें** औं पु ; २ **निर्दयानिर्जीवकंटका** मुं , °**जीवकीटका** ख गो तं , °**जगकंटक** पु४.

६६. १ **ह्मणऊनि** नि ख ; २ **निघे** नि तं ; ३ **हीणवेळा** गो·२.

६७. १ **कृपेन** गो·२ ; २ **कृपेनें** पु४ नां , **मग तो** मुं , **ऐकतां** नि ; २–४ **गरुडें कृपेनें सांडिला** ख , **गरुडें सोडिला उपेक्षुनी** औं ; ४ **सोडिलें** धु.

६८. १ °**धारीं** ख ; २ **ताडूनि** मुं , **ताडितां** रा तं , **सोडिला** पु ; ३ **लक्षिला** मुं , **देखोनि** नां ; ४ (–) पु४ , **साधकां** मुं , **साधन** औं , **साधनें** पु , **साधक** गो२ ; ५ **सावधान** पु४ नां ; ६ **चुकविलें** मुं.

कौतुकें[१] झेलित[२] धैर्यगती । निस्तेज करूनि वोपितां[३] हातीं ।
आश्चिर्य[४] मानी[५] गिरिजापति । बळ अद्भुत देखोनि[६] ॥ ६९ ॥
हांसोनि ह्मणे[१] खगनायका[२] । तुझेनि पावलों परमसुखा[३] ।
वरद[४] वदोनि[५] मग[६] कौतुका[७] । पाहों ठेला निराळीं[८] ॥ ७० ॥
आशावरुणपासीं[१] वरुण[२] । दंभाचारें गोवितां चरण ।
निर्लोभतेचे[३] नखीं[४] जाण । शतखंड[५] केला[६] साधकें ॥ ७१ ॥
विष्णुस्मरण जयाचे वदनीं । तयातें बाधूं[१] न सके[२] कोण्ही ।
ऐसा निश्चयो करूनि गगनीं[३] । निवांत[४] ठेले[५] समस्त ॥ ७२ ॥
वीजु[१] चामके[२] जेणें[३] पाडें । तैसा गरुड झेंपावे पुढें ।
अमृत लक्षी[४] तवं धडाडें[५] । वन्ही धडके[६] सभोंवता[७] ॥ ७३ ॥
प्रळयीं पसरे[१] कृतांतवक्त्र[२] । तैसें परिधिज्वाळाचक्र[३] ।
गगनचुंबित अवक्र । मनासी[४] मार्ग[५] असेना[६] ॥ ७४ ॥

---

६९. १ तो कौतुकें नि ; २ झेलूनि नि , झेलितां धु ; ३ वोवितां पु४ , वोपी मुं ; ४ आश्चर्य नि मुं गो२ ; ५ मानुनी नि मुं , करुनी नां ; ६ देखिलें मुं.

७०. १ बोले नि खवर्ग (ख प्रसंप्रा) ; २ °नायक पु·४ नां औं ; ३ °सुख पु·४ नां औं ; ४ वर नि खवर्ग (पु·४ प्रसंप्रा , आश्चिर्य नां) ; ५ देखोनि नां ; ६ (–) नां धु ; ७ त्र्यंबक नां , कौतुक पु·४ औं तं ; ८ निराळा नि खवर्ग.

७१. १ ऐसा वरुणपासीं नि , अशावरुण° तं , आशापाश औं धु , आशापाशीं मुं ; १–२ आशावरणपाशावरण पु ; २ वरुणें पु४ धु ; ३ निर्लोभतेचा (चां) औं पु ; ४ नखें ख नां गो२ ; ५ °खंडें मुं ; ६ केले नि खवर्ग (केलीं मुं).

७२. १ बांधूं नि गो२ ; २ शके नि खवर्ग (नां प्रसंप्रा) गो२ ; ३ मनीं गो , (–) मुं ; ४–५ निर्वाण केलें पु४.

७३. १ वीज नि मुं ; २ चमके नि खवर्ग (पु·४ प्रसंप्रा) ; ३ जाणे पु४ , येणें नां ; ४ वेष्टित नां , लक्षित गो ; ५ धडाडे नि खवर्ग (पु४ प्रसंप्रा) , काडाडे नां , झडाडे गो·२ ; ६ लक्षी पु४ ; ७ सभोंवतां तं.

७४. १ प्रसवे औं , पसरी मुं ; २ कृदांतवक्त्र नां , पावकवक्त्र गो२ ; ३ परिज्वाळा° ख गो ; ४–६ अग्नि धडके सभोंवतां मुं.

हें[1] देखोनि गरुडोत्तमें[2] । बुद्धि[3] योजिली[4] मनोधर्मे[5] ।
सुधावरोधी[6] पावक शमे । ऐसा करूं उपावो[7] ॥ ७५ ॥
शरीरीं करूनि अनंतवदनें[1] । भरिलीं अनंतनदींचीं[2] जीवनें[3] ।
तेणें सिंपितां प्रळयघनें[4] । जेविं[5] शमिजे[6] प्रळयाग्नि[7] ॥ ७६ ॥
यापरी अनळ[1] करूनि[2] शांत । पुढां संचरे[3] भेदित[4] पंथ ।
तवं देखिलें अत्यद्भुत । जें[5] कां असाध्य प्रयत्नीं ॥ ७७ ॥
सुधावापिकेचें वक्त्र[1] । त्यावरी[2] भोंवे[3] कर्तरीयंत्र ।
जैसें कुंभकाराचें[4] चक्र । सहस्त्रधारा[5] धगधगी[6] ॥ ७८ ॥
ज्याचें[1] होतांचि संघटण[2] । सहस्त्रखंडें[3] आते[4] पवन ।
तीक्ष्णतेच्या भयेंकरून । वन्ही काष्ठीं लपाला[5] ॥ ७९ ॥
त्याची[1] चुकवूनियां भवंडी[2] । यंत्रधारेचिये[3] सवडी ।
माजी संचरला तांतडी । सूक्ष्म देह धरूनियां ॥ ८० ॥

---

७५. १ **तें** ख ; २ **द्विजोत्तमें** धु तं ; ३ **बुधी** धु ; ३–४ **बंधीयोजनी** पु४ ; ५ **स्वधर्मे** धु तं ; ६ **सुधाविरोधी** ख ; ७ **उपाव** नि मुं. औं व पु मध्यें ही ओवी नाहीं.

७६. १ **आनंदघन** औं , **अनंदवदन** पु ; २ °**नद्यांचीं** नि , °**सरितांचीं** धु तं ; ३ **जीवन** पु ; ४ °**घन** ख नां रा पु , **प्रळयाग्न** औं ; ५–६ **शांत जाला** नि खवर्ग ; ६ **शामविजे** रा गो , **शमे जीव** तं ; ७ **क्षणार्धें** औं. गो२ मध्यें ही ओवी नाहीं.

७७. १–२ **करोनि अनळ** नि खवर्ग ; ३ **चामके** ख ; ४ **भेदोनि** गो२ , **वेधित** पु४ ; ५ **जो** औं पु.

७८. १ **वस्त्र** मुं , **चक्र** नां ; २ **तीवरी** नां , **त्यापें** धु ; २–३ **त्यास भोवें** तं ; ३ **भंवे** ख औं पु गो·२ रा ; ४ **कुंभकार** पु·४ नां गो , **कुलाळाचें** मुं , **कुंभाराचें** औं ; ५ °**धार** धु तं ; ६ **झगझगी** नि खवर्ग (**झगमगी** मुं).

७९. १ **त्याचें** गो·२ ; २ **संघट्टण** नि ख मुं ; ३ °**खंड** नि , **सहस्त्रधारा** पु , **सहस्त्रधा** औं ; ४ **होतो** नि , **आंत** ख पु४ , **आत** पु , **आंते** गो·२ ; ५ **लागला** ख.

८०. १ **त्यातें** पु४ , **यातें** तं ; २ **भुवंडी** ख , **भंवडी** पु४ तं ; ३ **चक्रधारेचिया** नि , **चक्रधारे**° खवर्ग (**चक्रधारा**° औं पु).

चक्र भ्रमत[1] असतां वेगीं । यंत्रमुखें पैलिये[2] भागीं[3] ।
रिघता[4] जाला जैसा योगी । ब्रह्मरंध्रीं[5] प्रवेशे ॥ ८१ ॥
पुढें पाहे अमृता[1] निकटीं । वेढे[2] घातले महाकर्कोटीं[3] ।
जो जीव पडे[4] त्याचिये दृष्टी । तो भस्म होय क्षणार्धें ॥ ८२ ॥
तेथें अदृश्य होऊनि[1] आपण । पांखीं[2] भरिले[3] मृत्तिकाकण ।
उघळोनि सर्पांचे लोचन । अंध केले निःशेष[4] ॥ ८३ ॥
मुखीं आणि[1] नासिकीं[2] नयनीं । व्याळ निर्बुजले रजकणीं[3] ।
कुंडाआंतौता[4] उतरोनी । अमृत माथां वंदिलें ॥ ८४ ॥
रौप्यकळसीं पवित्रसुधा[1] । संपूर्ण[2] भरिली[3] मुखमर्यादा[4] ।
वदनीं[5] झांकिलें अरविंदा[6] । कनकाचिया हस्तकीं[7] ॥ ८५ ॥
यंत्रमूळीं[1] नख[2] स्पृदले[3] । चक्र उपडोनि[4] पैं[5] सांडिलें ।
मनोवेगाहूनि वहिलें । अमृत घेऊनि उडाला ॥ ८६ ॥
गर्जना करीत जयजयकारें । गगनमंडळीं घालीत[1] फेरे ।
म्हणे देव हो बळिष्ठ वीरें । सीघ्र[2] यावें संग्रामा ॥ ८७ ॥

---

८१. १ भंवता धु ख , भंवत औं पु तं ; २–३ पैलभागीं नि ख मुं पु४ ; ४ निघता नि , जाता धु तं ; ५ °रंध्र नि.

८२. १ अमृत नि ख मुं औं रा गो पु ; २ तवं वेढे ख गो·२ ; ३ कर्कोटीं मुं औं ; ४ पणें नि.

८३. १ होय ख धु ; २ पंखीं नि ; ३ भरले नि ख पु४ मुं , भरिली औं पु ; ४ निःशेषें तं.

८४. १ (–) मुं औं पु ; २ नाकीं नि ; ३ रजःकर्णी नि , अंकर्णी तं ; ४ °आंतौति नि , °आंत मुं.

८५. १ पवित्रशुद्ध औं पु ; २ सुपर्णें तं ; ३ भरिलें औं पु तं , भरली नि पु४ मुं नां ; ४ °मर्याद औं पु ; ५ मुखीं गो ; ६ अरविंद औं पु ; ७ हस्तकें नि खवर्ग.

८६. १ यंत्रमुखीं मुं नां गो·२ ; १–३ यंत्रमुखिंहूनि उसळले औं ; ४ उपटोनि नि ; ५ (–) नि खवर्ग.

८७. १ घाली धु गो१ ; २ त्वरेंसि औं.

अद्भुत कर्म[१] देखोनि नयनीं । सन्मुख पातला सारंगपाणी[२] ।
माईक क्रोध अवलंबुनी । चक्र वेगीं मोकळिलें ॥ ८८ ॥
येतयेतां सुदर्शन । गरुडें गिळिलें पसरूनि[१] वदन ।
हृदयस्थाच्या[२] हातीं जाण । भूषणार्थ वोपिलें ॥ ८९ ॥
विष्णु ह्मणे भला रे भला । प्रसन्न जालों माग[१] वहिला ।
अमृतप्राशनेंवीण[२] केला । देह तुझा अक्षयी ॥ ९० ॥
गरुड ह्मणे[१] कमळापति । वर[२] मागें कां[३] मजप्रती ।
देव[४] ह्मणे अवश्य हातीं । भाष्य[५] वोपीं उदारा ॥ ९१ ॥
गरुडें[१] देतां भाष्यप्रमाण[२] । हरि ह्मणे होई[३] माझें वहन[४] ।
दास्यधर्मे[५] पाळुनि वचन । ध्वजस्तंभीं[६] राहावें ॥ ९२ ॥
गरुड ह्मणे समर्थबोलें[१] । हो तैसेंचि[२] अंगिकारिलें ।
भावें[३] येऊनि[४] वंदिलें[५] । पादांबुज[६] विष्णूचें[७] ॥ ९३ ॥
तवं इंद्रातें पावली हाक । गरुड घेऊनि गेला पीयूख[१] ।
आड[२] धाविनला सरोख[३] । नागारूढ नगवैरी ॥ ९४ ॥

---

८८. १ (–) पु४ धु ; २ शार्ङ्ग° नि तं.

८९. १ लावोनि गो२ ; २ हृदयस्थाचा (चां) औं पु४ नां , हृदयस्ताचा गो२.

९०. १ मागें धु तं ; २ °प्राशना° नि धु मुं पु४.

९१. १ (+) गा गो·२ ; २ तूंचि वर नि , तूं वर खवर्ग तं ; ३ (–) नि ख नां औं ; ४ देवो रा गो·२ ; ५ भाक नि औं पु , भाष मुं रा.

९२. १ गरुड नि पु नां ; २ भाकप्रमाण नि औं पु गो२ , भाष्यदान ख , भाषणप्रमाण धु , भाष° रा मुं पु४ ; ३ हो नि , देई पु४ , (–) मुं ; ४ वाहन नि गो·२ ; ५ दासधर्मे धु तं ; ६ ध्वजा° औं पु धु.

९३. १ हो समस्तबोलें ख ; २ तसेंतेचि तं ; ३ उभय ख ; ४–५ वंदित पाउलें औं ; ६–७ श्रीविष्णूचीं आवडी औं.

९४. १ पीयूष्य ख , पीयूष पु·४ मुं नां रा गो·२ ; २ आडवा नि ; ३ रोष ख पु४ गो२ , सरोष मुं नां पु , रोषें गो.

वज्र सोडिलें सव्य हस्तीं[१] । तेजें जैसा तीव्र गभस्ती[२] ।
गरुडें[३] झेलूनि ह्मणे हे[४] अस्ती[५] । भंगूं नये ऋषीची ॥ ९५ ॥
मग शक्रातें ह्मणे वचनीं । माझें सामर्थ्य[१] पाहें[२] नयनीं ।
ह्मणोनि पक्षापासूनि धरणी । पर्ण येक सोडिलें ॥ ९६ ॥
तें कनकपाचूनिबद्ध[१] पत्र । ठसे उमटले चित्रविचित्र[२] ।
तेजें[३] सहस्रचक्षूचे[४] नेत्र । झांकोळले[५] सौंदर्यें[६] ॥ ९७ ॥
देखोनि हरि हर कमळासन । ह्मणती याचें नाम सुपर्ण[१] ।
ये[२] पर्णधारेतळीं[३] चूर्ण[४] । शत[५] होती[६] वज्राचीं[७] ॥ ९८ ॥
पृथ्वी सागरसहितगिरी[१] । येक[२] पक्षपर्णाचे[३] अग्रीं ।
ब्रह्मायुष्यवर्षेंवरी[४] । वाहों सके विस्मरणें[५] ॥ ९९ ॥
येवढी जयाची आंगवण । त्या[१] जुझोनि[२] वांचे कवण ।
यालागीं सख्य करूनि जाण । काज[३] साधीं[४] सुरेशा[५] ॥ १०० ॥
ना गवे[१] देखोनि गृध्रराव[२] । इंद्र इछि मित्रभाव[३] ।
ह्मणे गरुडा मजसीं स्नेहो[४] । वाढता करीं बंधुत्वें ॥ १०१ ॥

---

९५. १ हातीं धु तं, हस्तें औं ; २ अग्नितें औं ; ३ गरुड नि तं ; (–) नि खवर्ग तं ; ५ अस्थि नि (स प्रसंप्रा) रा, हस्ति गो·२.

९६. १ कौतुक नि खवर्ग ; २ पाहें पां औं, पाहा कां धु.

९७. १ °पाचूंनिं बंध नि ; २ विचित्र मुं, विचित्रविचित्र धु ; (–) नां, पाहातां धु, तेजेंतेजें तं ; ४ सहस्राक्षाचे औं, सहस्र तं ; झांकुळले नि ख पु४ ; ६ पैं तेणें औं.

९८. १ संपूर्ण नां ; २ हें नि, इये नां, हे गो२ ; ३ °धारतळीं नि, ारेतळीं औं, धारेतळें पु ; ४ शतखंडण औं ; ५ शतें नि पु४ मुं गो, तखंड धु ; ५–६ होय चूर्ण औं ; ७ वज्राचें औं.

९९. १ सागर सहस्रगिरी नि, सप्तसागरगिरी औं ; २ (–) औं ; ३ पक्षाचे नां, पर्णाचे गो२ ; ४ °वर्षवरी धु पु नां, ब्रह्मेशादि ष्पापरी औं ; ५ अविश्रमें औं पु.

१००. १ तयासी नि खवर्ग ; २ झुंजोनि नि ; ३ कार्य नि खवर्ग ; –५ आपुलें साधावें पु४.

१०१. १ गवें औं ख पु४ गो२ तं ; २ °राव नि (स प्रसंप्रा) ; ३ °भाव ; ४ स्नेह नि.

आणि जे इछा असेल[१] मनीं । तो वर मागें मजलागुनी ।
माझे शत्रुमित्र[२] मानीं । शत्रुमित्र[२] आपुले ॥ १०२ ॥
गरुड ह्मणे हे[१] सहस्राक्ष[२] । सर्प होतु[३] कां[४] माझे भक्ष[५] ।
हा[६] वर वोपिल्या[७] मुक्ष[८] । मित्र माझा तूं येक ॥ १०३ ॥
विशेष[१] कश्यपाचा कुमर । होसी[२] वडील सहोदर[३] ।
दोघे खेचरांचे[४] इंद्र[५] । नामही येक दोघांचें[६] ॥ १०४ ॥
ह्मणोनि आह्मांतुह्मां[१] सहजें । मैत्री[२] योग्यता[३] समान साजे ।
आतां[४] काज[५] माझेनि[६] काजें । आपुलेंसें मानीं तूं ॥ १०५ ॥
शक्र ह्मणे अगा सखया । छत्तीस कुळें सर्पां[१] यया[२] ।
त्या माजी तूतें भक्षावया । सप्तविंशति वोपिलीं ॥ १०६ ॥
उरलीं[१] जन्मेजयाचे यज्ञीं । भस्म होतील[२] हुताशनीं ।
त्यांत[३] कांहीं आस्तिक मुनि । सुष्ट[४] ते[५] ते[६] रक्षील ॥ १०७ ॥
ऐसें[१] बोलोनि दोघीजणीं[२] । स्नेहें मीनले[३] आलिंगनीं ।
इंद्र ह्मणे[४] मग प्रार्थूनी । वाक्य माझें अवधारीं ॥ १०८ ॥

---

१०२. १ (–) धु ; २ शत्रु मित्र नि.

१०३. १ (–) मुं धु पु ; २ सहस्राक्षा ख मुं धु गो ; ३ होत नि खवर्ग (नां प्रसंप्रा) तं ; ४ (–) औं गो ; ५ भक्षा धु गो ; ६ हाचि औं , (+) एक नि ख मुं नां गो२ रा ; ७ वोपिल्यां धु ; ८ मुख्य नि खवर्ग , मुक्षा धु , मुख तं.

१०४. १ विशेषें रा गो ; २ होशील नि गो ; ३ सोहदर रा धु ; ४–५ खेचरभूचर औं ; ६ दोघांतें रा धु.

१०५. १ तुह्मांआह्मां नि खवर्ग (औं पु प्रसंप्रा) ; २–३ मित्रभावो औं ; ४–५ आतांचेनि औं ; ६ माझिये नि , माझे धु औं , अपुलेनि ख.

१०६. १ सर्पांस नि , सर्पांचीं औं पु गो ; २ या नि औं गो.

१०७. १ उरले नि खवर्ग ; २ होती पु४ ; ३ त्यांतून नि , त्यांतें ख नां ; ४ श्रेष्ठ नि मुं पु , सुतंतू नां ; ५–६ (–) नां , ते तैं तं , ते गो२.

१०८. १ एवं नि ; २ दोघे° नि ख , °जनीं पु , दोघेजनीं औं ; ३ देऊनि औं ; ४ बोले ख.

तुज काज नाहीं या[1] अमृतें । कृपेनें[2] उचित वोपीं मातें ।
गरुड ह्मणे तदर्थ चित्तें[3] । चिंता कांहीं न करीं[4] तूं[5] ॥ १०९ ॥
किंचित्कार्याचेनि[1] उद्देशें । अनुचिष्ट[2] सुधा मी[3] नेतसें[4] ।
वेंचों[5] नेदीं[6] हें[7] विश्वासें । वचन माझें मानीं तूं ॥ ११० ॥
हें सर्पांतें दावूनी[1] नयनीं[2] । ठेवीन पवित्र कुशस्थानीं[3] ।
तुवां हरावें[4] तेथुनी[5] । अदृश्यगती सत्वर ॥ १११ ॥
ऐसा संकेत सांगूनि[1] वहिला । सर्पसदनाप्रती पातला ।
अमृतकुंभ दाविता जाला । परम आल्हाद[2] सकळांतें[3] ॥ ११२ ॥
गरुड ह्मणे अशुचिपण[1] । असतां दुर्लभ[2] अमृतपान[3] ।
स्पर्श करील त्यापासून । अदृश्य होईल तात्काळीं[4] ॥ ११३ ॥
ह्मणोनि पवित्र गंगाजळीं । मंगळस्नानें[1] सारूनि[2] सकळीं ।
मग बैसोनि सुहृदमेळीं । पीयूषपान करावें ॥ ११४ ॥
गंगातीरीं[1] स्थळ निर्दोष । कुशमंडळीं[2] अमृतकळश ।
ठेविता जाला पतंगाधीश[3] । दाऊनियां सर्पांतें ॥ ११५ ॥

---

१०९. १ (–) नि मुं रा गो औं पु , हे पु४ ; २ कृपेन गो०२ , कृपें औं ; चीतें धु पु४ नां ; ४–५ करावी मुं नां , मनावी औं.

११०. १ किं मत्कार्या° धु तं , °त्कार्याच्या नि औं पु , °त्कार्याचे मुं ; २ अनुच्छिष्ट नि , अनुछिष्ट नां तं ; ३–४ मानीतसे तं ; ५ चवों मुं , चो गो , चेवों गो२ ; ६ नेदितां खवर्ग ; ७ (–) ख औं पु.

१११. १–२ वहिलें दानीं धु , दानीं वहिला नयनीं तं ; ३ कुशासनीं नां , कुंभस्थानीं गो ; ४–५ रहावें तेथे येउनी औं पु.

११२. १ दाउनि ख औं पु गो ; २ अद्भुत मुं ; ३ सर्पांतें औं.

११३. १ °पणें पु४ गो , अशौच्यपणें धु तं ; २–३ अमृत दुर्लभ कवण ; ३ अमृतकण तं , °पानें पु४ ; ४ तात्काळ नि मुं नां.

११४. १ °स्नान ख पु तं ; २ करूनि ख नां गो०२ पु.

११५. १ गंगास्थळीं ख , गंगातळीं गो२ , गंगातटीं औं ; २ कुशस्थळीं औं ; ३ पन्नगा° ख , खगा° औं.

आजिपासोनि माझी जननी । दासित्व[१] दोषापासुनि[२] अरुणी[३] ।
साक्ष येथें[४] सूर्य धरणी । ऐसें[५] गर्जोनि[६] जाणवी[७] ॥ ११६ ॥
सर्पी[१] मानुनियां वचन[२] । त्वरें सारिती[३] संध्यास्नान[४] ।
लाऊनियां उभय नयन[५] । मंत्र जपती मानसीं ॥ ११७ ॥
ते संधी लक्षूनियां निरुती । इंद्रें[१] येऊनि अदृश्यगती ।
अमृत हरिलें कवणे रीती । प्राण[२] जैसा कृतांतें[३] ॥ ११८ ॥
नियम सारुनियां व्याळीं[१] । येऊनि पाहती कुशस्थळीं[२] ।
अमृत न देखोनि सकळीं । हाहाकार[३] माजविला[४] ॥ ११९ ॥
गरुडें ठकिलें[१] ठकिलें[२] पाहीं । आतां उपाय न चले कांहीं ।
अमृत ठेविलें ते[३] ठायीं । दर्भ जिह्वा[४] चाटिती ॥ १२० ॥
तिये[१] दर्भधारेकरुनी । चिरोनि[२] जिह्वा[३] जालिया दोन्ही ।
ते साक्षी[४] अद्यापिवरी[५] लोचनीं । लोक देखती प्रत्यक्ष ॥१२१॥
अमृतहाणिचेनि[१] दुःखें । दाहिलें[२] चिंतेचिया[३] पावकें ।
विनता पुष्टीं[४] वाहोनि[५] सुखें[६] । गरुड गेला स्वाश्रमा ॥ १२२ ॥

---

११६. १–३ **मुक्त दास्यत्वदोषापासूनि** नि खवर्ग ; ४ **यथार्थ** नि खवर्ग ; ५–७ **गर्जोनि ऐसें जाणवी** नि खवर्ग ; ७ **जाणविलें** धु तं.

११७. १ **सर्प** नि (स प्रसंप्रा) , **सर्पें** पु·४ ; २ **वचना** ख नां , **वचनें** पु४ ; ३ **सारिलें ख , साधुनी** औं , **सारूनि** नि नां पु ; ४ **स्नानां** ख नां ; ५ **नयेनें** पु४ , **नयना** ख नां.

११८. १ **इंद्र** नि पु·४ गो·२ नां मुं ; २ **प्राणांत** नां ; ३ **कृदांतु** नां.

११९. १ **तत्काळीं** औं ; २ **कुंभस्थळीं** गो ; ३ **आहाःकार** गो·२ , **हाहाःकार** नि ; ४ **माजला** गो·२ मुं.

१२०. १–२ **आह्मां ठकविलें** नि , **आह्मां ठकिलें** ख ; ३ **जे** मुं , **तिये** औं पु ; ४ **जिव्हाग्रीं** नि , **जिव्हेनें** मुं , **जिव्हीं** तं.

१२१. १ **ते** ख मुं ; २–३ **जिह्वा चिरोनी** औं पु ; ४ **साक्ष** नि ख मुं औं धु गो·२ ; ५ **अद्यापि** नि मुं औं गो.

१२२. १ °**हराचेनि** नि ख नां , °**हरणाचेनि** औं पु , **हरिलियाचे** पु४ ; २ **दहिलें** ख नां पु ४ रा गो२ , **हरिलें** मुं ; ३ **चिंतेचेनि** औं पु ; ४ **पृष्टीं** नि पु४ मुं रा तं ; ४–६ **वाहोनियां पृष्ठें** ख.

सत्तावीस कुळें व्याळ । क्रोधें ग्रासिले[1] महाविशाळ ।
उरले[2] भयें पाताळबिळ[3] । भेदोनियां[4] पळाले ॥ १२३ ॥
येकत्र करूनि जनकजननी । आपण[1] लागला[2] विष्णुभजनीं[3] ।
इतुकी[4] कथा[5] नैमिषारण्यीं[6] । सौती सांगे शौनका ॥ १२४ ॥
हें[1] आख्यान[2] श्रद्धाभक्ती[3] । पढोनि पुढिलां[4] परिसविती ।
त्यांतें[5] पृष्ठीं[6] वाउनी अंतीं । वैकुंठासि[7] ने[8] गरुड ॥ १२५ ॥
आणि सर्पापासूनि कदा । नाहीं विषदंशाची[1] बाधा ।
ऐसें व्यासाचिया शब्दा । विश्वासेंसीं[2] मानिजे[3] ॥ १२६ ॥
येथूनि संपलें सौपर्ण[1] । पुढती[2] मांडिलें आस्तिकाख्यान[3] ।
ते कथेसि निजावधान[4] । सज्जनीं दिधलें पाहिजे ॥ १२७ ॥
इति श्रीभारते आदिपर्वणि । मुक्तीशगिरा[1] ताम्रपर्णी[2] ।
साहित्यमोतियांची भरणी । जोडे ग्राहीक[3] श्रोतयां ॥ १२८ ॥

इति श्रीभारते आदिपर्वणि षष्ठमोऽध्यायः ॥

---

१२३. १ व्यापिले पु४ ; २ (+) ते औं गो२ ; ३ तात्काळ औं , पाताळ गो२ ; ४ पाताळ लंघित औं , भेवोनिया गो·२.

१२४. १–३ इतुकी कथा नैमिषारण्यीं नि खवर्ग (खगेंद्र मेला विष्णुभुवनीं औं पु) ; ४–६ वर्तली ते यथार्थवचनीं नि खवर्ग. [नि खवर्ग या मध्यें वरील तिसरा चरण दुसरा करून तिसरा नवीन घातला आहे व दुसरा चरण गाळला आहे.]

१२५. १–२ आख्यान हें नि ख पु४ मुं नां ; २ व्याख्यान पु ; ३ श्रद्धोक्तीं औं ; ४ पुढल्या नि ; ५ त्यांसी औं पु ; ६ पुष्ठीं नां औं पु गो·२ ; ७ स्वर्गाप्रति नां ; ८ नेई नि मुं गो·२.

१२६. १ विषदंशादि रा , विषाची नां , दंशादि औं पु ; २ विश्वासें नि , विश्वासपूर्ण मुं , विश्वासोनि गो२ ; ३ मानिजो गो·२.

१२७. १ सुपर्ण धु गो , संपुर्ण पु४ ; २ पुढें नि खवर्ग गो·२ ; ३ आस्तिकायन रा गो·२ ; ४ अवधान मुं. औं व पु मध्यें ही ओवी नाहीं.

१२८. १ मुक्तेश° ख औं पु·४ , मुक्तेश्वरगिरा नि मुं ; २ तारकावर्णी मुं , पर्वणी औं पु ; ३ ग्रंथीं ख , साहित्य पु·४.

॥ श्री ॥

अध्याय सातवा

श्रीगणेशाय नमः

शौनक ह्मणे लोमहर्षणी । मागील कथा परिसिली[१] श्रवणीं ।
सर्पाभिधानें[२] तुझी वाणी । वदली नाहीं विस्तारें ॥ १ ॥
तें सांगोनि पन्नगसत्र[१] । जें कां अद्भुतरसाचें पात्र ।
तेणें आमुचे क्षुधित श्रोत्र[२] । संतृप्त करीं[३] उदारा ॥ २ ॥
सौति[१] ह्मणे[२] अहो[३] जी स्वामी । संख्या न सरे[४] सर्पनामीं[५] ।
तथापि श्रेष्ठ श्रेष्ठ ते[६] मीं । अनुवादेन अवधारा[७] ॥ ३ ॥
शेष वासुगी[१] ऐरावत । तक्षक कर्कोटक धनंजय कुशत[२] ।
कालिया[३] मणिनाग कंबलाश्वत[४] । आपूरण[५] आणि पंजरक[६] ॥ ४ ॥
येळापत्र वामन व्याळ । नीळानीळ कल्माष[१] शबळ[२] ।
आर्यक[३] उग्रक नहुष[४] पिंगळ । पोतक[५] आणि सुदुर्मुख[६] ॥ ५ ॥
दधिमुख क्षता[१] विमळ पिंडक । आयुशंख[२] कोटरक[३] ।
वालखिल[४] निष्ठुरक[५] । हेमगुह महानाग ॥ ६ ॥

---

१. १ **परिसविली** धु ; २ °**धान** पु ४ ,°**धानी** औं गो.

२. १ °**सुत्र** पु४ , **पन्नगा**° औं पु गो२ ; २ **चक्षुश्रोत्र** गो·२ ; ३ **वरी** तं.

३. १ **श्रोते** पु ; २ **ह्मणती** औं पु ; ३ (–) नि ; ४ **धरे** पु४ मुं , **पुरे** नां , **सिरे** रा ; ५ °**धार्मी** औं ; ६ **हो** मुं ; ७ **अवधारी** नि.

४. १ **वासुकी** नि तं औं रा गो२ ; २ **कुशीत** नि , **कुसित** मुं ; ३ **काळिय** नि ; ४ **कंबल श्वेत** नि औं पु रा गो·२ , **कंबळास्वेत** ख , **बळाश्वेत** पु४ ; ५ **अपूर** रा गो·२ , **आपूर्ण** पु ४ ; ६ **पिंजरक** नि.

५. १ **जल्माश** ख , **उम्मेष** पु४ , **उन्मिश** औं पु , **गुल्मश** धु , **कुल्मश** तं , **उन्नश** नां ; २ **संबळ** धु गो·२ ; ३ **अर्थक** औं ; ४ **नौश** धु तं ; ५ **पातक** पु४ धु ; ६ **सुनामुख** नि.

६. १ **क्षत्ता** नि ; २ **आप्तशंख** नि (संस्कृत **आप्त शंख**) ; ३ **करोटक** नि , **कर्कोटक** धु , **कोटिरक** नां औं पु , **कोटारक** गो·२ ; ४ **वालिशिख** नि (संस्कृत) ; ५ **निष्ठानक** नि (संस्कृत).

बाह्यकर्ण हस्तिकर्ण[१] मुद्गर । पिंडक कळीक[२] येकवीर[३] ।
पुण्यदंष्ट्रवृत्त[४] बिल्व पांडुर । संवर्तक[५] पोत[६] पद्मा[७] ॥ ७ ॥
शंखनख[१] वज्रज[२] कोपन[३] क्षमक[४] । पिंजरक[५] वैरक[६] अतिभद्रक[७] ।
मूषकाद[८] शंखशिर[९] जोतिक[१०] । अपराजित पूर्णभद्र ॥ ८ ॥
श्रीवह[१] कौरव्य[२] धृतराष्ट्र । कुमुद[३] कुमुदाक्ष कुजन[४] कुठर[५] ।
कुंडोदर महोदर[६] कर्कर[७] । शल्यक[८] विरजा[९] सुबाहु ॥ ९ ॥
पुष्कर शालिपिंड वीर्यवान । पीवरक[१] मुखर कोणपायन[२] ।
कुष्मांडक तित्तिर[३] कर्दममान[४] । बहुमूळक[५] सरस[६] ॥ १० ॥
असो हे किती नामसंख्या । प्रगट[१] केलें मुख्यमुख्यां ।
अप्रसिद्ध तयांचा[२] लेखा । विश्वकर्ता स्वयें जाणे ॥ ११ ॥

---

७. १ **हस्तिपद** नि ; २ **काळीक** नि मुं , **कलींग** औं पु (**कालीयक** संस्कृत) ; ३ **येकरवीर** रा गो तं (संस्कृत–**करवीर**) ; ४ **पुण्यदंष्ट्राव्रत** नि , **पुण्यदंष्ट्रवृत्ति** औं पु ; ५ **सर्वांतक** औं पु ; ६ **पौत** नि ख औं पु ; ७ **पद्म** ख पु४.

८. १ **शंखमुख** नि (संस्कृत) , **शंखनक्र** पु४ , **शंखनक** ख रा धु तं , **शेषनवक** औं पु ; २–३ **वज्रकोपन** नि खवर्ग , **वज्रककोपनक** धु ; ३ **कोपनक** तं ; ४ **क्षेमक** नि (संस्कृत) , (–) धु तं ; ५ **पिंडारक** नि (संस्कृत) , **क्षेमक** धु तं ; ६–७ **अतिभद्र मूषक** नि ; ८–९ **मुषकादंशखसिर** पु४ नां धु तं गो·२ , **शंखशिरा** नि ; १० **जोतिरक** नि , **ज्योतिरक** औं पु४ नां मुं.

९. १ **श्रीवर** पु४ , **श्रीबाहु** औं पु ; २ **कौरव** मुं औं पु धु ; ३ (–) नि खवर्ग ; ४ **कुंजन** रा धु नां , **कुंजर** ख ; ५ **कुठार** ख मुं ; ६–७ **कर्कर महोदर** नि खवर्ग ; ८ **सत्य** नि , **सत्यक** खवर्ग , **शाल्वक** गो·२ ; ९ **विराज** नि मुं.

१०. १ **पितक** मुं , **पिनाक** औं ; २ **कोणपाशन** (संस्कृत) ; ३–४ **तित्तिरी कर्दमान** नि , **तितिर्दकमान** ख पु४ औं पु ; ५–६ **बहुमुख कलशरस** नि , **बहुवमुळक स्यरस्य** ख , **बहुमुकुळक षरस** औं पु , **बहुमुळ कुशांकशशांक** गो , **बहुमुळ कुशांकसरांश** गो२ , **बाहुमुलक शराष** तं. ह्या शब्दाबद्दल अनेक अर्थहीन पाठ आहेत. मूळ भारतावरूनही त्याचा उलगडा होत नाहीं. वर घेतलेला पाठ पु ४ मधील असून त्याला जवळ कांहीं पाठ सांपडतात.

११. १ **प्रकट** ख , **प्रघट** गो·२ ; २ **तयांची** नि (**तयांच्या** स) , **तयां** औं पु.

पुत्र पौत्र बहु संतती[१] । नागकन्या पद्मिणीजाती[२] ।
देवांगनातुल्य सुकृती । भोग[३] पावती तयांचे ॥ १२ ॥
सकळसर्पां[१] श्रेष्ठ सुमति । शेष फणींद्र[२] धर्ममूर्ति[३] ।
धरूनि वीतराग विरक्ती । निघता जाला तपातें ॥ १३ ॥
वल्कलवसनें[१] जटाधारी । जितेंद्रिय निराहारी ।
पुण्यारण्य पुण्यगिरी[२] । पुण्यकुहरें वसवितु[३] ॥ १४ ॥
हिमालयगंधमादनीं[१] । दशारण्यपुष्करारण्यीं[२] ।
निर्मळ तपें[३] निर्मळ[४] स्थानीं[५] । निर्मळ मनें[६] आचरत[७] ॥ १५ ॥
तपश्चर्या तीव्र[१] दारुण । देखोनि पातला चतुरानन ।
ह्मणे कवण[२] कामना मन[३] । वांछी[४] तें[५] सांग अनंता[६] ॥ १६ ॥
नागेंद्र ह्मणे देवदेवा । श्रीरंगनाभिकमळोद्भवा ।
सुहृदसंग[१] माझिया जीवा । वांति[२] तैसा[३] नावडे ॥ १७ ॥
हे दुराचारी जगहिंसक[१] । अधर्मसीळ[२] परनिंदक[३] ।
नित्य कळहाचें कौतुक । परस्परें वाढविती ॥ १८ ॥

---

१२. १ **संपत्ती** नि ख पु ; २ **पद्मिनी°** नि ; ३ **भाग्य** औं पु.

१३. १ **सकळसर्प** नि , **सकळीं सर्पों** धु ; २ **फणेंद्र** मुं ; ३ **कुर्म°** पु४ , °**मुहूर्ती** गो२.

१४. १ °**वसन** नां तं ; २ **गिरिवरी** नां , **गिरिकंदरीं** औं ; ३ **वसवित** नि मुं पु४ रा गो·२.

१५. १ **हिमालयीं°** नि , **हिमालयें°** पु४ ; २ **दशारण्यीं°** नि पु४ , **दशारणि°** ख , °**पुष्करारणीं** मुं औं पु तं ; ३ **मनें** गो२ , **तोय** औं ; ४–५ **आचरणीं** गो२ ; ६–७ **स्नानें करितसे** गो२.

१६. १ **अति** औं ; २ **काय** धु ; ३ **मनें** पु४ मुं धु , **जाण** गो२ ; ४ **वांछीत** ख गो·२ ; ५ (–) पु४ गो·२ ; ६ **आतां** औं पु.

१७. १ °**संगें** ख औं पु ; २ **वात** पु रा गो·२ , **वास** औं ; ३ **त्याचा** औं पु.

१८. १ **परनिंदक** ख ; २ **अधर्महीन** ख ; ३ **जगहिंसक** ख , **पर-पीडक** मुं , **परमनिंदक** पु गो तं.

त्यावरी[१] बळिष्ठ[२] सापत्नबंधु[३] । गरुड देवांचा सेवक साधु ।
त्यासी चाळिती[४] वैरसंमंधु[५] । हीनशक्ती पामर[६] ॥ १९ ॥
विशेष मातेनें शापिलें[१] । पावकीं भस्म होतील[२] वहिले ।
तयां[३] जोहरांतूनि[४] केलें । देह[५] माझें भिन्न[६] म्यां[७] ॥ २० ॥
तीव्र[१] तयाचे[२] वैश्वानरीं । शरीर जाळीन निज[३] निर्धारीं ।
ऐकोनि[४] हात ठेविला[५] सिरीं[६] । नाभी ह्मणे विधाता ॥ २१ ॥
मातृशापाचा[१] अनिल[२] । लागों नेदीं तुज अळुमाळ ।
निर्भय होऊनि राहें अचळ । मी सांगेन[३] त्या रीती[४] ॥ २२ ॥
माथां घेऊनियां[१] धरणी । अक्षयीं राहें पाताळभुवनीं ।
सर्व सौख्य[२] तुजलागुनी । पाठवीन त्या ठायां ॥ २३ ॥
तुझेनि तपें[१] जालों[२] तुष्ट[३] । शक्ति देईन अति अचाट ।
पद्मपत्राहुनि हळुवट[४] । धरणी राहो[५] तुज[६] माथां ॥ २४ ॥
अहिराज[१] ह्मणे त्रैलोक्यनाथा । भूगोळ बैसवीं माझिये[२] माथां ।
ब्रह्मा[३] ह्मणे[४] मही डोलतां । आंदोळती[५] गिरिकूटें[६] ॥ २५ ॥

---

१९. १ त्यापरी मुं ; २ (–) ख . बळो धु ; ३ संपन्नबंधु औं पु , सपत्न° ख ; ४ चालविती नि खवर्ग (चालविसी पु , चालती नां); ५ °संबंधु नि ; ६ पामरें धु गो·२.

२०. १ श्रापिलें औं पु धु ; २ व्हाल औं पु ; ३ तेव्हां पु४ ; ४ जोहारां° पु४ मुं ; ५ दिन पु४ ; ६ हिन पु४ , भस्म गो२ ; ६–७ छिन्नाभिन्न औं पु.

२१. १ आतां तीव्र औं पु ; २ तपाच्या नि , तपाचा (चां) नां औं पु धु तं ; ३ (–) गो·२ ; ४ हें ऐकोनि औं मुं ; ५ ठेवी मुं रा गो·२ ; ६ शिरीं नि औं पु गीं·२ तं.

२२. १ मात्रुशापाग्नीचा धु रा ; २ अनळ नि खवर्ग (पु४ नां प्रसंग्रा); ३ ठेवीन ख ; ४ स्थळीं ख.

२३. १ ठेउनियां ख गो , ठेउनी औं पु ; २ सुख तं , सौख्यें औं.

२४. १ तोषें ख, (–) तं ; २ (–) औं ; ३ संतुष्ट औं पु धु ; ४ सुभट ख ; ५ राहेल नि औं ; ६ तुझ्या नि , तुझे पु , तव पु४ मुं औं.

२५. १ अहिनाथ नि , आहि मुं ; २ (–) पु४ ; ३–४ ब्रह्मांड गो·२ ; ५–६ सुगमोपाय बोलतसे गो२.

तेणें प्रळयो[१] होईल भूतां । खचती[२] स्वर्गींचिया[३] चळथा[४] ।
ह्मणोनि तृणाग्र[५] न[६] हालतां[७] । सुगमोपाय[८] सांगतसें ॥ २६ ॥
माझे[१] आज्ञेनें[२] धरा येथ । विवर पाडूनि देईल पंथ ।
तुवां प्रवेशोनि[३] त्वरित । स्तंभ होणें तळवटीं ॥ २७ ॥
करूनि प्रदक्षणा[१] नमन । शेष आज्ञेनें करी गमन ।
विवरें[२] पाताळतळ[३] भेदून । पृथ्वी माथां वाहिली[४] ॥ २८ ॥
सहस्रफणीचा येकमणी । तया रत्नाग्रावरी[१] धरणी ।
धरिली जैसी मृत्तिकाकणी । न दिसे शृंगीं मेरूच्या ॥ २९ ॥
हरिहर लोकीं[१] सकळ भोग[२] । रिद्धिसिद्धीसहित[३] सांग[४] ।
निकट येऊनि[५] उभे[६] मार्ग[७] । पाहती शेषआज्ञेचा[८] ॥ ३० ॥
पुढें परम भक्त ह्मणोन । त्यावरी पहुडला नारायण ।
यापरी शेषें[१] हो[२] आपण । आत्महितार्थ[३] साधिला ॥ ३१ ॥
शेष त्यागूनि गेलियावरी[१] । सर्पीं[२] मिळोनि थोरथोरीं[३] ।
वासुगी[४] केला राज्याधिकारी । इंद्र जैसा सुरगणीं ॥ ३२ ॥

---

२६. १ **प्रळय** ख मुं नां गो·२ , **प्रळई** पु४ ; २ **खचतील** नि ; ३ **स्वर्गा°** पु४ , **सर्गा°** तं ; ४ **चलथा** धु ; ५ **सुग्रह** पु४ ; ६ (–) ख पु४ ; ७ **लाहतां** ख , **लगतां** धु ; ८ **सुखोपाय** नि खवर्ग (**खचों पाहे** औं , **खचों न पाहे** पु).

२७. १ **माझेनि** औं पु तं ; २ **आज्ञे** औं पु , **आज्ञेन** गो·२ ; ३ (+) **तेथें** धु.

२८. १ **प्रदक्षिणा** नि औं पु४ तं ; २ **विवर** नि खवर्ग ; ३ **पाताळगर्त तें** औं , **पाताळ** पु ; ४ **वाहली** ख पु·४ धु गो.

२९. १ **अग्रावरी** औं पु४.

३०. १ **सिद्धाचे** नि (**सिद्धांचे** स) , **सिद्धीचे** खवर्ग (**सीधीचे** पु४) ; २ **भोगें** औं पु ; ३ **ऋद्धि°** नि , **रिधिसिधी°** पु४ ; ४ **चांग** ख मुं , **सांगें** औं पु ; ५ **होवोनि** पु४ ; ६ **उभय** नां ; ७ **वेगें** औं , **मागें** पु ; ८ **तोष आज्ञेचा** धु तं. ही ओवी गो२ मध्यें नाहीं.

३१. १ **शेष** खवर्ग तं ; २ (–) धु ; ३ **परमहितार्थ** धु.

३२. १ **गेलियां°** नां पु ; २ **सर्प** नि मुं ; ३ **लहानथोरीं** गो२ , **°थोरी** नि ; ४ **वासुकी** नि रा गो·२ तं.

सभा करूनि मग समस्तीं । चित्तें[1] भ्रमती चिंतावर्तीं ।
शापारिष्टपरिहारार्थीं[2] । म्हणती यत्न[3] विचारा ॥ ३३ ॥

येक म्हणती ऋषींची[1] काया । धरूनि भेटों जन्मेजया ।
सर्पसत्र न करावया । उपदेश[2] करूं[3] विवेकें[4] ॥ ३४ ॥

येक म्हणती होऊं[1] प्रधान । सेवेनें[2] मोहूं नृपाचें मन ।
येक म्हणती ऋत्विजगण[3] । रात्रीं निद्रिस्त[4] डंखावे[5] ॥ ३५ ॥

येक म्हणती विषोदकधारी । मेघ[1] पाडूं यज्ञावरी ।
येक म्हणती हस्तनापुरी[2] । सर्पमयचि करावी[3] ॥ ३६ ॥

येक म्हणती द्रव्य[1] सकळ । नाश करूं घालूनि[2] गरळ[3] ।
येक म्हणती तो[4] भूपाळ । ग्रासूं[5] पितियासारिखा[6] ॥ ३७ ॥

ऐसीं सर्पमुखींचीं[1] वचनें । येकही[2] राजा[3] न मनी[4] मनें ।
म्हणे हे[5] ब्रह्महत्या रे मरणें[6] । पावतील[7] हुतासीं[8] ॥ ३८ ॥

---

३३. १ **चित्त** गो·२ ; २ **शापाचिये परि°** औं , **शापहारार्थ परि°** पु , **मातृशापपरि°** गो ; ३ **आत्महित** औं पु.

३४. १ **रुषींची** ख पु४ औं , **रुषि** धु , **ऋषि** तं ; २–४ **उपदेशूं नृपातें** औं.

३५. १ **होऊनि** नि ख , **हो** पु४ रा गो२ तं ; २ **शेवेन** पु४ , **सवेंचि** मुं ; ३ **रुत्विज°** पु४ रा धु गो , **रित्विज°** ख ; ४ **निद्रेत** गो२ , **निद्रेस्थ** गो ; ५ **डंकावे** नां गो२ , **खंडावे** ख.

३६. १ **मेघा** नि ; २ **नानापरी ख , °पूरीं** पु; ३ **करावें** ख पु·४ नां रा गो·२. नि खवर्गा मध्यें ३६ व ३७ ओवींची अदलाबदल आहे.

३७. १ **होमद्रव्य** नां , **द्रव्यें** मुं रा ; २ **घालूं** मुं नां ; ३ **गाळ** तं ; ४ (–) औं पु ; ५–६ **ग्रासोनि तयासारिखा** पु४.

३८. १ **सर्पामुखिंचीं** पु४ रा ; २–३ **राजा एकही** नि ; ४ **मानी** नि , **हीन** मुं ; ५ (–) ख औं गो२ ; ६ **मरण** ख पु४ तं , **जाणें** नि ; ७ (+) **निश्चयो** धु , **मरण पावतील** नि ; ८ **हुताशनी** पु.

अधोवदनें[१] वारी[२] मौळ[३] । हस्त[४] झाडी[५] वेळोवेळ ।
हें देखोनी स्वधर्मशीळ[६] । येळापत्र बोलतु[७] ॥ ३९ ॥
ह्मणे गा[१] भुजंगेशा अवधारीं । शाप जाला ते[२] अवस्वरीं[३] ।
मातेचिये मांडीवरी[४] । भयें उपविष्ट मी होतों ॥ ४० ॥
ते वेळीं कानीं पडिलें[१] वचन[२] । तें[३] तुह्मीं ऐका येकाग्रमन[४] ।
शाप परिसोनि चतुरानन[५] । तथास्तु ह्मणे[६] चहूं[७] मुखीं ॥ ४१ ॥
तेथें अमरेंद्रासकट[१] । भावें जोडूनि करसंपुट[२] ।
स्तवनें प्रार्थिला देवश्रेष्ठ । पितामह[३] परमेष्ठी ॥ ४२ ॥
पुत्रा[१] शापूनि करी दहन[२] । ते लांव[३] राक्षसीसमान ।
तिचिया वचना बळ[४] आपण[५] । किमर्थ दिधलें[६] स्वामिया ॥ ४३ ॥
ब्रह्मा[१] ह्मणे[२] परपीडक । त्यांचे हृदयीं अत्यंत[३] दुःख ।
यालागीं वदलें माझें[४] मुख । हो तैसेंचि ह्मणोनी ॥ ४४ ॥

---

३९. १ °वदनी पु४ ; २ वारिलें नि , वाम गो·२ ; ३ माळ ख , मौळें पु४ ; ४–५ श्वास सोडी नि ; ६ धर्मशील नि , °पाळ ख ; ७ बोलत नि (स प्रसंप्रा) पु·४ मुं गो·२ रा , अनुवादे नां.

४०. १ (–) नि मुं औं ; २ जे मुं नां रा ; ३ अवसरीं नि मुं पु४ तं रा , अवेस्वरीं गो·२ ; ४ मांडिये° रा गो·२ मुं.

४१. १ पडिलीं नि ख पु४ रा गो नां तं ; २ वचनें नि ख पु४ नां रा गो·२ तं ; ३ तीं नि ख पु४ नां तं , ते रा गो·२ ; ४ °मनें नि ख पु४ मुं नां रा गो धु ; ५ चतुराननें नि ख पु४ नां रा गो·२ ; ६ ह्मणितलें नि ; ७ चौं धु तं गो२.

४२. १ अमरेंद्रसहित निकट नि , अमरांसहित इंद्रश्रेष्ठ औं पु , अमरेंद्रसहितनिष्ट ख पु४ मुं नां , अमरिं इंद्रासकट रा , अमरइंद्रा° गो·२ ; २ °संपुट्ट पु४ नां औं ; ३ पितामहा धु तं.

४३. १ पुत्र नि पु·४ औं गो·२ ; २ हनन गो·२ ; ३ लाव नि पु४ तं , तवं नां , वेळीप गो·२ , वेळा ख ; ४ बोल तं , डोल धु , बळें पु·४ ; ४–५ अनुमोदन नि ; ६ दिधला धु , दिल्हा तं.

४४. १–२ जो ब्राह्मण ख ; ३ परम पु४ , अत्युग्र मुं ; ४ मातृ गो·२.

दुष्टसंव्हाराकारणें[1] । अपाय रचावा[2] प्रयत्नें ।
सहज[3] मांडला[4] देखोनि मनें[5] । म्यां संतोष मानिला ॥ ४५ ॥
शक्र ह्मणे[1] तूं दीनदयाळ । सात्विक तामस[2] प्राणी[3] सकळ ।
सुष्ट दुष्ट तुझेचि बाळ । कृपेनें[4] देवें[5] रक्षावे ॥ ४६ ॥
हांसोनि बोले सकळेश्वर[1] । सांगणें नलगे हा विचार ।
पवित्र रक्षावया[2] प्रकार[3] । म्यां पूर्वींच रचिलासे[4] ॥ ४७ ॥
दुष्ट[1] पडती[2] हुताशनीं । सुष्टां[3] रक्षील अस्तीकमुनि ।
ऐसें वदोनि[4] पद्मयोनी । पुढती सांगे[5] प्रगटार्थ[6] ॥ ४८ ॥
खसा शेषाची धाकुटी । जरत्कारी सगुणश्रृष्टी[1] ।
जरत्कारु[2] भिक्षेसाठीं । अंगीकारील निजवधू ॥ ४९ ॥
तिचे[1] पोटीं जन्मेल कुमर । आस्तीकनामा[2] ऋषेश्वर[3] ।
तपोतेजें वैश्वानर । धडाडीत[4] वैराग्यें ॥ ५० ॥
तो रक्षील मातुळ[1] जळतां । ऐसें वदला वेदवक्ता[2] ।
तोचि यत्न तुह्मीं आतां । विचारावा मुख्यत्वें[3] ॥ ५१ ॥

---

४५. १ °संहारा° नि (स प्रसंप्रा) मुं औं रा गो·२ तं ; २ रचावे ख मुं नां पु , रची गो·२ ; ३ सहजेंचि गो·२ ; ४ मांडल्या नि ख रा गो·२ , मांडलें औं पु·४ ; ५ माने तं.

४६. १ (+) देव नां ; २ राजस मुं ; ३ नाम मुं ; ४–५ कृपेन दयेन गो·२.

४७. १ सर्वेश्वर नि , चतुर्वक्र औं , सकळैश्वर गो·२ ; २ °वयाचा नि ; ३ विचार ख औं गो२ ; ४ रचिला असे हो धु तं , रचियेला ख गो२.

४८. १ दृष्ट धु पु ; २ पडतील नि पु·४ ख गो·२ ; ३ सुष्ट नि खवर्ग गो·२ ; ४ देखोनि नि , बोलोनि ख नां ; ५ बोले नि खवर्ग ; ६ पुरुषार्थी पु४ , कार्यार्थ तं.

४९. १ सुगुणसृष्टी नि तं , गुणश्रेष्टी ख ; २ जरत्कारी ख नां धु , जरत्कार औं पु गो२.

५०. १ तिच्या नि , तिचा (चां) नां पु धु तं ; २ °नामें ख नां गो·२ ; ३ ऋषीश्वर नि , रुषे° धु ख पु४ ; ४ धडधडीत गो·२ , धडाडी नां.

५१. १ (+) कुळ नि ; २ वेदोक्त ख , पैं धाता औं , देववक्ता तं ; ३ मनुष्यत्वें मुं , सुखत्वें गो२.

ऐकोनि येळापत्रवचन । तोषलें[१] वासुगीचें[२] मन ।
अवघे ह्मणती धन्य धन्य । श्रेष्ठ विचार[३] हा[४] येक[५] ॥ ५२ ॥

यावरी[१] स्वल्पचि[२] काळेंकरून । सुरासुरीं[३] समुद्रमथन[४] ।
मांडिलें तेसमयीं प्रार्थून । नेत्र[५] केला वासुगी ॥ ५३ ॥

कार्य संपादिलिया[१] सर्व । वस्तुलाभें तोषले[२] देव[३] ।
ते वेळीं स्मरोनि स्नेहभाव[४] । पुढती ब्रह्मा प्रार्थिला ॥ ५४ ॥

स्वामी[१] फणींद्र[२] वासुगीनामा । येथें[३] बहुसाल पातला[४] कामा ।
याचें हृदयशैल्य[५] तुह्मां– । वांचोनि कवणें[६] फेडावें[७] ॥ ५५ ॥

याचा हृत्ताप केलिया शांत । आह्मांसि[१] पावलें कोटी उचित ।
ऐकोनि बोले त्रैलोक्यतात[२] । हें म्यां पूर्वींच कथिलेंसे[३] ॥ ५६ ॥

येळापत्र आपुल्या युक्ती[१] । ज्या[२] कां[३] वदला सर्पांप्रती[४] ।
तोचि आठव[५] धरूनि[६] चित्तीं[७] । उपाय[८] इहीं[९] साधावा ॥ ५७ ॥

---

५२. १ संतोषे धु ; २ वासुकीचें नि औं रा गो·२ तं , श्रृंगीचें ख ; ३–५ विचारें बोलतां पु४ ; ५ येकु नां तं.

५३. १ त्यावरी नि ; २ स्वल्प नि ख मुं नां गो२ ; ३ सुराआसुरीं धु पु४ ; ४ °मंथन नि ; ५ रज्जू नि , मैत्र ख औं पु गो , दोर मुं , सूत्र धु.

५४. १ संपादल्या नि , संपादल्यां पु४ नां , संपादलें औं पु ; २ तोषला नि पु४ ; ३ अपूर्व ख ; ४ देहभाव नि औं , भाव धु तं.

५५. १–२ म्हणती स्वामी तं ; ३ फणींद्र धु , मणींद्र तं , (–) गो२ ; ४ आला नां , येथें मेळला गो२ ; ५ हृदयींचें शल्य नि , °शल्य तं , हृदयीचें° मुं नां , हृदयीं शैल ख औं पु , °सैल्य गो·२ ; ६–७ कोणा न फेडवे गो२.

५६. १ आह्मां नि खवर्ग ; २ त्रैलोक्यनाथ पु४ मुं औं धु गो२ , °क्यकांत रा ; ३ कथियेलें गो२.

५७. १ पंक्ती पु४ , उक्ती रा ; २ जे ख पु४ , हें गो२ , जो नां ; ३ काज गो२ ; ४ सर्वांप्रती धु तं ; ५–६ आठउनी ख ; ७ चितिं पु४ नां ; ८ उपाव नां ; ९ यांहीं नि , येहीं पु४ नां , विहित पु.

जरत्कारी रक्षूनि यत्नें[1] । जरत्कारूसि[2] भिक्षार्थ[3] देणें ।
तो आपुल्या रेतदानें । आस्तीकातें जन्मवील ॥ ५८ ॥
तपोतेजें[1] वैश्वानर । मनें शृष्टी मनें संव्हार[2] ।
ऐसा आस्तीक ऋषेश्वर[3] । जळतां रक्षील सर्पांतें ॥ ५९ ॥
त्या ऋषीचा[1] आगमनकाळ । येथूनि समीप जाणा सकळ ।
ऐसें अभय ऐकोनि[2] व्याळ । लोटांगण[3] घालिती ॥ ६० ॥
वासुगी बोले आज्ञावचन । सर्प हो लक्षा द्विजागमन ।
जरत्कारू हें अभिधान । आठव[1] मनीं[2] असों द्या ॥ ६१ ॥
यावरी कौरववंशनृपति[1] । पवित्र राजा परीक्षिति ।
मृगयाव्याजें[2] वनाप्रती । निघता जाला कौतुकें ॥ ६२ ॥
जैसा प्रपितामहा[1] पंडु[2] । धनुर्धरांमाजी प्रचंड[3] ।
तैसा[4] यशकीर्तीनें रूढ[5] । मृगयासीळ[6] स्वधर्मे[7] ॥ ६३ ॥
करीं[1] सायक[2] शरासन[3] । श्वापद[4] लक्षीत हिंडे वन ।
तरस तरळ[5] वराह हरिण[6] । बाणधारा[7] निवटितु[8] ॥ ६४ ॥

---

५८. १ **प्राणें** ख ; २ **°त्कारासी** ख औं पु रा तं ; ३ **भिक्षा** नि पु४ मुं औं पु गो·२ , **भिक्षेसी** ख नां.

५९. १ **तेणें तेजें** गो ; २ **संहार** नि (स प्रसंप्रा) औं तं ; ३ **ऋषीश्वर** नि , **रुषेश्वर** धु पु४.

६०. १ **रुषी** पु४ , **ऋषी** औं पु ; २ **देखूनि** नि ; ३ **लोटांगणें** नि पु४ तं मुं.

६१. १ **आठवण** नि ; १–२ **आठवणीं** तं.

६२. १ **°वंशज नृपती** नि ख पु·४ औं रा गो२ ; २ **मृगवधव्याजें** पु.

६३. १ **प्रपितामह** पु४ मुं नि , **प्रतापि राजा** औं , **प्रपिता राजा** पु , **प्रतापिमहा** नां , **पितामहा** धु ; २ **पांडू** नि ; ३ **चंडु** औं ; ४ **तैसेंच** तं , **तैसाचि** ख पु४ नां रा गो·२ ; ५ **मार्तंड** मुं , **प्रौढु** औं , **प्रहुडु** पु ; ६ **मृगार्थालागीं** पु , **मृगयालागीं** औं ; ७ **स्वधर्मीं** नि , **सर्वदा** ख , **स्वधर्मा** गो·२.

६४. १ **कबरीं** नि ; २ **सायास** धु , **राया चाप** गो२ ; ३ **शरसंधान** औं पु ; ४ **श्वापदें** नि मुं रा गो·२ , **पाखी** धु ; ५ **तगर** धु गो·२ , **चितळ** औं ; ६ **श्वान** किंवा **स्वान** पु४ औं सोडून इतर (**जाण** औं) ; ७ **बाणधारीं** नि ख औं पु तं ; ८ **निवटित** नि मुं गो·२.

पुढां[१] कुरंग[२] येक[३] नयनीं । दूरी[४] देखोनि[५] विंधिला बाणीं ।
घायाळ मृग पळतां वनीं । पाठीं धांवे[६] भूपाळ[७] ॥ ६५ ॥
जैसा शंकर पिनाकपाणि । यज्ञमृगातें विंधोनि बाणीं ।
पाठी लागे[१] धांवे[२] चरणीं । स्वर्गारण्य[३] शोधितु[४] ॥ ६६ ॥
तैसा लागला असतां बाण । वनेंउपवनें[१] लंघी[२] हरिण ।
राजा पाठी[३] धांवतां सीण[४] । पावता जाला अपार[५] ॥ ६७ ॥
पुढां[१] गोरक्षकांचें वृंद । देखिलें[२] करित[३] बहु[४] विनोद ।
वछमुखींचे[५] स्रवती[६] बिंद । तो पयफेन ग्रासिती[७] ॥ ६८ ॥
त्यांतें[१] तृषार्त[२] पुसे[३] जीवन[४] । येर[५] ह्मणती जी पयप्राशन ।
कीजे ह्मणोनि क्षीरद्रोण[६] । पुढां[७] करिती हस्तकें ॥ ६९ ॥
नेघोनि[१] मोंवतें[२] पाहे[३] दृष्टी[४] । तवं अंतरें[५] पर्णकुटी ।
देखोनि[६] आला तयेनिकटीं[७] । देखे[८] माझारी तपस्वी ॥ ७० ॥

---

६५. १ पुढें औं पु ; २ मृग रा ; ३ (+) देखिला रा ; ४ दूर नि , दृष्टी औं पु ; ४-५ तो दुरोनि रा , दुरुनी ख ; ५ दवडोनि गो·२ ; ६ लागे मुं धु तं ; ७ नृपाळ नि.

रा मध्यें ६५ चे शेवटचे दोन चरण व ६६ चे पहिले दोन चरण गाळले आहेत.

६६. १-२ धांवे लागे ख पु४ ; ३ स्वर्गारण्यें धु गो तं ; ४ साधित तं.

६७. १ वनोपवनें नि ; २ लंघित औं पु ; ३ पाठीसि नि , पाठीं औं पु ; ४ शीण नि पु ; ५ आपण ख , बहुसाल धु.

६८. १ पुढें नि ख पु४ मुं गो२ ; २-३ करित देखिलें धु पु४ ; ३ करिती नि , करितां गो·२ ; ४ (-) नि ख ; ५ वत्स° नि मुं नां औं तं ; ६ स्रवतां नि गो·२ , श्रवतां धु ; ७ सेविती गो·२.

६९. १ त्यांसी नि , तयातें धु तं ; २ तृशार्थि पु४ ; २-३ पुसे त्रुषार्थ धु नां ; ४ स्थान ख ; ५ ते नि , येरें ख , येरु पु·४ मुं औं ; ६ क्षीरभोजन तं ; ७ पुढें नां पु.

७०. १ तें घेऊनि नि , निघोनि ख मुं , वेघोनि रा ; २ भवतें ख मुं नां रा गो·२ तं ; ३ फावे पु४ ; ४ भृष्टी तं ; ५ (+) देखे नि ख औं पु , (+) देखिली मुं , (+) पाहे गो२ ; ६ पाहोनि नि ; ७ तया° नि ख मुं तं , निकटीं औं ; ८ तवं त्या ख.

बैसोनियां पद्मासनीं । मनें[१] पहुडला[२] समाधिशयनीं[३] ।
ह्मणोनि कपाटमुद्रा नयनीं[४] । आणि मुखीं[५] महामौन[६] ॥ ७१ ॥
फेण प्राश्नुनि करी तप । यालागीं शमीक[१] तो फेनप[२] ।
राजा आला त्यासमीप । तापघर्में[३] श्रांतला[४] ॥ ७२ ॥
उभयहस्तीं[१] पिटोनि टाळी । राजा[२] ह्मणे[३] ब्राह्मणा[४] न्याहाळीं ।
अभिमन्युपुत्र मी[५] ये काळीं । परीक्षिति येथें[६] आलोंसें[७] ॥ ७३ ॥
कृष्णकुरंग भेदिला[१] बाणें[२] । पळतां[३] देखिला असेल नयनें[४] ।
तो सांगीजे[५] ह्मणतां वचनें[६] । ऋषि मौनस्त[७] न[८] बोले[९] ॥ ७४ ॥
जैसी दारुप्रतिमा[१] स्तब्ध[२] । आळविल्या[३] नेदी शब्द[४] ।
तैसा न बोलतां विषाद । राजा मानी[५] मानसीं[६] ॥ ७५ ॥
७७. १ **खाणोनि** नि , **योगिनीकुंड** तं ; २ **गर्ताअवधी** नि , **गर्ता-आवधी** पु४ नां ; ३ **विधानोक्त** औं ; ४ **हव्यद्रव्याच्या** तं ; ५ **°प्रायें** औं पु ; ६ **लोटल्या** औं पु धु तं.

७८. १–२ **पुराणिक अत्यंत** औं पु, **पौराणिक अत्यंत** नि , **पौराणिक अति** ख पु४ ; ३ **°ज्ञानी** नि खवर्ग (**°ज्ञान** पु४) ; ४ **भविष्यज्ञ** रा गो·२ ; ४–५ **°ज्ञातेचा** तं ; ५–६ **चाळिती** धु.

७९. १ **अवलोकोनियां** नि ; २ **यज्ञीं** नां ; ३ **(–)** नि , **पूर्ण** खवर्ग ; ४ **पावे हा** नि ; ५–६ **ऐसें चिन्ह** नि खवर्ग.

८०. १ **निमित्य** ख पु·४ मुं नां धु ; २ **होई** पु४ ; ३ **खंडिजे** पु·४ ; ४ **आग्रह** नि ख मुं रा , **आश्रय** औं पु , **आग्रही** तं ; ५ **लक्षेना** पु४ धु , **दिसेना** औं पु.

८१. १ **°ग्रहण** नि खवर्ग (औं पु प्रसंप्रा) ; २ **सदृश्य** पु४ गो२ ; ३ **एका सर्वीं** नि (स प्रसंप्रा).

कुंडीं प्रतिष्ठिला वन्ही । पर्युक्षणीं[1] परिसंमूहनीं[2] ।
कुशबर्हिपरिस्तरणीं । पात्रासादनीं[3] विधिमंत्रें[4] ॥ ८२ ॥
इध्मा[1] समंत्र[2] विसर्जिली[3] । संस्थापूनि आज्यस्थाली[4] ।
प्रणीतापात्रें[5] संमार्जिली[6] । श्रुकश्रुवा[7] इत्यादि ॥ ८३ ॥
प्रोक्षोनियां यज्ञोपचार । हवनीं वोंकार वषट्कार ।
उठतां केला जयजयकार । उभयलोकीं सुरनरीं ॥ ८४ ॥
आह्वानिला[1] प्रळयानळ । जागृत होय[2] तैसा[3] सरळ ।
सप्ताजिव्हा[4] सप्तज्वाळ । सप्तहस्तीं कवळितु[5] ॥ ८५ ॥
महानदीचे[1] जळसंघाट[2] । वसुर्धारांचे[3] लोट ।
तेणें[4] भेदला[5] हव्यवाट । कनकस्तंभ[6] गगनातें[7] ॥ ८६ ॥
प्रळयीं कृतांतवक्त्र प्रचंड । तैसें विशाळ प्रदीप्त कुंड ।
कीं[1] पन्नग भक्षावया तोंड[2] । धरादेवीनें पसरिलें ॥ ८७ ॥

---

८२. १ परीक्षुनि नां, परियुक्षणीं धु गो·२ पु, पर्येक्षीणी पु४; २ परिसंमोहनीं नि ख पु४; ३ पात्रसाधनीं नि पु गो·२ ख; ४ रूषीमतें पु४. या पुढें औं मध्यें पुढील ओवी आहेः—

ऐसें पुढील होईक । याजकां जाणविती गाणिक ।
होणार होतसे नावेक । जाणौनि पाहा सर्पसत्र ॥ ८२ अ ॥

८३. १ विद्या औं पु; २ समंत्रें नि ख पु४; ३ अव्हानिली औं; ४ आज्यीं स्थापिली नि, आज्य स्थापिली तं, आज्यस्थळीं गो, आज्यस्ताली गो२; ५ °पात्रीं नि नां गो; ६ विसर्जिली ख; ७ स्रुचि स्रुवा नि, वाक° पु४, भृक° ख, श्रुक° नां पु धु रा गो२ [स्रुकस्रुवा शुद्ध संस्कृत].

८४. ही ओवी नि खवर्गं मध्यें नाहीं.

८५. १ आव्हानितां नि खवर्ग (आवाहनितां पु४); २-३ होतांचि नि खवर्ग; ३ जैसा गो·२; ४ °जिव्ह नि; ५ मंडित नि खवर्ग.

८६. १ महानदी मुं नां, महाजळनदी पु४; २ संघाट पु४ रा; ३ वसुधारांचें नि ख नां औं पु, वसोर्धारांचे स मुं, वसुधरांचे तं; ४-५ ते भेटतां नि खवर्ग; ६ होय कनक° नि पु·४, होय स्तंभ ख मुं, होय गगनस्तंभ नां; ७ गगनांत ख, कनकाचा नां.

८७. १ (+) तें धु तं; २ तुंड नि.

याजक द्रष्टे[1] अतिसावध । अनावर[2] जाणोनि[3] जातवेद ।
पृषदाज्यें[4] केलीं[5] सिद्ध । क्षीरसिंधूसारिखीं[6] ॥ ८८ ॥

समिधा वोपितां[1] पावकमुखीं । उत्पात उठिले नागलोकीं[2] ।
भवंडी[3] दाटल्या[4] मस्तकीं । मनीं[5] शरीरीं[6] सर्पातें[7] ॥ ८९ ॥

वैकल्यकश्मलतेच्या[1] भरें[2] । सकंप थरकती[3] शरीरें[4] ।
आसनें[5] उडोनी[6] येकसरें । गगनमार्गीं[7] उसळती ॥ ९० ॥

येक वृक्षासि घालिती वेढे । येक वेष्टिती[1] शिळाधोंडे ।
तेणें[2] उन्मळोनि जुंबाडें । व्योमपंथें[3] धांवती ॥ ९१ ॥

येकमेकातें बोभात । येकमेकां परिवेष्टित[1] ।
देहरज्जू[2] शतानुशत । येके[3] ग्रंथीं[4] वोपिती[5] ॥ ९२ ॥

---

८८. १ **कर्मीं** औं, **दृष्टीं** नां, **दृष्ट** पु·४; २ **अनिवार** गो·२ नां; ३ **देखोनि** नि खवर्ग (मुं प्रसंप्रा) , **जिणोनि** गो, **जींकोनि** गो२; ४ **पृषदाज्य** नि खवर्ग; ५ **केलें** नि मुं, **केल्या** पु४, **केला** ख नां औं पु; ६ °**सारिखें** नि मुं, °**सारिखा** ख नां औं पु·४. पु४ मध्यें ८८ व ८९ ओव्यांची अदलाबदल.

८९. १ **वोपिली** गो२; २ **स्वर्गलोकीं** औं, **गगनलोकीं** पु; ३ **भोंवंडी** औं पु·४ घु; ४ **दाटली** ख, **लागली** पु४; ५ **नभ्वर** नि, **नैभ्वर** ख मुं औं पु, **नैभ्वर्ये** पु४ नां; ६ **मानिती** नि, **दाविती** पु४; ७ **संपत्ती** नि खवर्ग गो२, **कांपती** गो.

९०. १ **केवळ कश्मल**° नि, **विकल्पकश्मल**° पु४, **कैवल्यकश्मल**° रा, **विभ्वकल्पांतकार**° औं; २ **भारें** नि पु·४ गो२ औं; ३ **थरारिती** औं पु; ४ **शिखरें** औं पु; ५ **आसन** ख पु·४ नां; ६ **सोडोनी** नि ख पु४, **सांडूनि** मुं नां औं पु; ७ °**मार्गें** नि औं पु गो२. ही ओवी गो मध्यें नाहीं.

९१. १ **वेढिती** मुं; २ **तेणेसीं** नि खवर्ग रा; ३ °**पंथीं** नि खवर्ग (मुं प्रसंप्रा). मुं मध्यें खालील ओवी जास्त आहेः—

येक उदकांत लपती । येक प्रचंड दरीं निघती ।
येक स्त्रिया कुटुंबें बोभाती । मरण पातले हो उभयतां ॥ ९१ अ ॥

९२. १ **वेष्टित** औं गो; २ **देहज्वरें** घु तं; ३–४ **येक ग्रंथीं** नि खवर्ग गो२; ५ **गोंविती** नि खवर्ग.

ऐशा सर्पांगजाळिया[1] । नभीं धांवती[2] गुंफिलिया[3] ।
मेघमाळा उचलिलिया[4] । तैसे निबिड आकाशीं ॥ ९३ ॥
तेथूनि धूम्राचेनि पंथें । हवनीं पडती शतानुशतें ।
विविध नाद उठती[1] तेथें । हाहाकार सर्पांचे[2] ॥ ९४ ॥
शृंखळाकारें कंकणाकारें । शरीरें[1] गोविती परस्परें ।
तेणेंसीं उसळोनि येकसरें । काळानळीं[2] रिचविती[3] ॥ ९५ ॥
येक व्याकुळते[1] निचेष्टित[2] । येक फडियातें[3] झाडित[4] ।
येक चपळते[5] चळबळित । पुछें तोडिती[6] निजदांतीं ॥ ९६ ॥
येकीं[1] भयें पसरिलीं मुखें । येक[2] जिह्वा लाळित[3] विखें[4] ।
येक भोइनळ्यासारिखे[5] । वान्हिस्फुलिंग सांडिती[6] ॥ ९७ ॥
मातृवाग्दंडीं[1] पिटिले[2] । ब्राह्मणीं[3] क्षोभें[4] उच्चाटिले[5] ।
काळाग्निकुंजरें दाटिले । युक्षदंड[6] आननीं[7] ॥ ९८ ॥

---

९३. १ **सर्पसांखळिया** नि खवर्ग , **सर्पांगझालिया** गो·२ ; २–३ **गुंफिती धांवलिया** धु ; ४ **उसळलिया** औं पु , **चाललिया** नि ख पु४ मुं नां.

९४. १ **उठले** नि , **उठिले** खवर्ग ; २ **सर्पांचा** नि खवर्ग (मुं प्रसंप्रा).

९५. १ **शरीर** ख औं पु ; २ **काळाननीं** मुं धु , **अग्निकुंडीं** औं पु , **कालाबुली** ख नां ; ३ **उसळती** पु४ , **विचरती** मुं गो.

९६. १ **व्याकुळ** नि खवर्ग गो·२ ; २ **निश्चेष्टित** नि ; ३ **ते प्राणांतें** नि , **ते फणांतें** पु४ , **फेणातें** ख ; ३–४ **तडफडीत झडा देत** औं , **तडफाडिया झाडित** पु; ४ **सांडित** नि ख नां , **नांडित** पु४ ; ५ **चपळत्वें** मुं ; ६ **झाडिती** ख पु४ , **खांडित** नां , **डंखित** औं.

९७. १ **येकें** नि पु४ धु गो·२ , **येक** स ख औं पु ; २ **एकें** नि ; ३ **लळलळ** नि , **लळलळित** खवर्ग ; ४ **देखें** मुं धु , **दुःखें** नां ; ५ **भुइ°** नि मुं रा गो·२ ; ६ **झाडिती** गो·२ , **रिचविती** औं.

९८. १ **°वाग्वज्रें** नि ख पु४ नां मु , **°वाग्जल्पें** औं पु ; २ **पीडिले** नि गो२ ; ३ **ब्राह्मण** ख औं पु ; ४ **क्षोभोनि** नां ; ५ **उच्चारिले** नि खवर्ग (**उलथले** औं) तं ; ६ **इक्षुदंड** नि, **उरगयुक्ष** धु तं , **इंद्रदंडें** मुं औं पु , **इंद्रदंड** ख पु४ नां; ७ **दंडिले** औं , **दंडिले आनानी** पु.

येक काजळाऐसे काळे । खदिरांगार[१] तैसे[२] डोळे[३] ।
येक हाटकवर्ण[४] पिवळे । येक निळे शुकरंगी[५] ॥ ९९ ॥
येक ते तप्त लोहार्गळा[१] । स्थूलदीर्घ अतिविशाळा[२] ।
मुखीं नासिकीं[३] महाज्वाळा[४] । विषाग्नीच्या[५] धडकती ॥ १०० ॥
येक शंखवर्ण[१] धवळ[२] । येक माणिकरंगी[३] निखळ[४] ।
येक[५] चित्रांग[६] विशाळ[७] । येक विक्राळ[८] विकटदंती ॥ १०१ ॥
येक[१] अस्वलाकार रोमाळे[२] । येक[३] श्मश्रुखाडे[४] सरळे[५] ।
येक वृद्ध बहुत[६] काळे[७] । सुपरिमळें[८] मघमघिती[९] ॥ १०२ ॥
मुखीं[१] मस्तकीं[२] धरिले[३] मणी । वृद्ध बाल[४] तरुण[५] फणी[६] ।
प्रवेशती पावकाननीं । कोटिच्या कोटी येकदां ॥ १०३ ॥
ब्राह्मणमंत्राचा आंकडा[१] । वोढिले[२] मारूनि आसडा[३] ।
कुंडीं[४] पडोनि[५] तडफडां[६] । भस्म होती असंख्य[७] ॥ १०४ ॥

---

९९. १–२ **खदिरांगारा ऐसे** नि ; ३ **डोळें** रा तं ; ४ ° **वर्णी** नि ख पु·४ मुं ; ५ **सुरंगी** नां औं पु गो२.

१००. १ ° **गळ** स औं पु धु ; २ °**विशाळ** स औं पु धु ; ३ **नार्कीं** नि ; ४ °**ज्वाळ** स औं पु धु ; ५ °**ग्नीचे** औं धु , °**ग्नीनें** पु.

१०१. १ °**वर्णी** नि ख नां रा ; २ **निखळ** ख , **धवळे** पु·४ मुं औं धु गो ; ३ **माणिकवर्णी** ख पु , **माणिकवर्ण** औं गो , **चित्रांग** मुं नां ; ४ **व्याळ** ख , **विशाळे** मुं , **विशाळ** नां; ५–७ **मुखिं नासिकी महाज्वाळ** मुं , **येक माणिक्यवर्णी निखिळ** नां ; ८ **कराळ** औं. गो मध्यें चौथा चरण पुढील ओवीचा आहे. गो२ मध्यें ही ओवी नाहीं.

१०२. १ (–) मुं ; २ **रोमाळ** नि , **रोमाळें** पु४ मुं रा ; ३ **येका** तं मुं गो·२ ; ४ **श्मश्रुखांड** नि ख पु४ , °**खांडें** रा धु ; ५ **सरळें** पु४ मुं रा , **सरळ** नि नां ; ६ **बहु** नां धुं ; ७ **काळें** पु४ रा , **काळ** नि नां ; ८ **सुपरिमळ** स नां ; ९ **घमघमीत** स. गो·२ मध्यें चौथा चरण मागच्या ओवीचा. तं मध्यें पहिल्या चरण नाहीं. ही ओवी औं पु मध्यें नाहीं.

१०३. १–३ **मस्तकीं एका अमोल्य** औं ; ४–६ **बोलती फणोफणीं** खवर्ग स ; ५ **तरुणे** नि.

१०४. १ **आंकुडां** रा , **आंकुडा** गो·२ तं ; २ **वोढिल्या** पु·४ नां , **वेढिले** गो२ ; ३ **आसुडा** ख औं गो·२ रा ; ४ **अग्नींत** नि खवर्ग ; ५ **पडती** तं ; ६ **तडतडां** नि रा गो·२ , **तडाडां** पु४ ; ७ **क्षणार्धें** ख गो२.

डोंबे[१] गव्हाळे[२] शंखपाळ । येरंडे[३] धामणे[४] कवडियाळ[५] ।
परड[६] फोंडसे[७] महांडुळ[८] । आर[९] अजगर[१०] दुतोंडे ॥ १०५ ॥
येक पंचमुख[१] दशमुख । शतमुख[२] द्विशतमुख ।
मुगुटमंडित मस्तक । आशीविष[३] काळसर्प[४] ॥ १०६ ॥
गोकर्णप्रमाण गोप्रमाण । अश्वगजगिरिप्रमाण ।
भयानक[१] विषोल्बण[२] । दर्शन[३] देती[४] मृत्यातें[५] ॥ १०७ ॥
क्रोश द्विक्रोश कोशत्रय । योजनायत[१] महाकाय ।
ऐसे असंख्य काद्रव्य[२] । भस्म जाले हुताशीं ॥ १०८ ॥
वृकमुख जंबुकमुख । व्याघ्रमुख सिंहमुख ।
वराहमुख[१] नक्रमुख[२] । महिषमुख[३] आर्डती[४] ॥ १०९ ॥
ऐसिया सर्पांचिया कोटी । पावकीं रिचविती[१] पाठोपाठीं[२] ।
नाद उठती तडतडाटीं[३] । अस्थि[४] जाळें[५] पळिपतां[६] ॥ ११० ॥

---

१०५. १ डांब आं तं, डोंबें नि, डोंब नां पु ; २ गध्हळे ख पु४ ; ३ सरड नि (एरंड स) , बेरडे आं पु , भरडे धु, थेरडे तं ; ४ धामन नि पु४ मु ; ५ करडियाळ नि , कडियाळ ख , कवडे व्याळ आं पु ; ६ फरड नि ख नां, फारड पु४, फरडे आं पु; ७ कोंडस पु ४; ८ महास्थूल नि ; ९-१० अजगर आणि नि ख , अजगर आर पु४ नां , गज आर पु , अजगर आं.

१०६. १ (+) येक आं पु ; २ येक शतमुख नि खवर्ग ; ३ ऐसे विशाळ नि खवर्ग ; ४ कर्कोटक आं. आं पु मध्यें दुसरा चरण गाळून तिसरा चरण दुसरा व चौथा चरण तिसरा घातला आहे आणि चौथ्या चरणांच्या जागीं भस्म जाले ते काळीं असा नवा चरण घातला आहे.

१०७. १ भयें वमिती नि खवर्ग ; २ विद्योदकें जाण आं पु ; ३-५ दर्शनें मनुष्य पावे मरणातें आं पु ; ५ मृत्यूतें नि ख पु४ नां.

१०८. १ योजनांत ख ; २ काद्रवेय नि रा , काद्रव्यये पु·४ धु , काद्रव्यय नां , काद्रव्य पाहे आं.

१०९. १-२ नक्रमुख महिषमुख नि खवर्ग ; ३ श्वापदमुख नि खवर्ग; ४ अनेके नि , अनेक खवर्ग , आर्डाती धु तं [आरडती ?].

११०. १ विचरती नि (स प्रसंप्रा) ; २ पाटोवाटीं ख पु·४ ; ३ कडकडाटी नि खवर्ग (मुं प्रसंप्रा) ; ४ अस्ति धु गो·२ , पृथ्वी नि ; ५ ज्वाळें नि खवर्ग (जाले ख , ज्वाळकल्लोळीं आं) ; ६ पळिंपतु नि , प्रलपत मुं , प्रलिपति नां , तापली आं , जळपती पु , तळपतां गो·२.

वसामेदेचे[१] संघाट । कढतां[२] वाहों लागले[३] पाट ।
ज्वाळाजिह्वेनें हव्यवाट । चाटूनि नेत[४] क्षणार्धें[५] ॥ १११ ॥
जळतां[१] मांसाचिये[२] घाणी । कुवास भरला[३] मेघघ्राणीं[४] ।
चिळसीनें[५] तोंडीं सुटलें पाणी । तें अद्यापि श्रवताहे[६] ॥ ११२ ॥
प्रयुतें[१] अर्बुदें[२] निर्बुदांत । खर्वीं निखर्वीं नव्हे गणित ।
चित्रभानूच्या[३] जिह्वा[४] ज्वलित[५] । जिह्वग[६] जाले[७] जे[८] जाणों[९] ११३॥
पद्माचे[१] पद्म[२] शंखाचे शंख । निधीच्या[३] निधी[४] नव्हे लेख ।
सहस्रमुखाचेंहि मुख । संख्या करितां ढांसळे[५] ॥ ११४ ॥
न कळे मातृशापाची[१] गरिमा । किंवा[२] ऋत्विजऋषींचा महिमा ।
कीं जनमेजयाची प्रतापसीमा । येकी[३] वाचा[४] न वदवे ॥ ११५ ॥
इतुकें भक्षूनी पावकें । पुढतीं पसरिलीं[१] दोन्ही मुखें ।
राजा ऋत्विजां ह्मणे तवकें । तक्षक न पडे कां[२] अझुनी[३] ॥११६॥
ऐकोनि यजमानमुखींचें[१] वचन । तक्षकनामें अभिमंत्रून ।
ब्राह्मणीं उचलिलें अवदान । हरहर शब्दें गर्जोनि[२] ॥ ११७ ॥

---

१११. १ **मांसमेदाचे** नि मुं, **मांसमेदाचा** ख पु·४ नां औं; २ **प्रवाह** औं, **वाढतां** पु, **काढिता** गो·२; ३ **लागला** नि खवर्ग; ४ **घेत** औं; ५ **क्षीणार्धें** पु४·

११२. १ **जळत** पु४ मुं नां; २ **मांसाचिया** नि ख नां पु, **मांसाची** धु औं; ३ **भरलासे** नि खवर्ग; ४ **घ्राणीं** खवर्ग (**मेदघ्रणीं** पु४, **मेघ्राणीं** ख); ५ **चिळसी** औं पु; ६ **न जाय** नि (निपा प्रसंप्रा), **सुटताहे** ख पु·४ नां औं, **पडताहे** धु तं.

११३. १ **प्रयुत** नि खवर्ग (**अयुत** औं) तं; २ **अर्बुद** नि ख पु४ मुं, **प्रयुत** औं (**अयुत** नां); ३ °**भानूचे** नि ख मुं नां, °**भानूतें** पु४, **चित्तभानूचे** औं पु; ४–५ **लिहितां हात** नि, **विव्हाळित** खवर्ग; ६–९ **ते काळीं पैं राहिले** नि, **ते काळीं पैं जाले** खवर्ग, **जीव्हींगण जळाले** धु.

११४. १–२ **पद्माचीं पद्में** रा धु; ३ **निधीचे** नि खवर्ग (औं पु प्रसंप्रा); ४ **निधीनें** धु तं; ५ **ढेसळें** ख नां, **भागलें** पु, **ठेसलें** मुं, **लागलें** औं.

११५. १ °**शापाचा** नि; २ **कीं** औं; ३–४ **एकें वाचें** नि.

११६. १ **पसरुनी** ख तं; २–३ **अझुनि कां** नि.

११७. १ **जनमेजयाचें** नि खवर्ग; २ **गर्जोनियां** नि, **करोनि** गो·२.

पुढां[१] वर्तलें काय विचित्र[२] । तें परिसतु[३] सभाग्यश्रोत्र ।
सज्जनांचें कृपापात्र । मुक्तेश्वर कवि ह्मणे[४] ॥ ११८ ॥

इति श्रीआदिपर्व महाभारत[१] । सकळ ग्रंथांचें[२] कुळदैवत ।
हें[३] येकचि[४] पुरवी[५] आर्त[६] । श्रवणसुखाचें[७] श्रोतियां[८] ॥११९॥

आणिक[१] ऐकावी[२] हे[३] बुद्धी[४] । वासनालेश[५] उरों नेदी ।
शब्दब्रह्माची[६] सकळार्थसिद्धि[७] । येणें[८] येकें[९] आतुडे[१०] ॥१२०॥

इति श्रीमहाभारते दशमोऽध्यायः ॥

---

११८. १ **पुढें** नि खवर्ग ; २ **चरित्र** नि खवर्ग रा ; ३ **परिसोत** नि धु , **परिसा तुह्मी** औं , **परिसा पुढें** पु ; ४ **वदे** नि गो२.

११९. १ **भारत** नि ख मुं रा गो·२ ; २ **कथेचें** नां ; ३–४ **ऐकतां** नि खवर्ग ; ५ **पूर्वील** धु गो२ , **पुरती** औं ; ६ **मनोरथ** औं पु ; ७–८ **श्रोते वक्ते श्रवण करितां** औं पु.

१२०. १ (+) **येक** नि ख मुं औं पु ; २–४ **ऐका विधी** नि खवर्ग ; ५ **हें वासना°** नि खवर्ग ; ६ **वेदब्रह्मचि** रा गो·२ , **देवाब्राह्मणाची** खवर्ग (**वेदब्रह्मयाची** मुं) ; ७ **सकळ सिद्धी** नि खवर्ग ; ८–९ **श्रवण केलिया** औं पु; १० **आवडे** नि.

॥ श्री ॥

अध्याय अकरावा

श्रीगणेशाय नमः

शौनक पुसे आर्तेंकरून[१] । सर्पसत्रीं रुत्विज[२] कोण[३] ।
तें आपुल्या मुखें ज्ञान । करीं आमुतें सर्वज्ञा ॥ १ ॥
देवऋषी ब्रह्मऋषी । सदस्य[१] कोण तपोरासी ।
तें वाक्यदीपकें[२] प्रकाशीं । श्रवणनेत्रीं[३] आमुचिये[४] ॥ २ ॥
जी जी[१] ह्मणोमि वक्ता वचनीं । ह्मणे मुख्य तें लावा[२] श्रवणीं ।
इतर सांगतां विस्तारूनी । अतिप्रसंग होतसे ॥ ३ ॥
चवनऋषीचा कुळसंभव । होता[१] प्रचंड चंडभार्गव[२] ।
वेदविदां[३] वरिष्ठ देव[४] । चतुरानन पैं जैसा ॥ ४ ॥
धर्माधर्मविचारतरणी[१] । मीमांसाकार[२] परमज्ञानी ।
तो उद्गाता तेथें जैमिनि[३] । कुत्सऋषि[४] त्या जवळा[५] ॥ ५ ॥
भव्य ते[१] ऋग्वेद[२] सावेव[३] । तो ब्रह्मा[४] जाला[५] शार्ङ्गिरव[६] ॥
अध्वर्य[७] ते यागीं स्वयमेव[८] । हेमपिंगळ ब्रह्मऋषी[९] ॥ ६ ॥

---

१. १ आर्ते करून नि, अर्तें करून ख नां , आर्ति करून रा तं , आरती करून धु ; २ ऋत्विज नि मुं नां गो तं पु; ३ कवण नि तं, गण मुं.

२. १ सदृश्य पु·४ तं ; २ °दीपें नि औं , वाक्यें धु तं ; ३ श्रवणीं-नयनीं गो२ ; ४ आमुचे नि खवर्ग.

३. १ (–) औं पु ; २ लावूं नि खवर्ग (लागे पु४), लावावें धु तं.

४. १ होतां पु४ मुं गो२ , तो हा औं पु ; २ भार्गव नि नां गो·२ ; (चंडभार्गव सं. भा.); ३ वेदवेद्यां नि, वेदवेत्ता ख, वेदवेदांत मुं; ४ सर्व ख.

५. १ कर्मधर्म° रा धु तं ; २ मीमांसक मुं औं पु , मीमांसका ख गो·२ तं ; ३ जयमिनी ख पु·४ औं धु गो·२ तं , जयमुनी नां ; ४ कुछ° ख पु४ नां , कुत्छ° धु , वत्स° औं पु ; ५ जवळी नि , वेळीं गो·२.

६. १ तो धु ; १–२ तरुऋग्वेदादि औं पु ; ३ सावेवें औं ; ४–६ ब्रह्मा शांडिल्यरव ख नि , ब्रह्मत्वें यज्ञीं मिरवे औं , ब्रह्मचारी मिरवे पु ; ६ [शार्ङ्गरव सं. भा.]; ७ अध्वर्यू नि ; ८ स्वमेव नां औं धु तं ; ९ ब्रह्मर्षी रा गो तं.

कुंडलद्वेष[1] धरूनि मनीं । तेथ[2] उन्मेता[3] उत्तंकमुनि ।
सर्प[4] जाळिले हुताशनीं । कोटीच्या[5] कोटी[6] त्या रागें ॥ ७ ॥
व्यासपुत्र जीवन्मुक्त । शुकयोगींद्र[1] शिष्यांसहित[2] ।
सर्वां श्रेष्ठ सभेआंत । व्यंग तें सांग त्याचेनी[3] ॥ ८ ॥
उद्दालक[1] माठरक[2] । श्वेतकेतु शांडिल्य[3] देख[4] ।
असित देवल तपोतेजार्क[5] । नारद पर्वत[6] पैं दोघे ॥ ९ ॥
आत्रेय दुर्वास ऋषिश्रेष्ठ । कुंड[1] जठर[2] कालघट[3] ।
वात्स्य[4] श्रुतश्रवा वरिष्ठ । कोहल आणि देवशर्मा[5] ॥ १० ॥
मौद्गल्य[1] सौरभ[2] मुख्यकरूनी । समर्थ सदस्य सभास्थानीं ।
पन्नगसत्रीं महायज्ञीं । पारीक्षितिरायाचे[3] ॥ ११ ॥
याहीवेगळे असंख्यात । संशितव्रती[1] ब्राह्मण बहुत ।
मूर्त[2] वन्ही कीं आदित्य । किंवा प्रतिमा रुद्राच्या ॥ १२ ॥
कीं[1] विष्णुबिंबित[2] दर्पण[3] । कीं[4] नाट्य[5] अवगला[6] चतुरानन ।
ज्यांचें[7] सहजचि दर्शन[8] । काम पुरवी इछिलें[9] ॥ १३ ॥

---

७. १ कुंडली द्वेष नि, कुंडलांचा द्वेष धु तं; २-३ तेथें येतां नि; ३ उन्मता गो, उद्गता (उद्गाता ?) गो२; ४ सर्व पु·४ मुं औं; ५-६ कोट्यानुकोटी नि.

८. १ °योगेंद्र पु४ मुं औं; २ सिष्यें° ख धु औं पु रा; ३ संपादी गो२.

९. १-२ मार्कंडेय उद्दालक औं; २ मावरक मुं ना पु, मांसक ख, मांरक पु४, प्रमतक [सं. भा.]; ३-४ शांडिल्यादिक मुं; ५ तपस्तेजोर्क नि; ६ तुंबर मुं.

१०. १-२ कुंजरट ख औं, कुजरुट पु नां, कुंजारुढ मुं; ३ कालघंट ख पु४ मुं औं रा गो; ४ बाष्कळ नां, वासुदेव औं, वत्स गो·२; ५ देवश्रमा धु तं.

११. १ मौद्गल्य नि पु४ रा धु तं, मुद्गल ख मुं औं पु; २ सौरभ्य खवर्ग; ३ परिक्षिति° ख पु·४ नां रा धु, जन्मेजयरायाच्या औं.

१२. १ सुशीळवृत्ति ख, सदाशिष्य नां; २ मूर्तिमंत नि, मुहूर्ति गो·२. ही ओवी औं पु मध्यें नाहीं.

१३. १-२ विष्णुप्रतिबिंब नि खवर्ग; ३ दर्पणें धु; ४ (-) धु ५ नाय नि, न्यायें मुं, नाट्यें धु, देहीं गो·२, वाद्यें तं; ६ आगळा पु,

महासाक्षेपें[१] आदरिलें[२] देख । फळों[३] नये काय[४] तें[५] येक ।
ह्मणोनि भस्मले दंदशूक[६] । परहिंसक पातकी ॥ १४ ॥
असंख्य पडिले[१] काळानळीं । पुढती[२] सर्पांचीं वेंटाळीं[३] ।
पडतां देखोनि बद्धांजुली[४] । स्तवी[५] यजमान[६] याजकां[७] ॥१५॥
राजा ह्मणे ब्राह्मणोत्तमा । मुख्य शत्रु तक्षकनामा ।
तो पाडूनि संतोष आह्मां । दिधला आतां[१] पाहिजे[२] ॥ १६ ॥
अवश्य ह्मणोनि[१] रुत्विजवरीं[२] । तक्षक अकर्षणार्थ[३] मंत्रीं ।
अभिमंत्रूनि श्रुवापात्रीं[४] । महाअवदान[५] उचलिलें ॥ १७ ॥
तवं मरणाचिन्हाचें[१] त्रिदोषवारें[२] । तक्षकाआंगीं भरलें शारें[३] ।
कार्मुकापासोनि सुटिजे शरें । तैसा सत्वर पळाला[४] ॥ १८ ॥
सांडूनियां पाताळभुवन । शक्रलोका[१] जाऊनि[२] जाण[३] ।
देवेंद्रातें रिघाला[४] शरण[५] । प्राणधाकें ते[६] काळीं[७] ॥ १९ ॥

आवगीजे धु ; ७ चतुराननें धु पु४ ; ८ जयाचिया धु ; ९ दर्शनें ख पु४ ; १० अपुलें ख , इच्छिलें नि. ही ओवी औं मध्यें नाहीं.

१४. १ म्यां साक्षपें ख रा गो , मां साक्षेपें पु४ धु तं , साक्षेपें औं , मासाक्षेपें नां पु ; २ आरंभिलें नि मुं ; ३ फळा नि मुं गो , फळ औं पु ; ४-५ तें काय नि खवर्ग (तें कांहीं पु४) ; ६ दंशशूक नि , द्वंद्वशूक औं पु , द्वंदशूक पु४ मुं नां धु गो·२ तं , दशक रा.

१५. १ पडले ख औं धु ; २ पुडती पु·४ औं गो·२ तं , पुणती गो ; ३ पेटाळीं पु४ ; ४ बद्धांजळी नि ; ५-६ यजमान स्तवी नि खवर्ग ; ७ याजका नि.

१६. १ तुह्मीं गो ; १-२ पाहिजे स्वामिनी नां , पाहिजे ब्राह्मण हो गोरे.

१७. १ म्हणून नि , ह्मणे पु४ ; २ ऋत्विज° नि तं , मुनिवरीं मुं ; ३ आकर्षणार्थ नि औं पु·४ गो·२ ; ४ स्रुवा° नि तं मुं , सुधापात्रीं गो२; ५ °अवदाना नि.

१८. १ मरणाचें नि मुं ; २ त्रिदशवारें धु ; ३ सारें ख नां औं , झारें नि ; ४ पावला मुं.

१९. १ °लोकीं मुं पु ; २ गेला ख औं ; ३ शरण औं , आपण धु तं ; ४ निघे मुं ; ४-५ लोटांगण औं ; ६-७ घातलें औं.

दीर्घस्वरें रुदना करीत । भयें थरथरां[1] कापत ।
ह्मणे स्वामी चुकवीं घात । प्राणदाता मज होईं ॥ २० ॥
असर्पी[1] जाली सकळ[2] सृष्टी । मी शरण रिघालों तुझे[3] पाठीं ।
मज वांचवावें[4] ये संकटीं । शिबी[5] ऐसें[6] देवेशा[7] ॥ २१ ॥
इंद्र ह्मणे दुष्ट[1] प्राणी । निःशंक निर्भय पापाचरणी ।
अनर्थ पातलिया[2] निदानीं[3] । मग दीनता अवगती[4] ॥ २२ ॥
वंशीं[1] अनृतवादी[2] येक । त्याचेनि पूर्वजां[3] होय नरक ।
तेविं तव दोषें पावक । पन्नगारण्या लागला ॥ २३ ॥
शरीरबळें[1] कां समर्थाश्रयें । ऐश्वर्यबळें महाअन्यायें ।
राहटतां[2] तयातें[3] अपायें[4] । महद्व्यसनीं पाडिजे[5] ॥ २४ ॥
जाणतां जोडोनि पापठेवा । मग ह्मणे धांव[1] सोडवीं देवा ।
तरी[2] तो देवाचियाही देवा । रक्षिला न वचे संकटीं[3] ॥ २५ ॥

---

२०. १ **चळचळां** औं पु.

औं मध्यें पुढील ओवी अधिक आहे.

तुजवीन आतां नाहीं अश्रे । मातें रक्षि देउनि अये ।
प्रळ (?) काद्रव्य कळाक्षय । जाला जन्मेजयसत्रीं ॥ २० अ ॥

२१. १ **निःसर्पी** नि , **निसर्प** गो·२ ; २ **सर्व** नि खवर्ग ; ३ **तुझा** (**तुझां**) ख पु४ रा तं गो पु , **तुझ्या** नि ; ४ **वांचवुनी** नि , **वांचवीं** ख पु·४ मुं औं रा गो·२ ; ५ **सीभ्री** ख पु४ मुं नां औं , **शिभ्री** पु रा , **सिभि** तं , **सीश्री** धु (औं२ प्रसंप्रा), **श्रेय** नि ; ६ **घेईं** नि ; ७ **देवेंद्रा** नि खवर्ग.

२२. १ **दुर्घट** खवर्ग , **दुर्धर** रा ; २ **पावलिया** ख पु गो ; ३ **निर्वाणीं** औं ; ४ **अवगमीं** ख मुं , **अवलंबी** धु.

२३. १ **वौंशीं** नां धु गो ; २ **अनर्थवादी** ख ; ३ **पूर्वजा** नि ख पु४.

२४. १ **प्रसादबळें** मुं ; २ **राहतां** पु४ ; ३ **तया** नि ख औं पु ; ४ **उपायें** पु४ ; ५ **पाविजे** मुं औं पु , **पडिलें** पु४.

२५. १ **धांवें** धु ; २ **मग** नि ; ३ **सर्वथा** रा , **सेवटीं** धु. ही ओवी गो·२ मध्यें नाहीं.

ह्मणोनि[१] पहिलेंचि[२] सांभाळावें । अन्याय[३] आतळों[४] नेदावें[५] ।
दोषातीत त्या[६] स्वभावें । दुःखभोग[७] असेना ॥ २६ ॥
असो ये समयीं न बोलों बोला । सदोषी[१] शरण[२] ह्मणोनि[३] आला ।
तोही न[४] वचे[५] त्याग[६] केला[७] । उत्तम पुरुषें[८] सर्वथा ॥ २७ ॥
आतां मरणभयाची वेथा[१] । सांडूनि[२] स्वस्थ[३] करीं चित्ता ।
पितामह ब्रह्मा[४] याची[५] अर्था[६] । असे[७] म्यां[८] पूर्वीं[९] प्रार्थिला ॥२८॥
सर्पसत्रापासूनि तूतें । भय नाहीं निज[१] निश्चितें ।
तक्षक ह्मणे माझेनि[२] चित्तें[३] । धैर्य सर्वथा न पविजे[४] ॥ २९ ॥
उत्तरी[१] करूनि आपुला[२] अंगीं । मज वांचवीं[३] ये[४] प्रसंगीं ।
इंद्रें बंधुत्व स्मरोनि[५] जगीं[६] । भोगी केला स्वकंठीं ॥ ३० ॥
येरीकडे पाताळभुवनीं । वासुगी[१] संतप्त अंतःकरणीं ।
भगिनी समीप[२] पाचारूनी । तियेप्रति[३] विलपतु[४] ॥ ३१ ॥

---

२६. १ ह्मणौनि औं पु , ह्मणउनी तं ; २ पूर्वीं मुं ; ३ अन्याया नि पु४ ; ४ आंग नातळों पु४ , आंतळों नि ; ५ द्यावें पु४ ; ६ या नि , (–) मुं गो२ ; ७ दुष्टभोग नां.

२७. १ सदोषही ध , सदोसिही तं ; २–३ ह्मणोनि शरण नि ख गो·२ ; ४–५ वचनें ख , न वटे ध ; ६–७ त्यागिला ना पु ; ८ पुरुषीं गो२ , पुरुष तं.

२८. १ व्यथा नि मुं रा गो , व्येथा पु४ , वार्ता ख ; २ सोडोनि नि ; ३ स्वस्त पु ध तं ; ४ ब्रह्मी पु·४ औं ध ; ५ याच्या औं पु ; ६ वार्ता पु४ ; ७–९ म्यां पूर्वीं असे खवर्ग.

२९. १ गा नि पु४ औं , तुज नां गो , (–) मुं पु ; २ माझ्या औं पु ; ३ चितें पु४ ध गो ; ४ धरवे नि खवर्ग.

३०. १ उत्तरीय नि ; २ आपुल्या नि मुं औं [आपुलां] ; ३ वांचविजे मुं नां पु ; ४ हे गो ; ५ सांडोनी पु४ ; ६ वेगीं मुं , भ्रेहांगीं रा , स्वर्गीं ध , स्वांगीं गो२ , स्वगी तं.

३१. १ वासुकी नि ख औं रा तं ; २ सन्मुख ध ; ३ तिये जवळी नि खवर्ग ; ४ विलपत नि ख पु४ रा.

भ्रम लागला माझिये शरीरीं[१] । दृष्टी[२] येतसे अंधारी[३] ।
बोलतां चालता चांचरी । वाचा[४] शरीर[५] जातसे[६] ॥ ३२ ॥
विस्मृति उपजे क्षणक्षणां[१] । पतंगाऐसी मनवासना ।
धांवोनि प्रदीप्त हुताशना । आलिंगावें वाटतसे ॥ ३३ ॥
इष्ट मित्र बंधु कुमर । जाला सकळांचा संव्हार[१] ।
उरले[२] तीहींसीं[३] मत्शरीर[४] । पडेल[५] आतां हुताशीं ॥ ३४ ॥
ग्रीष्मीं आटे[१] तडागजीवन । तैसा[२] परिवार जाला न्यून[३] ।
शेष सर्पांसहित जाण । पूर्णाहुती म्यां होणें ॥ ३५ ॥
जिये[१] अरिष्टपरिहारार्थीं । तुज वोपिलें ऋषीचे[२] हातीं ।
तिये[३] व्यसनदुस्तरावर्तीं[४] । आजि[५] आह्मीं[६] बुडालों ॥ ३६ ॥
प्रार्थूनियां[१] आपुलिया पुत्रा । सीघ्र पाठवीं[२] नरेंद्रसत्रा ।
बोधूनि[३] पार्थिवा[४] सुपवित्रा । यज्ञसमाप्ति करविणें[५] ॥ ३७ ॥
राजहृदयींचा कोपाग्नी । शांत होय जिंहीं[१] वचनीं ।
ऐसें सीतळ[२] अनुवादोनि । समाधान करावें[३] ॥ ३८ ॥

---

३२. १ **सिरीं** रा ; २ **पृष्टी** गो·२ ; ३ **अवधारीं** गो·२ ; ४–६ **शरीर विकल होतसे** औं.

३३. १ **क्षीणक्षीणां** पु४ गो·२. ही ओवी नां मध्यें नाहीं.

३४. १ **संहार** नि ख मुं औं पु ; २ **उरलें** पु·४ ; ३ **तेही** ख मुं औं, **तेहिस** पु४ गो , **तेंही** पु ; ४ **मच्छरीर** नि , **मत्सर** ख , **मछरीर** पु४ नां , **मत्तशरीर** तं ; ५ **पडती** गो·२.

३५. १ **वाटे** गो२ ; २ (–) गो·२ ; ३ **क्षीण** नि , **शून्य** ख मुं औं , **तैसा न्यून** गो२.

३६. १ **ज्या** नि ; २ **रुषीचा (चां)** पु४ , **ऋषीच्या** ख औं पु रा , **ऋषीचा** गो२ तं ; ३ **त्या** नि ; ४ °**दुरावर्तीं** नां पु , °**दुस्तरगतीं** नि ; ५–६ **आह्मीं सर्वही** नां.

३७. १ **पाचारूनि** औं पु ; २ **धाडीं** मुं ; ३ **बोधीं** पु४ ; ४ **पार्थिव** मुं नां औं ; ५ **कारणें** धु गो , **करवणें** नि.

३८. १ **जिये** पु गो·२ , **जिया** औं रा ; २ **शीतळ** नि पु तं ; ३ **करवावें** पु. धु मध्यें ३८ व ३९ ह्या ओवींची अदलाबदल आहे.

मैत्रें[1] अथवा तपोबळें । वांचवावीं मातुळकुळें[2] ।
याहीहूनि[3] येश[4] आगळें । भुवनत्रयीं असेना[5] ॥ ३९ ॥
ऐकोनि अग्रजमुखींची मात । जरत्कारीनें आस्तीक[1] सुत[2] ।
अनुष्ठानींहुनी[3] त्वरित । सावध केला ते काळीं ॥ ४० ॥
त्याप्रति[1] सांगे[2] रुदितवक्त्रीं । जनमेजयाचे महासत्रीं[3] ।
तुझे मातुळ पुत्रपौत्रीं । भस्म जाले असंख्य ॥ ४१ ॥
उरले तेही पडतील[1] कुंडीं । यालागीं[2] जाई[3] तूं[4] तांतडीं ।
यज्ञसमाप्ति[5] करूनि खंडीं । मृत्युपाश[6] सुहृदांचे[7] ॥ ४२ ॥
पुत्र पुसे[1] अति साक्षेपें[2] । सर्प किमर्थ जाळिले नृपें ।
येरी[3] ह्मणे मातृशापें । बांधोनि बळें होमिले[4] ॥ ४३ ॥
त्या शापासि मूळ कारण । उच्चैश्रवा[1] श्वेत कीं कृष्ण ।
यदर्थीं शफतांचें[2] प्रमाण । कद्रुविनतेसीं मांडलें[3] ॥ ४४ ॥
कृत्रिम करूनि सुनीळ वेष[1] । कद्रु ह्मणे भोगीन[2] यश[3] ।
सर्प साह्य नव्हतां रोष । मातेसि आला ते काळीं ॥ ४५ ॥

---

३९. १ **मंत्रें** नि रा खवर्ग ; २ **मातृकुळें** नि ; ३ **याहुनि** नि खवर्ग (पु४ प्रसंप्रा) ; ४ **यश** नि ख मुं , **येक** रा ; ५ **न देखें** नां.

४०. १–२ **आपुला सुतु** औं पु; ३ **अनुष्ठाना°** धु तं मुं , **ध्यान भंगूनि** नि

४१. १–२ **पुत्रा बोधी** नि ; ३ **सर्पसत्रीं** गो२.

४२. १ **पडती** नि औं नां , **पडिले** गो२ ; २–४ **तुवां जावोनि** गो·२ ; ५ **मखसमाप्ति** नि ; ६ **मृत्यपाश** रा धु ; ७ **मातुळांचा** पु , **सुहृदांचा** औं धु तं. पु४ मध्यें तिसरा चरण नाहीं व चौथा चरण **येज्ञसमाप्ति करवणें** असा आहे.

४३. १ **विचारी** नि ; २ **साक्षपें** औं पु रा गो·२ ; ३ **येरू** नि ; ४ **होमिती** रा.

४४. १ **उच्चैःश्रवा** नि ; २ **शपथांचें** नि तं नां रा , **शपतेचें** औं पु , **शफथाचें** गो२ , **शफतासी** ख ; ३ **मांडिलें** नि.

४५. १ **केश** पु४ ; २–३ **भोगीश यीश** धु. ही ओवी नि खवर्ग (पु४ प्रसंप्रा) मध्यें नाहीं.

साच न करा[1] माझें वाक्य । मातृद्रोही परमक्षक ।
तुह्मां भक्षू रे[2] पावक । सत्रीं[3] पारिक्षिताचे[4] ॥ ४६ ॥
निष्ठुर शाप ऐकतां[1] तेथ । शेष वासुकी भयकंपित[2] ।
यत्न[3] करिते[4] जाले[5] घात । चुकवावया स्वकुळाचा[6] ॥ ४७ ॥
आंथुरणा[1] वोपिला देहो । माथां मेदिनी वाहिली[2] पाहा[3] हो[4] ।
कंठभूषणीं[5] गिरिजानाहो । तोषविला चिरकाळ[6] ॥ ४८ ॥
नेत्र[1] होऊनि सिंधुमथनीं[2] । सुरांसहित वज्रपाणी ।
आराधिला कुळरक्षणीं । याचीलागीं सुपुत्रा[3] ॥ ४९ ॥
तपें[1] आर्जवें आंगसेवा । संतोषविलें ब्रह्मदेवा ।
तेणें उपाय कथिला बरवा । कृपेंकरूनि तो[2] ऐक[3] ॥ ५० ॥
जरत्कारूसी[1] जरत्कारी । दिधलिया[2] जन्मेल[3] तिचां[4] उदरीं ।
तो आस्तीक पावकजोहरीं । संरक्षील सर्पांतें[5] ॥ ५१ ॥
तो[1] आजि प्राप्त जाला काळ । सत्वर उठीं न लगतां[2] वेळ ।
वचना[3] गोवूनि कुरुनृपाळ[4] । यज्ञसमाप्ति करवणें[5] ॥ ५२ ॥

---

४६. १ **कराल** नि, **करी** ख, **करवे** नां; २ **सापत्न** नि; ३ **पत्रीं** गो·२ ४ **परिक्षिताचे** मुं पु·४ धु, **परिक्षितीचे** ख नां रा गो, °**क्षिताच्या** नि.

४७. १ **ऐकोनि** नि; २ **भयचकित** धु, **भयें कंपित** पु४ मुं तं; ३ **यत्नें** ख पु४ मुं, **यज्ञ** धु; ४–५ **करिता झाला** नि; ६ **कुळाचा** नि.

४८. १ **आंथरुणा** नि ख पु·४ नां; २ **धरिली** नि; ३–४ **पाहों** ख नां औं; ५ °**भूषणें** पु४ मुं औं; ६ **चिरकाळें** पु४ मुं नां.

४९. १ **रज्जु** नि, **वेत्र** मुं रा, **सूत्र** धु गो२, **मित्र** औं; २ **समुद्रमथनीं** मुं; ३ **पवित्रा** ख.

५०. १ **तेणें** गो, **तव** पु; २ **तें** मुं गो२; ३ **ऐकें** नि, **ऐका** मुं गो२ तं.

५१. १ **जरत्कारासि** मुं औं पु; २ **दिधल्या** नि; ३ **उपजेल** मुं औं पु, (–) धु तं; ४ **तिच्या** नि, **तिचा** पु४ नां औं गो२ तं; ५ **सर्वांतें** नि ख पु·४ नां, **निर्धारें** मुं, **प्रतापें** औं·

५२. १ **तोचि** ख; २ **लावीं** नि; ३ **वचनीं** नि, **वचनें** औं गो·२; ४ **भूपाळ** नि औं, **कुरुभूपाळ** ख मुं नां रा गो, **कृपाळ** पु, **करुणापाळ** धु; ५ **करविणें** नि.

उरलीं वांचवीं[1] सर्पवृंदें[2] । भूगोळ चर्ची कीर्तिसुगंधें ।
मातृमुखींच्या[3] सखेदशब्दें । आवेशला[4] आस्तीक ॥ ५३ ॥
उठता[1] जाला अतिलगबगें[2] । गमन इछी[3] मानसवेगें[4] ।
तेवींचि[5] माते[6] मातुळा सांगें । चिंता कांहीं न करावी ॥ ५४ ॥
वार्ता न पडेचि[1] माझिये[2] कानीं[3] । तवं[4] प्रारब्धें आटले[5] फणी ।
आतां स्पर्शों न[6] सके[7] वन्ही[8] । हें साचार जाणिजे[9] ॥ ५५ ॥
मातृमुखींचा[1] अलोट शाप । जन्मेजयाचा असाध्य कोप ।
रुत्विजांचा[2] सिद्धसंकल्प[3] । तीन्ही[4] करीन निस्तेज[5] ॥ ५६ ॥
स्तवनीं तोषवूनि नृपति । प्रसन्न करीन[1] वरदमूर्ति[2] ।
संभावने[3] यज्ञसमाप्ति । हेचि दक्षणा मागणें[4] ॥ ५७ ॥
ऐसें भगिनीचे[1] वचनामृतें । अमरत्व[2] देऊनि[3] वासुकीतें ।
माघारूनि मनपवनातें । सत्रसदना पातला ॥ ५८ ॥
द्वारस्त[1] आड करितां दंड । देखे[2] प्रदीप्त दिव्य मार्तंड ।
माघारूनि म्हणे[3] प्रचंड । ईश्वरपुरुष[4] दिसताहे ॥ ५९ ॥

---

५३. १ **वांचीजे** पु४ , **वांचवुनी** गो२ , २ **सर्पकुळें वृंदें** धु ; ३ **मात्रु°** नां गो·२ , **मातेचिया** धु ; ४ **अवश्य चालिला** नां.

५४. १ **उठिता** नां तं ; २ **अति लागवेगें** पु , **लागवेगें** धु , **लगबगें** पु४ ; ३ **इच्छी** नि ; ४ **मनोवेगें** नि ; ५ **तेवी** पु४ , **तेवेळे** मुं , **तेविषीं** गो·२ ; ५–६ **मातेसि म्हणे** नि.

५५. १ **पडतां** नि ; २ **माझे** नि , **माझा** (**माझां**) ख पु४ रा ; ३ **श्रवणीं** नि; ४ **तव** नि पु४ मुं तं , ५ **आठवे** पु४ ; ६–७ **नेदी** औं ; ८ **कोण्ही** ख ; ९ **मांनीजे** पु४.

५६. १ **मातेमुखींचा** पु४ ; २ **ऋत्विजांचा** नि नां तं पु ; ३ **सिद्धि°** नि; ४ **तोही** औं पु , **वन्ही** गो२ ; ५ **निस्तेजें** पु४ नां रा तं.

५७. १ **करूनि** पु४ गो·२ ; २ **हव्यमूर्ती** नि , ३ **संभावना** ख नि औं ; ४ **मागेन** नि मुं औं पु.

५८. १ **मातेच्या** नि ख ; २–३ **वचनें अमरत्व** औं.

५९. १ **द्वारस्थें** नि रा ख , **द्वारस्तीं** औं , **द्वारस्थ** मुं ; २ **देखोनि** नि ; ३ (+) **हा** नि ; ४ **ईश्वरी°** नि.

सत्कारूनि[1] शीरशरदंडें[2] । ह्मणे स्वामिया[3] जाइजे[4] पुढें ।
येरें[5] प्रवेश करोनि कोडें । यज्ञमंडपा[6] पातला ॥ ६० ॥

कुंडीं प्रत्यक्ष हुताशन । राजा सदस्य[1] ऋत्विजगण ।
वाटे येकचि मेषवाहन । अवघीं[2] रूपें[3] अवगला ॥ ६१ ॥

कीं त्या चंद्रसूर्यप्रतिमा । तैसें देखिलें ब्राह्मणोत्तमा[1] ।
आणि[2] ब्राह्मणींही ऐसिया[3] उपमा । त्या वरिष्ठा देखिलें[4] ॥ ६२ ॥

जेंवी बळीचिया[1] यज्ञमंडपीं । उपेंद्र[2] उभा ब्रह्मस्वरूपीं[3] ।
तैसा आस्तीक परमतपी । ऋत्विजगणीं देखिला ॥ ६३ ॥

पसरूनि पवित्र पद्महस्त । लक्षूनि समुदाय समस्त ।
स्तवनीं नमनीं[1] विनयवंत । आसीर्वचनीं[2] अनुवादे ॥ ६४ ॥

कीं[1] वाक्यपुष्पीं पुष्पवंत[2] । सिद्धिगंधें[3] मघमघित[4] ।
प्रसन्नतेचा[5] पारिजात । वृष्टी करीत[6] रायातें[7] ॥ ६५ ॥

प्रणम्य यज्ञनारायणा । नमो सदस्य[1] ऋत्विजगणा ।
स्वस्ति पांडवकुळभूषणा । जयकल्याण तुज असो[2] ॥ ६६ ॥

---

६०. १ नमस्कारोनि नि खवर्ग ; २ शिरसा दंडें नि , सीर सदंडें पु४ मुं , शरीरदंडें गो२ ; ३ स्वामी नि ख ; ४ जावें नि , जाइजो गो२ तं ; ५ मुनी नि ; ६ °मंडपीं नि.

६१. १ सदृश्य पु४ , सादृश्य गो ; २ ऋत्विज मुं , अवधियां औं पु ; ३ रूपीं नां औं.

६२. १ द्विजसत्तमा औं ; २ हवनीं नि , आस्तीक मुं ; ३ ऐसी नि ख ; ४ देखिली नि.

६३. १ बळीचा (चां) ख पु रा धु गो तं ; २ कीं उपेंद्र नि ; ३ ब्रह्मरूपी नि औं पु धु तं , येज्ञस्वरूपी पु४.

६४. १ मानीं धु , मनी पु ; २ आसीर्वचनें औं पु , आसीर्वचना धु.

६५. १ किंवा ख औं ; २ पुष्पवसंत नि , प्रफुल्लित मुं ; ३ सिद्धगंधें ना पु धु , सींधुगंधें गो , बुद्धिसुगंधें नि ; ४ घमघामित नि , मगमगीत पु४ ; ५ सुप्रसन्न° औं पु ; ६-७ करी तयातें नि.

६६. १ सदृश्य ख पु४ ; २ आसे पु४.

तुष्टिरस्तु पुष्टिरस्तु । धर्मैश्वर्यवृद्धिरस्तु[1] ।
सार्थकायुःसिद्धिरस्तु[2] । शांतिरस्तु[3] तव प्रभो ॥ ६७ ॥
विवेकज्ञानसमृद्धिरस्तु । संततहरिहरभक्तिरस्तु[1] ।
प्रतापप्रतिज्ञाविजयोस्तु[2] । भद्रमस्तु[3] तव प्रभो ॥ ६८ ॥
भवदुर्जयशत्रुक्षयोस्तु[1] । अक्षयपदप्राप्तिरस्तु ।
भूतदयाविशेषोस्तु[2] । कुशलमस्तु[3] तव प्रभो ॥ ६९ ॥
सर्वाभीष्टप्राप्तिरस्तु । सर्वारिष्टशांतिरस्तु ।
संततनित्यानंदभोगोस्तु[1] । शिवमस्तु[2] तव प्रभो ॥ ७० ॥
निर्दोष[1] कीर्ति[2] अक्षय[3] असो[4] । लोकापवादीं[5] सभयता[6] असो[7] ।
याचकार्तिशमनीं[8] असो[9] । प्रशस्त[10] बुद्धि[11] सर्वदा[12] ॥ ७१ ॥

---

६७. १ धर्मधैर्य° पु४ ; २ प्रतापप्रज्ञाविजयोस्तु पु४ , सार्थका सिद्धि° धु तं , सार्थकार्य° गो ; ३ भद्रमस्तु पु४.

६८. १ संततीहरिहर° नां औं पु गो ; २ प्रतापप्राज्ञा° नि , प्रतापज्ञानविजयोस्तु मुं औं , प्रतापप्रज्ञा° नां , प्रतापप्रजाविजयोस्तु पु ; ३ सर्वभद्रमस्तु नि , शांतिरस्तु पु४.

पु.४ यांत ६७ व ६८ ओव्यांचा गोंधळ केलेला दिसतो.

६९. १ भवद्दुर्जय° नि , भयदुर्जनक्षयोस्तु ख , °शत्रुक्षोभोस्तु औं ; २ विषयेदयाविषयेतस्तु पु४ , °विशेषस्तु ख औं गो२ , सर्ववरिष्टशांतिरस्तु गो ; ३ कुळमस्तु ख पु४ औं. ही ओवी पु व धु मध्यें नाहीं.

७०. १ संतती° नां पु गो२ , संततीनित्यानंत ख , °नित्यानंत° मुं, सतत° नि ; २ कुशलमस्तु गो.२.

७१. १–४ प्रताप प्रजा विजय वसो औं ; ३ अक्षई पु४ धु गो२ , (–) मुं ; ४ आसे पु४ ; ५ °वादें पु४ गो ; ६ भय ख , सभ्यता गो ; ७ वसो नि , नसो तं , नसे पु४ ; ८ येशकीर्तिसी° पु४ , निर्दयावरी दय औं ; ९ नसो औं, आसे पु४, वसो पु तं ; १० प्रस्तुत ख पु४ मुं निपा, प्रस्तुति नां ; १०–१२ विषेषात्कारें तुज प्रभो औं ; ११ समंधि ख, सद्बुद्धि पु४, सिद्धि नि पा ; १२ समस्ता ख , सर्वथा गो.२.

निर्दयाचारीं[1] आवडी नसो । दुराग्रहीं दृढता नसो ।
पूर्णापूर्णकर्मीं नसो । असंतोष[2] विकळता[3] ॥ ७२ ॥
अहंममतेची[1] भावना[2] नसो । दुष्टापराधीं[3] स्मरण[4] नसो ।
संतमहंतवचनीं नसो । अनादर आणि उपेक्षा ॥ ७३ ॥
श्रद्धा[1] मेधा प्रज्ञा येश । विद्या बुद्धि बळ विशेष ।
तेजारोग्य[2] श्री आयुष्य[3] । हो[4] वाढतें तुज राया ॥ ७४ ॥
माझे आशिष[1] अनेक । फळप्रद होतु[2] तात्काळिक ।
माझेंही वांछित येक[3] । हो संपूर्ण तुझेनी ॥ ७५ ॥
तथास्तु ऐसें[1] त्रिवारवचनीं । उत्तरें[2] दिधलीं ऋषिब्राह्मणीं[3] ।
पुढती[4] ऐकों ठेले श्रवणीं । वाग्विलास ऋषीचा ॥ ७६ ॥
सोमयज्ञ वरुणयज्ञ । ब्रह्मयज्ञ यमधर्मयज्ञ ।
हरिमेध रंतिदेवाचा[1] यज्ञ । तत्समान तव क्रतु ॥ ७७ ॥
गययज्ञ शशबिंदुयज्ञ[1] । वैश्रवणाचा[2] सुमेधयज्ञ[3] ।
नृगयज्ञ अजमीढयज्ञ । तत्समान तव क्रतु ॥ ७८ ॥
रामदाशरथीचा यज्ञ । युधिष्ठिराचा महायज्ञ[1] ।
कृष्णजगदीश्वराचा[2] यज्ञ । तत्समान तव क्रतु ॥ ७९ ॥

---

७२. १ **निंदाचारीं** ख, **निर्दयांवरी** मुं; २ **संतोष** धु तं, (+) **आणि** नि धु तं; ३ **विकल्पता** ख.

७३. १ °**ममता** मुं, °**ममती** गो·२; २ **वासना** ख; ३ **दुष्टापवादी** तं; ३-४ **दुष्टापराध स्मरणीं** नि, **दुराग्रहीं दृढता** धु नि.

७४. १ **श्रधा** धु, **श्रत्धा** गो तं पु४; २ **तेज आरोग्य** गो नि; ३ **आयुष** नि तं; ४ **होवो** नि, **हे** पु·४, **हों** गो·२.

७५. १ **अशेष** ख मुं नां औं पु रा, **आशेष** पु४ गो·२, **असिस** तं; २ **हो** नि ख, **होत** नां तं, **होतुं कां** गो·२, **होतुं** पु४; ३ **वाक्य** औं पु.

७६. १ (-) गो२; २ **उतरें** पु४; ३ **ऋषिमुनीं** औं; ४ **पुडती** पु, **पुणती** गो.

७७. १ **रति**° रा धु गो·२, **यंति**° नां पु, **जयंति**° औं मुं, **पति**° ख.

७८. १ **ऋषिबिंदु**° औं पु, **शाशिर्बिंदु**° रा गो, **शेषबिंदु**° नां पु४; २ **वैश्रवयाचा** ख पु मुं नां; ३ **सुमेधा**° औं पु. नि मध्यें ही ओवी येथें नसून पुढील ८० ओवीनंतर आहे.

७९. १ **राजसुयज्ञ** औं; २ °**जगदेश्वराचा** मुं नां पु गो.

पृथुयज्ञ पुरूरवयज्ञ[1] । धुंधुमारश्वेतकियज्ञ[2] ।
हरिश्चंद्रनृपाचा यज्ञ । तत्समान तव क्रतु ॥ ८० ॥
व्यास श्रीकृष्ण आपुला[1] अंगीं । उत्तर साधक[2] पांडवयागीं ।
त्याहूनि विशेष तुझा जगीं । सर्पयज्ञ वाखाणे[3] ॥ ८१ ॥
शक्ती भक्षिला[1] निशाचरें । राक्षस दाहिले[2] पराशरें[3] ।
तोही दृष्टांत येथें न[4] पुरे[5] । तुळावया[6] तव[7] यज्ञा[8] ॥ ८२ ॥
अग्निसूर्याहूनि[1] सुतेज[2] । यज्ञपरिचर्या[3] करिते[4] द्विज ।
वृत्रसूदनासारिखा[5] मज । तुझा[6] याग[7] दिसताहे ॥ ८३ ॥
ऐसे ऋत्विज आणीके मखीं । नाहीं ऐकिले तिहीं लोकीं ।
ज्याचे[1] शिष्य आपुले[2] मुखीं । वेद नूतन निर्मिती ॥ ८४ ॥
वंशानुवंशीं[1] हस्तक[2] माथें । न खालविती[3] आणिकांतें ।
ऐसे[4] करूनि[5] सोडिले[6] मागते[7] । न मागते[8] करूनियां ॥ ८५ ॥
दानधनाचे[1] प्रबळवृष्टी[2] । याचकरेणू लोपले[3] शृष्टी[4] ।
पूर्णतेचे[5] पृथ्वीपटीं[6] । हर्षांकुर[7] माजले ॥ ८६ ॥

---

८०. १ पुरूरवा° नि औं धु ; २ धुंधुमारी श्वेतकीयज्ञ नि खवर्ग. ख पु मध्यें ही ओवी नाहीं.

८१. १ आपुले मुं, आपुल्या नि औं पु [आपुलां] ; २ साधी ख ; ३ वाखणें पु४ नां.

८२. १ भक्षिल्या नां गो ; २ दाहिले नां रा गो ; ३ पाराशरें पु·४ मुं नां गो ; ४–५ नुपरे धु तं ; ५ सरे नि नां मुं औं पु; ६–८ तव यज्ञीं द्यावया मुं.

८३. १ यज्ञीं सूर्या° मुं ; २ सतेज पु·४ मुं ; ३ यज्ञपंचकार्य गो२ ; ४ करिती ख औं पु रा , करित पु४ नां गो२ , करी गो२ ; ५ वृत्रसदना° नां औं पु ; ६–७ अध्वर तुझा औं पु.

८४. १ त्याचे नि , ज्यांचे गो२ ; २ आपुला (लां) धु तं , आपुल्या नि ख औं.

८५. १ वौंशा° ख धु गो , वंशानवंशीं मुं नां पु ; २ हस्त गो·२ ; ३ खोलविती नि , खालाविती पु तं ; ४ (–) गो·२, ऐसें नि ; ५–६ सोडिले करूनि औं पु ; ६ सांडिले नि ; ७ मातें पु४ मुं नां , मागुते ख गो·२ ; ८ मागे ते नि , मांगतें पु४.

८६. १ °धनाची नि , °धनाच्या धु ; २ सबळ° औं , बळ° पु ; ३ लोपली नि ख नां , लोपला पु४ मुं ; ४ सृष्टी नि तं ; ५–६ पूर्णपृथ्वीचिया

तुझियाऐसा आणिक[1] यागीं । तृप्त[2] मव्हेचि[3] चत्वारशृंगी[4] ।
अनेक[5] पुरुषीं[6] अनेक युगीं । अपार हविषें[7] होमितां ॥ ८७ ॥
विभावसु चित्रभानु महात्मा । हिरण्यरेता कृष्णवर्त्मा[1] ।
विश्वभुक्[2] हुतभुक्[3] वान्हि नामा । जगदंतर[4] निवासी ॥ ८८ ॥
शिखा प्रदक्षिणावृत[1] । हव्य[2] भक्षुनि परम तृप्त ।
जाला[3] दिसे[4] प्रसन्नवंत । देदीप्यमान[5] तेजस्वी ॥ ८९ ॥
अनंतयुगीं अनंतपुरुषीं । होम[1] करितां[2] यागविशेषीं[3] ।
यथेष्ट[4] तृप्ती तुझिया ऐसी । नाहीं हुताश[5] पावला ॥ ९० ॥
सोम ज्योतिष्टोम[1] चैन[2] । महाव्रतादि स्वर्गारोहण[3] ।
वसववैष्णवमाहेश्वरयज्ञ[4] । बहु सुवर्ण[5] शतक्रतु ॥ ९१ ॥
पुंडरीक[1] वाजपेय । अश्वमेध राजसूय ।
विश्वजितादि अप्रमेय । असंख्य यजिले[2] याजकीं ॥ ९२ ॥

पृष्ठीं नि , पूर्णपृथ्वीपृष्ठीं ख , परिपूर्णपृथ्वीपोटीं नां, पूर्णपृथ्वीपृष्टीपटीं औं पु, पूर्णपृथ्वीपृष्टीतटी पु४ , पूर्णतेचि पृथ्वीपाटी गो·२ तं ; ७ हर्षाकार पु४ गो , हर्षाकर गो२.

८७. १ आणिके नि गो·२ , आणिकां मुं , आणिखे पु४ ; २ तृप्ती नि नां धु औं गो·२ ; ३ नव्हे नि पु४ मुं नां गो·२ ; ४ चत्वारीशृंगी मुं नां औं गो२ ; ५ आणिखे पु४ ; ६ पुरुषार्थ धु ; ७ हविर्भाग नि , पुरुषें ख , हाविष मुं गो·२ तं.

८८. १ कृष्णवर्मा गो·२ ; २ विश्वक ख नां औं पु ; ३ (–) गो·२ ; ४ जगदांतर नि.

८९. १ प्रदक्षिणावर्त नि , प्रदक्षिणांवर्ते पु४ , प्रदक्षिणोवर्तु मुं ; २ हाविष खवर्ग , हवि नि ; ३–४ जैं झाला दिसे नि , जो दिसे ख पु४ मुं नां , होता दिसे औं पु ; ५ दैदीप्य° नि ख.

९०. १–३ यागीं होमिले विशेषी नि ; ३ हुतांशीं औं पु ; ४ तेथ औं , तेथें धु , येथें तं ; ५ हुतांश खवर्ग रा गो , हुताशन धु.

९१. १–२ °ष्टोमाचेनि गो·२ ; २ चयन नि (मूळ संस्कृत. हें संस्करण असावें व चैन हें त्याचें अपभ्रष्ट रूप दिसतें), चैतन्य पु४ नां , वैन धु तं , यज्ञ औं ; ३ °रोहणी गो२ ; ४ शैववैष्णव° नि , वासववैष्णव° औं धु , °माहेश्वरें-यज्ञीं गो२ ; ५ सुवर्णकें पु , सुवर्णें नां औं , सुवर्णक रा.

९२. १ पौंडरीक नि, पौंड्रिक आणि धु, पौंड्रिरीक मुं; २ योजिले औं पु.

त्या यज्ञकर्त्यांमाजी सहसा । गृहपति[१] नाहीं तुझिया ऐसा ।
व्रत[२] शील देखोनि हरुषा[३] । पात्र[४] जालों[५] बहुसाळ[६] ॥ ९३ ॥
खट्वांग नाभ[१] दिलीप नृपति । ययाति मांधाता चक्रवर्ती ।
उमाणितां[२] तुझिये[३] कीर्ती । उणावो[४] दिसे अपाडें[५] ॥ ९४ ॥
प्रजापाळक जीवलोकीं । दुसरा[१] तुळावया[२] तुकीं ।
नाहीं ह्मणतां कवीचे[३] मुखीं । शंका दूषण असेना ॥ ९५ ॥
दंडनीतीं[१] जैसा[२] यम । सत्य सदय[३] दुसरा धर्म ।
शस्त्रविद्याविषईं[४] राम । परशुराम[५] प्रतिज्ञे[६] ॥ ९६ ॥
सुव्रतीं[१] जैसा गंगातनयो । प्रतापतेजें[२] भूलोकसूर्यो ।
निर्मळकीर्ती रोहिणीप्रियो । लोकरक्षणीं[३] श्रीविष्णु[४] ॥ ९७ ॥
वाल्मीकितुल्य धैर्यश्रेष्ठ । कोपें[१] जैसा श्रीवसिष्ठ ।
अगस्तीसारिखा[२] बळिष्ठ । दधीचि[३] तैसा[४] औदार्ये[५] ॥ ९८ ॥
कृष्णातुल्य[१] गुणसंपन्न । प्रभुत्वें[२] जैसा सहस्रनयन ।
प्रयत्नविषयीं[३] उपमा[४] न्यून[५] । परंतु[६] होसी भगीरथु ॥ ९९ ॥

---

९३. १ ग्रहपति धु गो मुं, गार्ह्हपति नां औं पु ; २ वृत्त नि तं मुं ; ३ हर्षा नि खवर्ग, सहसा धु ; ४–५ पावलों गो·२ ; ६ हर्षातें धु.

९४. १ नाभाग नि तं, नामा ख, नाभी धु, नाग पु ; २–३ तयांची उमाणितां नि ; ४ उणीव नि ख, उणाव पु·४ गो·२ नां, उणा औं ; ५ आपाडे नि पु४ धु.

९५. १ दुजा नि ; २ पाळुनियां पु४ ; ३ कविचा (चां) ख पु४ नां औं धु गो२ तं.

९६. १ दंडुनी ख ; २ दुसरा नि खवर्ग ; ३ सद्वये पु४ ; ४ शास्त्रविद्याविखीं नि ; ५ फरशा° पु·४ धु तं, येकनिष्ठे औं ; ६ प्रातिज्ञा औं पु.

९७. १ सुवृत्तीं नि, सुवृति पु४; २ प्रतापें जैसा धु ; ३ प्रजारक्षणीं नि ; ४ श्रीकृष्ण पु तं.

९८. १ तपें नि ; २ अगस्त्यासारिखा धु तं ; ३–५ औदार्यें दधीचीसारिखा नि, दधीचीसारिखा औदार्यें खवर्ग.

९९. १ विष्णुतुल्य गो·२ ; २ प्रभुत्व पु४ नां तं ; ३ प्रयत्नाविषयीं नि मुं नां, प्रयत्ने° ख पु४, प्रेत्न° पु ; ४ उपमे रा गो२ तं ; ४–५ उपमन्य नि मुं नां ; ६ परम मुं.

भरतश्रेष्ठा[1] परीक्षितिपुत्रा । प्रिय हो तुज आणि तुझिया मित्रा ।
तुमचे स्नेहें प्रीतिपात्रा[2] । प्रेम करू आमुतें ॥ १०० ॥
घनगंभीरगिरागजरें[1] । सकळिकांचीं मनमयोरें[2] ।
हर्षें नाचतां राजेश्वरें । अत्यादरें बोलिजे[3] ॥ १०१ ॥
वयें[1] बालक दिसे नयनीं । ज्ञानें[2] वडील सकळांहुनी[3] ।
हा श्रेष्ठ पूज्य[4] मजलागूनी । यज्ञमंडपीं विशेषें[5] ॥ १०२ ॥
इछा[1] करूनि[2] अंतर्यामीं । आला[3] असेल[4] जये[5] कामीं ।
तें अवस्य[6] दिधलें पाहिजे आह्मीं । कर्मसिद्ध्यर्थ ये काळीं ॥१०३॥
ह्मणोनि कनकपीठ हातें[1] । देऊनि ह्मणे बैसिजे[2] येथें ।
पूजा अंगीकारोनि सुचित्तें[3] । मग[4] इछेतें[5] निरोपीं[6] ॥ १०४ ॥
आज्ञा देसी ऋषिभगवंता[1] । ते[2] म्यां[3] आदरें वंदणें[4] माथां ।
तुझिया सामर्थ्यसत्ता[5] । संकल्प पावेल सिद्धीतें ॥ १०५ ॥
आस्तीक ह्मणे जया काजा । मी आलोंसें[1] महाराजा ।
तें देईन[2] ऐसा शब्द[3] तुझा । नेमस्त[4] कानीं ऐकणें[5] ॥ १०६ ॥

---

१००. १ भारत° नि मुं पु ; २ प्रियपात्रा नि रा , प्रतिपात्रा पु·४ गो·२.

१०१. १ °गिरिगजरें पु४ ; २ मनमयूरें नि , मनोमथोरें धु ; ३ बोलिजेलें नि , बोलिजेत ख मुं नां तं , बोलिजेना पु४ , बोलिजत गो·२.

१०२. १ स्वयें गो ; २ परि ज्ञानें नां ; ३ काळाहुनी पु४ ; ४ पूजनें पु४ ; ५ विशेष पु·४ नां तं , दिसताहे नि.

१०३. १ इच्छा नि , इत्सा पु४ मुं ; २ पूजोनि पु४ , असेल औं पु ; ३ आर्त औं पु ; ४ आसे पु४ ; ५ जिये नि ख औं , तुझीये पु४ , जया रा गो२ ; ६ अवश्य नि ख मुं औं तं.

१०४. १ हस्तें नि रा ; २ बैसिजो गो२ ; ३ सुचीतें धु रा पु·४ , सुनिश्चितें ख, चित्तें मुं ; ४–५ इप्सित मातें औं ; ५ इछा ते मुं नां रा , इच्छेतें नि , इछीत गो२ , इछी तें तं ; ६ निरोपिजे धु तं.

१०५. १ रुषी° पु४ , रुषी° ख नां धु , भगवंता नि ; २ तें पु४ मुं गो२ ; ३ मी नि ; ४ वंदीन नि गो, वंदिजेल मुं ; ५ सामर्थ्यें सत्रा नि, सामर्थ्यें सता पु४ , सामर्थसत्ता रा गो·२.

१०६. १ आलों असें नि ख मुं तं ; २ देवोनी पु४ ; ३ सुशब्द मुं रा ; ४ देखत पु४ ; ५ ऐकेन नां.

तरीच स्पर्शेन[१] हें[२] आसन । आदरें[३] करीन[४] पूजाग्रहण ।
नेदितां[५] जाईन[६] परतोन[७] । उभ्याउभ्यां[८] ये काळीं ॥ १०७ ॥
सदस्य ह्मणती राजपरमेशा[१] । ज्ञानीं[२] प्रमाण नव्हे[३] वयसा ।
द्वितीयेचा शशी[४] जैसा । वंद्य होय सकळांतें[५] ॥ १०८ ॥
प्रत्यक्ष कासीविश्वेश्वर । स्वल्पाकृति मान्य थोर ।
विशाळ तिळभांडेश्वर[१] । कोणें[२] प्रथम[३] वंदिजे ॥ १०९ ॥
वडिल धारा[१] नव्हे[२] दीप । धाकुटें पूज्य[३] तुळसीरोप ।
तैसें श्रेष्ठत्वाचें रूप । ज्ञान विशेष जे[४] ठाईं[५] ॥ ११० ॥
यालागीं उभा[१] तिष्ठत[२] मुनि । तो बैसवावा स्वस्थासनीं[३] ।
हा तुष्टल्या ततक्षणीं[४] । तक्षक पडे[५] हुताशीं ॥ १११ ॥
ऐकोनि राजा बोले वचनीं । तक्षक न[१] पडे हुताशनीं ।
तवंवरी माझे अंतःकरणीं[२] । हर्षोत्साह[३] असेना ॥ ११२ ॥
वैरी पडतांचि होमानळीं[१] । सहस्रभुजा करूनि सरळी[२] ।
आस्तीकमाथां[३] पुष्पांजुळी[४] । कनकरत्नीं वोपणें[५] ॥ ११३ ॥

---

१०७. १ **स्पर्श करीन** औं ; २ (–) नि खवर्ग (नां प्रसंग्रा) ; ३ **नेमें** ख ; ४ **घेईन** ख गो ; ५–७ **नेदी ह्मणसी तरी जाईन** औं पु ; ८ **उभ्याउभीं** ख पु४ नां औं , **उभाउभी** पु धु.

१०८. १ **राजा परमेशा** नि , °**परेशा** ख मुं नां गो·२ , **राजरमेशा** औं धु ; २ **ज्ञानिया** नि , **ज्ञांन** पु४ ; ३ **होये** पु४ , **नोहे** गो·२ ; ४ **शशांक** नि ख पु४ , **शशीधर** नां पु रा धु गो२ तं ; ५ **विश्वातें** गो , **सर्वांतें** गो२.

१०९. १ **पिंडभांडेश्वर** औं , **तीरभांडेश्वर** पु ; २ **कोण** नि पु·४ मुं गो·२ ; ३ **प्रभातें** औं , **प्रथमें** ख.

११०. १ **धाकुटा** औं पु , **धरा** गो·२ ; २ **नोहे** धु तं ; ३ **नव्हे** ख ; ४ **ते** नि पु४ ; ४–५ **ह्मणोनि** धु.

१११. १–२ **तिष्ठतु उभा** धु ; २ **तिष्ठे** नि औं पु ; ३ **सभास्थानीं** ख , **स्वस्थानीं** नि खवर्ग धु ; ४ **तत्क्षणीं** नि पु·४ औं ; ५ **पडेल** ख मुं नां तं.

११२. १ **(–)** नि ख पु·४ औं ; २ **अंतःकर्णीं** ख मुं नां तं ; ३ **हर्ष-उत्साव** धु तं. ही ओवी गो·२ मध्यें नाहीं.

११३. १ **मोहानळीं** ख , **भूमंडळीं** मुं ; २ **सकळीं** मुं ; ३ °**माथा** नि ; ४ **पुष्पांजळी** नि पु·४ तं ; ५ **वोपीन** नि नां गो.

याही वेगळी जे जे[1] आज्ञा । तुह्मी कराल ऋषिसर्वज्ञा ।
ते[2] विहित ऐसें[3] मानुनी[4] संज्ञा[5] । अवश्य करणें[6] म्यां येथें ॥११४॥
ऋत्विज[1] ह्मणती नरेंद्रोत्तमा[2] । तुझें वाक्य[3] अनुलंघ्य[4] आह्मां ।
सांडूनियां स्वकीय धामा । पळायमान[5] तव शत्रु ॥ ११५ ॥
प्रगट सांगिजे पावकें । आणि सर्वज्ञ पौराणिकें ।
त्रिकाळज्ञ[1] आपुल्या मुखें । दूरिदृष्टी[2] बोलती ॥ ११६ ॥
सर्पसत्रापासूनि मृत्यु । जाणोनि[1] तक्षक[2] भयपीडितु[3] ।
इंद्रलोका जाऊनि त्वरितु । शरण गेला शक्रातें ॥ ११७ ॥
प्रार्थूनियां सहस्रनेत्र । शरीरिं[1] जाला उत्तरीवस्त्र[2] ।
ऐसें सिद्धपुरुषांचें वक्त्र[3] । वृत्तांत वदे ये काळीं ॥ ११८ ॥
इंद्रें अभय दिधलें हातें[1] । पावक स्पर्शों नेदी तूतें ।
ऐकोनि राजा क्षोभला चित्तें[2] । निग्रहवचनें[3] बोलतु[4] ॥ ११९ ॥
माझा परम दंदी[1] शृष्टी[2] । शक्रें दुष्ट[3] घातला पाठीं ।
तरी इंद्रेंसहित[4] हव्यवाटीं । तक्षक[5] सीघ्र[6] पाडावा[7] ॥ १२० ॥

---

११४. १ (–) नि खवर्ग ; २ **तेही** नि ख औं पु , **तें** पु४ मुं ; ३–४ **मानी ऐशी** नि ख , **मानी** पु४ , **मानीन** पु नां , **मानुनी** धु गो२ ; ५ **स्वज्ञा** गो·२ , **सर्वज्ञा** तं ; ६ (–) पु४.

११५. १ **रुत्विज** ख पु४ रा धु ; २ **नरोत्तमा** नि खवर्ग ; ३ **वचन** ख ; ४ **अनुलंघ्य** नि ; ५ **पलायमान** नि खवर्ग तं.

११६. १ **त्रिकाळ** मुं , **त्रिकाळीं** पु , **त्रिकाळज्ञानी** औं धु गो ; २ **दूरदृष्टें** नि , **दूरीदुरीष्टें** धु.

११७. १–२ **तक्षक भयें** नि खवर्ग (**प्रत्यक्ष भव–** पु४), **तक्षक जाणे** गो२ ; ३ **भयभीतु** ख.

११८. १ **कंठीं** नि खवर्ग ; २ **उत्तरीयवस्त्र** नि गो तं ; ३ **वग्त्र** पु४ धु.

११९. १ **होतें** नि ; २ **चीतें** पु४ धु गो·२ ; ३ °**वचन** मुं नां औं पु धु गो , **निग्रहेंकरोनि** नि ; ४ **बोलत** नि ख पु ४ गो·२ , **आनुवादे** नां.

१२०. १ **द्वंदी** नि तं , **द्वंद्वि** गो ; २ **सृष्टी** नि नां तं ; ३ **दुष्टें** नि ख **मुं** तं गो·२ ; ४ **इंद्रासहित** नि औं ; ५ **तक्षकें** ख ; ६ **शीघ्र** नि औं पु तं ; ७ **पडावा** नां.

निकें ह्मणोनि रुत्विजगणीं[१] । मंत्रप्रयोग[२] केला[३] वचनीं ।
तवं इंद्रासन डळमळोनि । अधोपंथें उतरलें[४] ॥ १२१ ॥
निर्जरेंसीं[१] निर्जरनाथ[२] । अप्सरागणीं[३] परिवारित[४] ।
विमानयानीं सुशोभित । देदीप्यमान[५] तेजस्वी ॥ १२२ ॥
गंधर्व गायनीं[१] रंजवीत । जीमूत[२] जवळीं[३] मूर्तिमंत ।
गगनभेरी[४] घंटासहित[५] । निनाद[६] कानीं परिसिले[७] ॥ १२३ ॥
दीक्षित सदस्य याजकजनीं । अवलोकितां उर्ध्व वदनीं[१] ।
तक्षकमाळी[२] वज्रपाणी । अंतरीक्षीं[३] लक्षिला ॥ १२४ ॥
सहइंद्राय[१] तक्षक[२] इति । स्वाहाशब्दें[३] सीघ्रगती[४] ।
दोघे[५] होमा पूर्णाहुतीं । राजा प्रेरी[६] याजकां[७] ॥ १२५ ॥
ऋत्विज ह्मणती गुणैकनिधी । हें कर्म[१] सांग पातलें[२] सिद्धी ।
आस्तीक गौरवुनी आधीं । पूर्णकाम करावा ॥ १२६ ॥
हर्षें[१] बोले राजेश्वर । ब्राह्मणा[२] श्रेष्ठ[३] मागें[४] वर ।
याचक ह्मणती राजया थोर । कौतुक पुढती[५] वर्तलें ॥ १२७ ॥

---

१२१. १ ऋत्विज° नि मुं पु गो तं ; २ मंत्रवीयोग पु४ ; २–३ मंत्रप्रयोगिला औं ; ४ उतरिलें नि , उतरला पु४ , उतरे गो२.

१२२. १ गजरेशीं नि खवर्ग (पु४ प्रसंप्रा); २ अप्सरानाथ ख ; ३ निर्जरेंसी ख ; ४ परिवेष्टित औं ; ५ दैदीप्य° नि ख मुं रा गो , दयदीप्य° धु गो२.

१२३. १ गाणीं ख पु , गानीं तं , गगनीं गो२ ; २ जीमूति नि खवर्ग ; ३ जवळी नि, जवळा ख पु·४ नां औं , जवळ तं ; ४ गगनभरि पु४ , गगनगर्भि नां ; ५ घंटाभरित नां ; ६ नाद नि ख पु४, विनोद औं पु ; ७ परिसिला नि , स्पर्शिले पु , स्पर्शिला औं.

१२४. १ गगनीं खवर्ग ; २ °माळ ख , °मातुळ औं पु ; ३ अंतरिक्ष खवर्ग रा गो·२.

१२५. १ इंद्रसह मुं ; २ तक्षका नि ; ३–४ स्वाहाशब्देंशीं गर्जती नि ; ५ या दोहीं धु ; ६ बोले धु ; ७ याजका नि पु४ तं.

१२६. १ कार्य ख ; २ पावलें नि नां औं पु.

१२७. १ हरुषें नि ; २–३ ब्राह्मणश्रेष्ठा नि ख मुं ; ३–४ मागें श्रेष्ठ गो२ ; ५ पुढें मुं नां औं पु गो२ , पुडती पु४ तं.

कुंडाग्नि[१] प्रबळ[२] देखोनि दृष्टी[३] । इंद्रें धाक घेतला पोटीं ।
तक्षक सांडूनि[४] उठाउठीं । उर्ध्वपंथें[५] पळाला ॥ १२८ ॥
गगनचुंबित जिह्वाज्वाळा । पसरूनि[१] धांवतां[२] होमानळा ।
